# र स रा ज

## खंड क्र २

( रसराज अंकांचा बांधीव खंड )

| अंक क्रमांक | वर्ष |
|---|---|
| ५. | १९८४ - १९८५ |
| ६. | १९८५ - १९८६ |
| ७. | १९८६ - १९८७ |
| ८. | १९८७ - १९८८ |
| ९. | १९८८ - १९८९ |

महत्वाची सूचना : सदरचा खंड ग्रंथालयाबाहेर नेवू नये.
तसेच कसल्याही परिस्थितीत आतील मजकूराचे कात्रण काढू नये.

प्राचार्य

१८८४ ८५

SHRI. S. H. KELKAR COLLEGE OF ARTS,
COMMERCE & SCIENCE,
DEVGAD, DIST-SINDHUDURG
LIBRARY
This is valuable and
cannot be taken outside the
Library without the special
permission of the Librarian

# रसराज

सदाशिव हरी केळकर
कला व वाणिज्य महाविद्यालय,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग-४१६ ६१३

# देवगड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

## * देवगड *

तालुका–देवगड, जिल्हा–सिंधुदुर्ग–४१६ ६१४

रजि. नं ७३४८ )  ऑडिट वर्ग – 'अ'  ( फोन नं. ३८

## ❀ ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर ❀

| **ठेवीचा प्रकार** | **मुदत** | **व्याजाचा दर** |
|---|---|---|
| चालू ठेव | | ०–५० % |
| सेव्हिंग | | ५–५० % |
| **रिकरिंग–** | | |
| (दरमहा ठेवावयाची कमीतकमी रक्कम रु. ५/–) | १ वर्ष | ९–०० % |
| व त्याचे पटीत जास्तीत जास्त रु. २००/–) | २ वर्षे | १०–०० % |
| | ३ वर्षे व पुढे | ११–०० % |
| | ५ वर्षे व पुढे | १२–०० % |
| **पिग्मी** | | |
| दररोजची ठेवावयाची रक्कम कमीतकमी | २ वर्षे | ५–०० % |
| ०–२५ पैसे व त्याचे पटीत जास्तीत जास्त १०–०० रु. | ३ वर्षे | ६–०० % |
| | ४ वर्षे | ७–०० % |
| | ५ वर्षे | ८–०० % |
| **अल्प मुदत ठेव** | | |
| | १५ दिवस ते ४५ दिवस | ४–०० % |
| | ४६ दिवस ते ९० दिवस | ५–०० % |
| | ९१ दिवस ते ६ महिन्यापेक्षा कमी | ६–०० % |
| | ६ महिने ते ९ महिन्यापेक्षा कमी | ७–०० % |
| | ९ महिने ते १ वर्षापेक्षा कमी | ८–०० % |
| **मुदत ठेव** | | |
| | १ वर्षे ते २ वर्षापेक्षा कमी | ९–०० % |
| | २ वर्षे ते ३ वर्षापेक्षा कमी | १०–०० % |
| | ३ वर्षे ते ५ वर्षापेक्षा कमी | ११–०० % |
| | ५ वर्षे व जास्त | १२–०० % |

**अधिक माहितीसाठी समक्ष भेटा**

**सुरेश रसाळ**
चेअरमन

**गुरुनाथ लोंबर**
मॅनेजर

शिक्षण विकास मंडळ या संस्थेचे,

**श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.**

# 'रसराज' वार्षिक

१९८४ - ८५

**अंक पाचवा**

: संपादक मंडळ :

**प्राचार्य आर. ए. कुलकर्णी / अध्यक्ष**
**प्रा. लता वळसंगकर / कार्यकारी संपादक**

: सहाय्यक संपादक :

**प्रा. प्रकाश उपाध्ये**
**प्रा. सुरेखा कुलकर्णी**

: संपादन सहाय्य :

**प्रदीप साळसकर, सदानंद देसाई, राजेंद्र हिंदळेकर, नथुराम उपकर,**
**अविनाश खडपकर, अंजली नलावडे, शुभांगी सप्रे**

## श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

### स्था नि क नि या म क स मि ती

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. वसंतराव साटम | अध्यक्ष |
| २ | ,, अमृतराव राणे | सदस्य |
| ३ | ,, प. रा. जोशी | ,, |
| ४ | ,, मुरलीधर जोशी | ,, |
| ५ | ,, गु. शां. शिरसाट | ,, |
| ६ | ,, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ७ | ,, प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८ | ,, प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| ९ | ,, एम्. व्ही. लेले | कर्मचारी प्रतिनिधी |

## श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

### वि द्या र्थी म हा मं ड ळ १९८४-८५

| | | |
|---|---|---|
| १ | जनरल सेक्रेटरी | सदानंद देसाई |
| २ | विद्यार्थी प्रतिनिधी | नूतन पाटील |
| ३ | पाश्चात्य खेळ | अजित सावंत |
| ४ | भारतीय खेळ | अनिल मुणगेकर |
| ५ | 'रसराज' भित्तीपत्रक | प्रदीप साळसकर |
| ६ | सांस्कृतिक मंडळ | अविनाश खडपकर |
| ७ | प्लॅ. फोरम व गायडन्स | सिताराम सरवणकर |
| ८ | वादविवाद मंडळ | दिलीप सारंग |
| ९ | नियोजन व प्रसिद्धी | मिलींद देशपांडे |
| १० | सहल विभाग | जयानंद फाटक |
| ११ | वाङ्मय मंडळ | विनायक ठाकूर |

## संपादकीय

रसराजचा हा अकरावा अंक आम्ही सादर करत आहोत.

आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यंदा काही वैशिष्टचपूर्ण यश संपादन केले. त्याचा उल्लेख करणे जरुरीचे आहे.

महाविद्यालयाची विद्यार्थिनी कल्पना तावडे हिने सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात बारावी कला शाखेत सर्वप्रथम येऊन महाविद्यालय यशाच्या मालिकेत आणले. उत्तम कथा मासिकातर्फे घेतल्या गेलेल्या महाविद्यालय वार्षिकांक स्पर्धेत आमचा रसराज सर्वोत्कृष्ट ठरला हेही विद्यार्थ्यांनीच मिळवलेले यश. वर्षभर झालेल्या क्रीडास्पर्धेतून विजय खेचून आणलेल्या विद्यार्थ्यांनीही महाविद्यालयाच्या यशाचाच विचार केला.

या अंकात कथा, कविता अशी विद्यार्थ्यांच्या आवडीची नेहमीची सदरे आहेतच पण त्याबरोबरच विद्यार्थ्यांसमोर सतत नवनवीन उपक्रम ठेऊन त्यांच्या उत्साहाला खाद्य पुरवणारे प्राचार्यांच्या नव्या दृष्टीतून स्फुरलेले यंदाचे वैशिष्टचपूर्ण सदर म्हणजे 'स्रोत.' वर्षातील साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात घडणाऱ्या वैशिष्टचपूर्ण घडामोडीवर परिचयात्मक टिपणे लिहून त्यावर विचारस्रोत टाकण्याचा विद्यार्थ्यांनी केलेला हा एक प्रयत्न. राजकीय क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वाने वैशिष्टचपूर्ण ठसा उमटवलेल्या व्यक्तींचा परिचयही विद्यार्थ्यांनी आपल्या लेखाद्वारे करून दिला आहे. ग्रामीण विकास सर्वेक्षण हा परिश्रमपूर्वक तयार केलेला अहवाल मिठबावच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक प्रश्नांची चर्चा करून त्यावर उपाय सुचवणारा आहे. मालवणी भाषेच्या सान्निध्यात वाढणारा आमचा विद्यार्थी त्या भाषेतून त्याने काही विचार मांडावेत असा आमचा प्रयत्न असतोच. आमच्या विद्यार्थ्याने मालवणी भाषेतून लिहिलेली एकांकिका म्हणजे आपल्या भाषेचे ऋण फेडण्याचा त्याच्यापरीने केलेला प्रयत्न होय. हे सर्व करत असताना साहित्यिक गुणांच्या सर्वोत्कृष्ट परंपरेत तो उतरला नाही तरी त्याने प्रामाणिकपणे नवीन काही मांडण्याचा केलेला प्रयत्न नाकारता येणार नाही.

रसराजच्या अंकाची सुबक व आकर्षक छपाई करण्याचे काम कोल्हापूरच्या सेवा मुद्रणालयाने स्वीकारुन आम्हास उत्तम सहकार्य केले. जाहीरातदार बंधूंच्या सहाय्यानेच आम्ही अंक नीटनेटका करू शकलो. महाविद्यालयातील प्राध्यापक व सहकारी यांच्या मौलिक सूचनाना विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादामुळेच अंक अचूक ठरतोय हे नमूद करणे आवश्यक आहे. या सर्वांचे आम्ही आभार मानून रसराज आपल्या हाती देत आहोत.

संपादक

## सहवेदना

चरित्रकार धनंजय कीर, अभिनेते अरुण सरनाईक, कविवर्य बा. भ. बोरकर, महाविद्यालयाशी संबंध असलेल्या मुलुंड येथील एस्. एच्. केळकर कंपनीचे संचालक श्री. सुरेश वझे यांच्या पत्नी सौ. सुषमा वझे, ख्यातनाम साहित्यिक ग. ल. ठोकळ, जेष्ठ शिक्षणतज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु रँग्लर गणेश सखाराम महाजनी, सुप्रसिद्ध गायिका विमल कर्नाटकी, महाराष्ट्रात जादूची कला रुजविणारे जादूगार रघुवीर, रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रातील नामवंत अभिनेत्री जेनिफर कपूर, प्रसिद्ध मराठी साहित्यिक व कवी शरच्चंद्र मुक्तीबोध, चित्रपट अभिनेते रेहमान, खलनायक मदनपुरी, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, ज्योतिषी अजंता जैन, उर्दू कवी फैज अहमद फैज, माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण, साहित्यिक व विचारवंत पु. ग. सहस्रबुद्धे, तत्त्वचिंतक दे. द. वाडेकर, व संशोधक वा. वि. मिराशी, रशियाचे अध्यक्ष चेर्नेन्को, अष्टपैलू खेळाडू दत्तू फडकर यांचे या शैक्षणिक वर्षात दुःखद निधन झाले. महाविद्यालयाची यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

## अंतरंग

ब्लॉक मेकर :

मास ॲडव्हर्टायझींग, कोल्हापूर

छायाचित्रे :

रामदास फोटो स्टुडिओ, देवगड

संपादकीय :

प्रा. लता वळसंगकर / ३

स्रोत / ७

रा. ग. गडकरी– प्रकाश मराठे

ज्ञानेश्वर नाडकर्णी– अंजना गोखले

हयवदनचा विजयध्वज– मिलन लोंबर

गणितातील संशोधन– रुपाली तारकर

नाट्य समीक्षक मेळावा– विजय खवळे

प्रभाकर पणशीकर– पद्मजा पारकर

गर्भरेशीम– शुभांगी नेने

स्मिता पाटील– श्रीप्रभा राजेशिर्के

अनुताई वाघ– अश्विनी कुलकर्णी

भीमसेन जोशी– कल्पना तावडे

शंकर पाटील– अंजली नलावडे

बाळीबाब– शुभांगी सप्रे

ग. ल. ठोकळ– आनंद प्रभुदेसाई

अनिल बर्वे– अविनाश खडपकर

पु. ग. सहस्रबुद्धे– वनिता मेस्त्री

दुर्मिळ तत्त्वचिंतक– मीनाक्षी तारकर

अजरुद्दीन– अनघा कुलकर्णी

बिलीयर्ड– कामिनी जोशी

जागतिक क्रिकेट स्पर्धा– मिलींद केळकर

पंजाब प्रश्न– राजेंद्र हिंदळेकर

एका तेजस्वी युगाचा अंत– वनिता हिंदळेकर

महाराष्ट्राचा मोहरा हरपला– चित्ररेखा पाटणकर

भोपाळ दुर्घटना– शैलजा मांजरेकर

१९८४ची लोकसभा निवडणूक– सुनिता कुलकर्णी

कथा

प्राक्तन– चित्ररेखा पाटणकर

पर्याय– आनंद प्रभुदेसाई

स्वप्न सत्य जाहले– मीना चव्हाण

कविता

मृदगंध– चित्ररेखा पाटणकर

प्रीत वृक्षा बहरुनी ये– राजन ढोके

दृढ निश्चय– जयंत साटम

बंध रेशमाचे– ,, –

वेदनेची व्यथा– विलास कांबळे

वसंतागमन– भारती जाधव

प्रतिबिंब– मोहन मिराशी

एक वृक्ष– मनोहर जोईल

जीवनाचा अर्थ– चंद्रकांत परब

निसर्ग प्रेम– ,, –

इतर लेख

भारतरत्न श्रीमती इंदिराजी– नथुराम उपरकर

महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण– वनिता हिंदळेकर

ग्रामीण विकास सर्वेक्षण– अंजली नलावडे

एकांकिका

धकल्याची चाय– राजेंद्र हिंदळेकर

वाटचाल

कीर्तिपताका

## शिक्षण विकास मंडळ, देवगड.

### नि या म क स मि ती

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. | शां. कृ. पंततालावलकर | अध्यक्ष |
| २ | ,, | के. जे. ठाकूर | उपाध्यक्ष |
| ३ | ,, | अर्जुनराव नलावडे | उपाध्यक्ष |
| ४ | ,, | वसंतराव साटम | कार्यवाह |
| ५ | ,, | अमृतराव राणे | सहकार्यवाह |
| ६ | ,, | मुरलीधर जोशी | सभापती, नियामक समिती |
| ७ | ,, | डॉ. अरुण खाडीलकर | कोषाध्यक्ष |
| ८ | ,, | स. ज. पारकर | सभासद |
| ९ | ,, | य. द. राणे | ,, |
| १० | ,, | ह. अ. नलावडे | ,, |
| ११ | ,, | ल. य. कोयंडे | ,, |
| १२ | ,, | डॉ. मा. रा. नेने | ,, |
| १३ | ,, | य. ग. पोकळे | ,, |
| १४ | ,, | रा. धो. पारकर | ,, |
| १५ | , | पु. ज. ओगले | ,, |
| १६ | ,, | प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| १७ | ,, | स. भि. जामसंडेकर | ,, |
| १८ | ,, | डॉ. वा. कृ. आपटे | ,, |
| १९ | ,, | गु. शां. शिरसाट | |
| २० | ,, | भा. नो. पाटणकर (श्री. भाऊसाहेब केळकर यांचे प्रतिनिधी) | ,, |
| २१ | ,, | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | (निमंत्रीत) |
| २२ | ,, | आ. गो. बांबुळकर | (निमंत्रीत) |
| २३ | ,, | श. ज. कुलकर्णी | (निमंत्रीत) |
| २४ | ,, | प्राचार्य अ. ना. जोशी | (निमंत्रीत) |

## श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

### आ म चा प्रा ध्या प क व र्ग

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | एम्. ए. ( इंग्रजी ) ( मराठी ) |
| २) | प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर | एम्. ए. ( इंग्रजी ) |
| ३) | ,, ल. दा. गोलतकर | एम्. ए. बी. एड्. ( इतिहास ) |
| ४) | ,, मधुकर म. गावडे | एम्. ए. बी. एड्. ( भूगोल ) |
| ५) | ,, हेरंभ ल. पटवर्धन | एम्. कॉम. सी. ए. ( अकौटन्सी ) |
| ६) | ,, टी. सेल्व्हराज | एम्. ए. बी. एड्. ( अर्थशास्त्र ) |
| ७) | ,, शशिकांत रा. घुमाळ | एम्. कॉम. ( कॉमर्स ) |
| ८) | ,, सुरेश म. सोनटक्के | एम्. ए. ( अर्थशास्त्र ) |
| ९) | ,, दत्तात्रय बा. बलवान | एम्. कॉम. ( कॉमर्स ) |
| १०) | ,, भारत ना. भोसले | एम्. एस्सी. ( संख्याशास्त्र / गणित ) |
| ११) | ,, लता भि. वळसंगकर | एम्. ए. बी. एड्. ( मराठी ) |
| १२) | ,, एस्. बी. धोळवे | एम्. ए. ( अर्थशास्त्र ) |
| १३) | ,, अरूण श्री. गोगटे | बी. ए. एल्. एल्. बी. ( कायदा ) |
| १४) | ,, श्रीकृष्ण शं. बोराटे | एम्. ए. बी. एड् ( भूगोल |
| १५) | ,, प्रकाश म. उपाध्ये | एम्. ए. डी. एच. इ. ( इंग्रजी ) |
| १६) | ,, कालिदास ग. जोशी | एम्. ए. डी. एच. इ. ( अर्थशास्त्र ) |
| १७) | ,, श्याम सा. पाटील | एम्. कॉम्. ( कॉमर्स / अकौटन्सी ) |
| १८) | ,, बजरंग म. माळी | बी. ए. बी. पी. एड्. |
| १९) | ,, एम्. जी. शिर्के | एम्. कॉम. डी. एड्. इ. ( सहकार ) |
| २०) | ,, सुलभा म. कुलकर्णी | एम्. ए. ( मराठी ) |
| २१) | ,, सुरेखा पी कुलकर्णी | एम्. ए. ( इतिहास ) |
| २२) | ,, प्रवीण बी. सकटे | एम्. ए. ( भूगोल ) |

### ग्रंथालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस. एस. पाटील | एम्. ए. बी. लिब् एस्सी ( ग्रंथपाल ) |
| २) | ,, यशवंत तुकाराम देऊळकर | मुख्य शिपाई |

### कार्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गणेश भालचंद्र गोडबोले | |
| २) | ,, महेश्वर वा. लेले | मुख्य लिपिक |
| ३) | ,, संजय मालंडकर | वरीष्ठ लिपिक |
| ४) | कु. पद्माक्षी तारकर | बी. कॉम लिपिक |
| ५) | ,, मंदा चौकेकर | बी. ए. लिपिक |

### शिपाई

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत यशवंत महाडीक | |
| २) | ,, वसंत वासुदेव धोपटे | |
| ३) | ,, नामदेव दामाजी केतकर | |
| ४) | ,, चंद्रकांत साबाजी कदम | |
| ५) | अनंत कृष्णा बाजे, | रखवालदार |

Statement about ownership & other particulars about the periodical

# RASRAJ

Form IV (Rule 8)


| | | |
|---|---|---|
| 1) | Place of publication : | Devgad |
| 2) | Periodicity of its publication : | Yearly |
| 3) | Printer's Name . | Mrs. Neelambari S. Kulkarni |
| | Nationality ; | Indian |
| | Address : | 167 B Mangalwar Peth, Kolhapur |
| 4) | Publisher's Name . | Prin. R. A. Kulkarni |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad |
| 5) | Editor's Name : | Prof. Lata Valsangkar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad |
| 6) | Ownership of Publication : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce |

I, R. A. Kulkarni, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd. R. A. Kulkarni
Signature of Publisher


प्रकाशक : प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, संपादक : प्रा. लता वळसंगकर
मुद्रक : सेवा मुद्रणालय १६७ बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर.
या अंकातील लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच, असे नाही.
FOR PRIVATE CIRCULATION ONLY

.... आमचे स्फूर्तीस्थान ....



माननीय श्री. शां. कृ. तथा बापूसाहेब पंतवालावलकर
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड

## ‘ रसराज ’ संपादक मंडळ....



| प्रदीप साळसकर | सदानंद देसाई | नथूराम उपरकर | राजेंद्र हिंदळेकर | प्रा. प्रकाश उपाध्ये | प्रा. सुलभा कुलकर्णी | प्रा. लता वळसंगकर | अंजली नलावडे | शुभांगी सप्रे | अविनाश खंडपकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## ' झोत '

आमच्या यंदाच्या रसराज अंकातील एक वैशिष्टयपूर्ण सदर झोत !

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकीज्ञान न मिळवता जीवनाच्या विविधक्षेत्रातील ज्ञान आत्मसात केले पाहिजे. भोवतालच्या जीवनातील नित्य घडणाऱ्या घटना - घडामोडी यांची दखल घेऊन आपल्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करावा - ज्ञानाची दृष्टी चौफेर असावी. याकरता चालू शैक्षणिक वर्षातील साहित्यिक - सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक, राजकीय या सर्व क्षेत्रातील महत्त्वाच्या घडामोडीवर प्राचार्यांच्या कल्पनेनुसार आमच्या विद्यार्थ्यांनी टाकलेला प्रकाश झोत.

### शेक्सपियरी होड घेणारा प्रतिभावंत: रा. ग. गडकरी

यंदाचे हे वर्ष गडकरी जन्मशताब्दी म्हणून साजरे झाले. ' गडकरी जन्मशताब्दी ' संपूर्ण महाराष्ट्रात तसेच त्यांच्या जन्मगावी गुजरात प्रांतातही अतिशय थाटामाटात साजरी झाली. ठिकठिकाणी अनेक कार्यक्रम साजरे झाले.

जन्मशताब्दीच्या निमित्ताने गडकऱ्यांच्या प्रकाशित - अप्रकाशित वाङ्मयाचा सांगोपांग अभ्यास झाला. गडकऱ्यांच्या नाटकांची - कवितांची उजळणी झाली. इतका सोहळा इतकी कीर्ती क्वचितच कुणाच्या वाट्याला आली असेल. गडकऱ्यांना त्यांच्या ह्यातीत कीर्ती लाभली नाही पण जन्मशताब्दीच्या निमित्ताने देवदुर्लभ कीर्ती लाभली.

गडकऱ्यांचे आयुष्य अवघ्या ३४ वर्षाचे. पण या उण्यापुऱ्या चौतीस वर्षात गडकऱ्यांनी मराठी सारस्वतात नंदनवन फुलवून टाकले. या अल्पकाळात त्यांनी एकाच जन्मात तीन अवतार घेतले.

राम गणेश गडकरी या नावाने रंगभूमीची झळाळी वाढवली. ' शेक्सपियरशी होड घेणारा प्रतिभावंत ' म्हणून सन्मान मिळवला. एकच प्याला – भावबंधन – पुण्यप्रभाव – प्रेमसंन्यास – राजसंन्यास – वेड्यांचा बाजार अशी एकापेक्षा एक सरस नाटके त्यांनी लिहिली. प्रत्येकाचे वेगळे वैशिष्ट्य – वेगळा नक्शा. शिवाय ही नाटकांची माला एका भरजरी – गहिऱ्या हुकमी भाषेत गोविली आहे.

गडकऱ्यांच्या दुसरा अवतार म्हणजे गोविंदाग्रज. आधुनिक कवितेत केशवसुत – बालकवी यानंतर गोविंदाग्रजांचेच नाव घेतले जाते. त्यांना प्रेमाचा शाहीर हा किताब त्यांच्या काव्यक्षेत्रातील कामगिरीबाबत बहाल केला गेला.

' क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा '

या त्यांच्या काव्यपंक्तींनी तर रसिकांच्या हृदयातच स्थान मिळवले.
गडकऱ्यांचा तिसरा अवतार म्हणजे बाळकराम ! शेक्सपियरच्या तोडीची नाटके लिहिली,

विफलप्रेमाची कविता लिहिली त्याचप्रमाणे विनोदी वाङ्मयातून जगातले दुःख पचवून जगाला हसविणाऱ्या विदूषकाचे महत्त्व कमी नसते ते दाखवून दिले. या राम गणेश गडकरी, गोविंदाग्रज, बाळकराम गडकऱ्यांच्या या तीन अवतारांना – या भाषाप्रभूच्या पवित्र स्मृतीला त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने अभिवादन !
'झाले बहू होतील बहू परंतु या सम हा !'

**प्रकाश मराठे** तृतीय वर्ष, कला

## ज्ञानेश्वर नाडकर्णी–कला साहित्याचे शिलेदार

ज्ञानेश्वर नाडकर्णी यांना जून महिन्यात फ्रेंच सरकारने **'शवालिये द लार्द्र देझति ए द लैव्'** (कलासाहित्याचे शिलेदार) ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला आहे. हा पुरस्कार प्रथमतःच मराठी लेखकाला प्राप्त झाला आहे आणि तो पुरस्कार ज्ञानेश्वर नाडकर्णीसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाला मिळाला आहे यातच नाडकर्णींची कला क्षेत्रातील कामगिरी समजून येते.

ज्ञानेश्वर नाडकर्णी हे प्रामुख्याने ललित लेखक आहेत. त्याचप्रमाणे ते नाट्यसमीक्षक, चित्रपटसमीक्षक, संगीतसमीक्षक, चित्रसमीक्षक आहेत. कलाप्रांतातील इतक्या अंगोपांगांचे सांगोपांग विश्लेषण करणारा समीक्षक विरळाच म्हणावा लागेल.

सन १९४९ मध्ये जार्ज बर्नार्ड शॉ या जगप्रसिद्ध साहित्यिकावरच्या मृत्युलेखाने त्यांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. 'चिद्घोष' 'पाऊस' आणि 'भरती' हे तीन कथासंग्रह त्याचप्रमाणे 'दोन बहिणी' ही कादंबरी विशेष गाजली.

'न्यू डायरेक्शन इन् द् मराठी थिएटर' आणि 'गायतोंडे (चित्रकार) हे त्यांचे इंग्रजीतून प्रसिद्ध झालेले दोन ग्रंथ. तसेच मार्लोच्या 'डॉक्टर फॉस्टस्' या नाटकाचा अप्रतिम अनुवाद.

नाडकर्णींची महत्त्वाची कामगिरी म्हणजे मराठी कलाजीवनाविषयी सुस्पष्ट आणि गुणात्मक वैशिष्ट्ये इंग्रजी वृत्तपत्रातून प्रथमच प्रभावीपणे मांडली.

मराठी कादंबरीकार, नाटककार, अभिनेते, वादक, गायक, चित्रकार यांची अमराठी भाषिकांना त्यांनी नुसती ओळख करून दिली नाही तर त्यांच्या कलात्मक कामगिरीविषयी मराठीतेतर क्षेत्रात दबदबा निर्माण करण्याचे कार्य त्यांच्या लेखणीने केले आहे.

'फ्री प्रेस जर्नल' व 'फायनान्शिअल एक्सप्रेस' या इंग्रजी दैनिकांचे ते सहसंपादक होते. 'टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रातून गेल्यावर्षीपर्यंत ते सातत्याने लिहीत होते. 'विकली' या इंग्रजी साप्ताहिकातूनही त्यांचे लेखन प्रसिद्ध होत असते. 'मिड–डे व संडे ऑब्झरव्हर' या वृत्तपत्रातून त्यांचे लेखन सुरूच आहे. त्याचप्रमाणे मराठी नियतकालिकातूनही त्यांचे लेखन प्रसिद्ध होतेच आहे.

त्यांची ही कामगिरी पहाता फ्रेंच सरकारने त्यांचा केलेला गौरव यथोचित तर आहेच

पण या गौरवाने मराठी मातीच्या गुणवत्तेचा झेंडा त्यांनी समुद्रपल्याड फडकवला आहे असे म्हणणे अतिशयोक्त ठरू नये.

***अंजना गोखले*** अकरावी वाणिज्य

## बर्लीनच्या महोत्सवात हयवदनचा विजयध्वज

भारत आणि पूर्व जर्मनी यांच्यात जो सांस्कृतिक करार झाला त्या करारानुसार बर्लीनच्या महोत्सवात आरती प्रभूंनी अनुवादित केलेल्या गिरीश कर्नाडांच्या 'हयवदन' चा प्रयोग यशस्वीपणे सादर झाला. बावीस देशांनी सादर केलेल्या पंचेचाळीस कलाप्रयोगात बेंजिंग ऑपेराखालील 'हयवदन' ची उत्कृष्ट व प्रभावी निर्मिती अशी वाखाणणी झाली. 'हयवदनाचा' प्रयोग इतका यशस्वी झाला की हजारो लोकांचा न संपणारा टाळ्यांचा कडकडाट झाला व अभिवादनासाठी कलाकारांना दहा वेळा जावे लागले. बर्लीनच्या महोत्सवात गाजल्या जाणाऱ्या रंगमंचीय प्रयोगात हयवदनचे यशस्वी दोन प्रयोग तर झालेच पण हयवदनला मिळालेला यापेक्षा महत्त्वाचा सन्मान म्हणजे ब्रिटीश थिएटर आकर्यिव्हजने या नाटकाचे विडियो मुद्रण करून घेतले आहे. हा मान 'हयवदन' च्या रूपाने प्रथमच भारतीय नाटकाला मिळत आहे.

***मिलन लोंढर*** अकरावी वाणिज्य

## साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेणारे गणितातील संशोधन

सध्या अमेरिकेत 'बेल' प्रयोग शाळेत काम करणारे भारतीय डॉ. नरेंद्र करमरकर यांनी कॉम्प्युटरने सोडविण्यास वेळ लागणारे प्रश्न अत्यंत त्वरेने सोडविण्याची पद्धत शोधून काढली आहे. ही पद्धत 'लिनीयर प्रोग्रॅमिंग' या वर्गात मोडणाऱ्या विविध प्रश्नांसाठी उपयुक्त अशी आहे. ही पद्धत 'सिंप्लेक्स' या ४० वर्षांपूर्वी शोधून काढलेल्या पद्धतीपेक्षा जवळजवळ ५० पटीनी अधिक जलद असल्याचे त्यांना प्राथमिक चाचण्यात आढळून आले आहे. या पद्धतीने अवघड, असाध्य असे प्रश्न शास्त्रीय आधारावर नेमके सोडविण्याची संधी शास्त्रज्ञांना प्राप्त झाली आहे.

***रुपाली लाटकर*** प्रथम वर्ष वाणिज्य

## नाट्य समीक्षक मेळावा

पहिला मराठी नाट्य समीक्षक मेळावा १ आणि २ डिसेंबर रोजी पुण्यात टिळक स्मारक मंदिरात नाट्यसंमेलनाच्या थाटात पार पडला.

मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र व गोवा येथून ७७ समीक्षकांनी यासाठी हजेरी लावली. जेव्हा समीक्षक प्रा. माधव मनोहर हे या मेळाव्याचे अध्यक्ष, उद्घाटक दिग्दर्शिका विजया मेहता व नाटककार विजय तेंडूलकर प्रमुख पाहुणे होते. 'समीक्षकाकडून रंगभूमीच्या अपेक्षा' आणि 'नाट्य समीक्षा प्रेक्षकांची अभिरुची घडवते का' या विषयावरील चर्चासत्र व जाहीर परिसंवाद; नाट्यसमीक्षा तंत्र-मंत्र या प्रबंधाचे वाचन, देशीविदेशी नाट्यसमीक्षेवरील निबंध व भाष्य; 'वृत्तपत्रीय धोरण आणि नाट्यसमीक्षा' यावरील चर्चासत्र हे मेळाव्याचे स्वरुप होते.

समीक्षा ही समीक्षा नसून ' रिपोर्टिंग ' असते, दलित रंगभूमीकडे समीक्षक दुर्लक्ष करतात, नाट्य समीक्षकानें प्रेक्षकांच्या मनात सांस्कृतिक वातावरण निर्माण केले पाहिजे. अ–नगार रंगभूमीची दखल घेतली जावी. कलाकाराची वाटचाल प्रथित व्हावी, समीक्षक हा सुजाण प्रेक्षक आहे, नाटकवाल्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे अशी विविध मते मेळाव्यातून पुढे आली.

सांस्कृतिक कार्य संचालक कमलाकर सोनटक्के यांचे, संकल्पित संग्राह्य पुस्तक छपाईचा खर्च आणि दहा समीक्षकांचा परप्रांतात अभ्यासवृत्ती ठेवून दौरा या दोन गोष्टींचा शासकीय पाठपुरावा करण्याचे आश्वासन ही या मेळाव्याची एक कमाई !

*विजय खवळे* द्वितीय वर्ष कला

## प्रभाकर पणशीकर–नाट्यसंमेलनाध्यक्ष

१३, १४, १५ जाने. १९८५ ला नागपूरमध्ये नाट्यसंमेलन झाले. त्यावेळी प्रभाकर पणशीकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

प्रभाकर पणशीकर यांचा जन्म एका व्युत्पन्न पंडीताच्या घरी झाला तरी नाट्यक्षेत्रात त्यांनी एक प्रतिथयश नट म्हणून नाव कमविले.

त्यांनी मो. ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतन संस्थेपासून नाट्य क्षेत्रातील कारकीर्द सुरु केली. उमेदवारीच्या या काळात तिथे पडेल ती कामगिरी केली. ' तो मी नव्हेच ' या नाटकापासून पणशीकर प्रकाशझोतात आले. ' लखोबा लोखंडे ' या भूमिकेनेच त्यांना नाट्यक्षेत्रात उदंड यश मिळवून दिले त्याशिवाय त्यांची औरंगजेबाची भूमिका तर चिरंजीव ठरणारी आहे. संभाजी इतकाच औरंगजेब स्मरणात राहिला. ' अश्रूंची झाली फुले ' ' कट्यार काळजात घुसली ' ' इथे ओशाळला मृत्यू ' ' मला काही सांगायचंय ' ' बीज म्हणाली धरतीला ' ' तीन लाखाची गोष्ट ' इ. नाटकांनी पणशीकरांना अमाप कीर्ती मिळवून दिली, ती त्यांच्या विलोभनीय लोभस, दिलखुलास व्यक्तिमत्वामुळेच !

*पंकजा पारकर* प्रथम वर्ष वाणिज्य

## गर्भरेशीम : इंदिरा संत

इंदिरा संतांच्या ' गर्भरेशीम ' या काव्य संग्रहाला यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. गेल्याच वर्षी याच काव्य संग्रहाला अनंत काणेकर पारितोषिक मिळाले होते.

' गर्भरेशीम ' ला हा लाभलेला पुरस्कार म्हणजे इंदिरा संतांच्या ' सहवास ' ते ' गर्भरेशीम ' या काव्यप्रवासाचाच सन्मान होय. १९३१ पासून संतांनी आपल्या काव्यलेखनाला सुरवात केली. प्रीती आणि निसर्ग हे त्यांच्या काव्याचे अविभाज्य घटक असून त्यांच्या कवितेत निसर्ग येतो तो प्रीतीच्या अभिव्यक्तीसाठीच. निसर्ग येतो तो केवळ वर्णनापुरता नाही तर त्यांच्या मनामध्ये जे रंगतरंग निर्माण होतात त्याच्या रुपात येतो. त्यांची कविता म्हणजे त्यांनी आपल्या दिवंगत सख्याशी चालविलेला अविरत संवाद होय. पतिच्या आकस्मिक निधनाचे दुःखच कविता झाले आहे. जीवनात आलेले रिकामपण भरून काढण्यासाठी त्यांनी आर्तपणाने कवितेचा पाठपुरावा केला. त्यामुळे त्यांच्या

काव्याचा गाभा विरहभावनेचा बनला आहे. पण या विरहभावनेंत शारीरिक आकर्षणाला स्थान नाही. निसर्गाच्या भव्य विराट रूपातून त्याना आपल्या सख्याचे रूप जाणवते. आणि मग ते कवितेतून शब्दबद्ध होते.

त्यांच्या कवितेत आशय आणि अभिव्यक्ती एकरूप झाल्याने भाषेला एक प्रकारचे तेज प्राप्त झाले आहे. त्यांच्या कवितेचे वेगळेपण पाहिले म्हणजे साहित्य अकादमीने केलेला त्यांच्या कवितेचा गौरव सार्थ वाटतो.

***शुभांगी नेने*** तृतीय वर्ष वाणिज्य

## अभिनेत्री : स्मिता पाटील

स्मिता पाटीलच्या चित्रपटांचा महोत्सव अलीकडेच फ्रान्समध्ये साजरा झाला. सत्यजित रे, मृणाल सेन यासारख्या दिग्दर्शकांच्यानंतर असा आंतरराष्ट्रीय पातळीवरील बहुमान मिळवणारी स्मिता पाटील ही पहिलीच भारतीय अभिनेत्री आहे. भूमिका, मंथन, चक्र, मंडी, भवनीभवई, बाजार, अर्धसत्य, उंबरठा असे तिचे अनेक चित्रपट गाजले. अभिनयाची राष्ट्रीय पारितोषिकेही तिला मिळाली. फ्रान्स महोत्सवामुळे एक अभिनेत्री म्हणून तिनं यशाचं शिखर गाठलं आहे. तसेच भारत सरकारने पद्मश्री हा किताब देऊन तिचा गौरव केला आहे.

***श्रीप्रभा राजोशिर्के*** प्रथम वर्ष, कला

## अनुताई वाघ–एक तळमळीच्या कार्यकर्त्या

यंदा २६ जानेवारीला अनुताई वाघ यांना पद्मश्री हा किताब बहाल करण्यात आला. महाराष्ट्रातील आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या अनुताई वाघ गेली तीस-पस्तीस वर्षे मिशनरी वृत्तीने अखंडपणे कार्य करीत आहेत.
बालवाडी, अंगणवाडीपासून आदिवासींतील प्रौढ शिक्षणवर्ग चालवणे असे त्यांचे विविध कार्य आहे.

कोसबाड येथे ताराबाई मोडक यांनी उभ्या केलेल्या कार्याची धुरा त्या सांभाळीत आहेत. १९७२ मध्ये आदर्श शिक्षक. १९७३ मध्ये दलितमित्र, १९७८ मध्ये त्यांना ' फाय ' पुरस्कार लाभला तर केंद्र शासनाने बालकल्याण क्षेत्रातील कामगिरीबद्दल वीस हजार रुपयांचे पारितोषिक देऊन गौरव केला.

व्रतस्थ राहून आदिवासींच्या जीवनात परीवर्तन घडवून आणण्याचं त्याचं कार्य निर्विवादपणे मोठे आहे. त्यामुळे यंदा पद्मश्री किताब शासनाने त्यांना बहाल करून त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला आहे.

***अश्विनी कुलकर्णी*** प्रथम वर्ष कला

## स्वरभास्कर भीमसेन जोशी

लोकप्रिय गायक श्री. भीमसेन जोशी यांना नुकताच पद्मभूषण किताब देऊन भारत सरकारने त्यांचा यथायोग्य गौरव केला. त्याचप्रमाणे एच्. एम्. व्ही. ने त्यांच्या संगितातील दीर्घ सेवेबद्दल ' प्लॅटिनम डिस्क ' देऊन गौरव केला.

भीमसेन जोशी हे किराणा घराण्यातील गायक असून गेली पन्नास वर्षे ते सातत्याने संगीताच्या क्षेत्रात आहेत. शास्त्रीय संगीतात ते आपल्या वैशिष्टचपूर्ण ख्याल गायकीमुळ लोकप्रिय झाले असले तरी त्यांना देवदुर्लभ अशी कीर्ती मिळाली ती त्यांच्या अभंगवाणीनेच. त्यांची अभंगवाणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचली आहे.

पद्मभूषण देऊन केलेला गौरव, एच्. एम्. व्ही. ने ' प्लॅटिनम प्लेट ' देऊन केलेला गौरव, स्वदेशात व परदेशात होणाऱ्या अनंत मैफिली, संतवाणीचे अलौकिक यश अशाप्रकारचे त्यांना मिळालेले देवदुर्लभ मानमरातब त्यांच्या गायकीचे श्रेष्ठपण सिद्ध करतात.

**कल्पना तावडे** प्रथम वर्ष कला

## शंकर पाटील– ५९ व्या संमेलनाध्यक्षपदी निवड

नांदेड येथे होणाऱ्या ५९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. शंकर पाटील यांची निवड झाली. त्यांना संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांचा उचित गौरवच आहे. गेली ४० वर्षे ते सातत्याने लेखन करीत असून मराठी साहित्याच्या प्रांगणात त्यानी आपले स्वत:चे वैशिष्टचपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

त्यांनी कथा-कादंबऱ्याप्रमाणे वगनाटच, चित्रपटकथा, पटकथा लेखनही यशस्वीपणे केले आहे. ' वळीव ' हा पहिला कथासंग्रह व ' हारफुला ' ही त्यांची पहिली कादंबरी. ' भेटीगाठी, ' ' आभाळ, ' ' धिंड, ' ' उन, ' ' बावरी शेंग, ' ' खुळ्याची चावडी ' ' पाहुणी ' ' फक्कड गोष्टी ' ' खेळखंडोबा ' ' ताजमहालमध्ये सरपंच ' असे एकाहून एक सरस कथासंग्रह. कथालेखनात त्यांचा हातखंडा आहे. त्यांची कथा प्रामुख्याने ग्रामीण जीवनाभोवतीच गुंफलेली असून ग्रामीण जीवनातील सुख-दु:खाचं वृत्तीप्रवृत्तीचं चित्रण करणारी आहे.

' गल्ली ते दिल्ली ' ' कथा अकलेच्या कांद्याची ' ' लवंगी मिरची कोल्हापूरची ' या सारखी वग-नाटचंही लोकप्रिय झाली आहेत. ' पिंजरा ' ' केला इशारा जाता जाता ' ' एक गाव बारा भानगडी ' ' छंद प्रीतीचा ' यासारखे त्यांची कथा-पटकथा-संवाद असलेले चित्रपटही खूप गाजले. याही क्षेत्रात शासकीय पुरस्कार मिळवून शंकर पाटलानी कमालीची लोकप्रियता मिळविली. याशिवाय त्यांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे ग. वि. अकोलकर व ग. प्र. प्रधान यांच्या सहकार्याने संपादित केलेली ' साहित्य सरिता ' ही वाचनमाला. शंकर पाटलाना अभिनयाचीही चांगली जाण आहे. काही चित्रपटात त्यानी भूमिकाही केल्या आहेत. त्याप्रमाणे कथाकथनातही प्रचंड लोकप्रियता संपादन केली आहे. कथाकथनामुळे त्यांचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहचले आहे.

आजच्या काळात व्यंकटेश माडगुळकरांनंतर अस्सल ग्रामीण साहित्यिक म्हणून त्यांचेच नाव घ्यावे लागेल. त्यांना लाभलेल्या अध्यक्षपदाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

**अंजली नलवडे** द्वितीय वर्ष कला

## ' बाकीबाब '

कविवर्य बोरकरांचे ८ जुलै १९८५ रोजी पुणे येथे निधन झाले. बाकीबाब गेले आणि मराठी सारस्वताच्या मंदिरातील मंदमंद पैंजणांच्या नूपुराचा ध्वनि हरवला. नादमयता आणि माधुर्य या गुणाना मराठी काव्य पोरके झाले.

बाकीबाबांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे नादमाधुर्यता-नादलालित्य.

गीतार–चित्रवीणा–चैत्रपुनव–दूधसागर या संग्रहातल्या कविता अधिकाधिक माधुर्याने भरलेल्या आहेत. माधुर्याप्रमाणे मंगलाची पूजा हे बोरकरांच्या काव्याचे आणखी एक वैशिष्टय आहे. त्यांच्या साहित्यावर कुठेही अभद्राचे सावट पडलेले नाही.

' तेथे कर माझे जुळती ' या कवितेतील जीवनमूल्ये त्यांच्या मनात सतत जागती होती. रविंद्रांच्या वृत्तीशी बोरकरांची वृत्ती समान होती. जगावर जीवनावर त्यानी अपरंपार प्रेम केले. कवितेप्रमाणे बोरकरांची लेखणी कथेच्या ललित निबंधाच्या क्षेत्रातही लीलया विहार करीत होती. रविंद्रनाथांचे चरित्र त्यानी लिहले त्याप्रमाणे मेघदूताचा अनुवाद त्यानी केला. आपल्या काव्याने त्यानी गीतांचा कवितांचा पाऊस पाडणारा अक्षय कांचन मेघ सतत मराठी रसिक मनावर बरसत ठेवला.

आपल्या कवित्त्वाचा त्याना मोठा अभिमान होता. कवीची व कवित्त्वाची मिरास त्यानी नेहमी सांभाळली. अशा विलोभनीय व्यक्तिमत्त्वाच्या कवीच्या निधनाने मराठी साहित्याची फार मोठी हानी झाली आहे. बोरकरांच्या स्मृतीला लाख लाख प्रणाम !

*शुभांगी सपे* द्वितीय वर्ष कला

## ग. ल. ठोकळ

सुप्रसिद्ध साहित्यिक ग. ल. ठोकळ यांचे २२ जुलै १९८४ रोजी हृदयक्रिया बंद पडून निधन झाले. ग्रामीण कादंबरीकार म्हणून लोकप्रियता लाभलेले ठोकळ सुरुवातीला कवी म्हणून पुढे आले. ' सुगी ' हा जानपद गीतांचा त्यांचा संग्रह विशेष गाजला.

' मैतरिणी भिंगीभिंगी चाल ' हे गीत तर खूपच लोकप्रिय झाले. त्यांच्या या ' सुगीने ' महाराष्ट्र साहित्यात जानपद गीतांचे नवे दालन उघडले गेले आणि ग्रामीण वाङ्मय हा मराठी साहित्याचा अविभाज्य घटक बनला.

' सुगी ' नंतर त्यांनी कथा व कादंबऱ्याही लिहिल्या. ' कडूसागर ' पासून ' मत्स्यकन्या ' पर्यंत लघुकथांचे दहा संग्रह प्रकाशीत झाले. त्यांच्या ' ठोकळ गोष्टी ' भाग १ ते १५ या कथासंग्रहाच्याही अनेक आवृत्या निघाल्या. त्यांच्या कथांनी वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतला तर त्यांच्या ' गावगुंड ' या पहिल्याच कादंबरीने अपूर्व लोकप्रियता संपादन केली. त्याचप्रमाणे ' टेंभा ' आणि ' ठिणगी ' या कादंबऱ्याही वैशिष्टयपूर्ण ठरल्या.

त्यांच्या कथा कादंबऱ्यांचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे त्या जीवनाच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या असून ग्रामीण जनतेच्या मनाचा मागोवा घेणाऱ्या आहेत, ' गावगुंड ' मधून ४२ च्या चळवळींच्या संदर्भात खेड्यातील धगधगीत अस्मितेचे जीवनदर्शन घडते तसेच त्यांच्या कादंबऱ्यातून खेड्यापाड्यातील रंगेलपणा ओसंडून वहातो आहे.

त्यांच्या या वाङ्‌मयीन कामगिरीबद्दल त्यांना ग्रामीण वाङ्‌मयाच्या प्रवक्त्यांचा व आद्य प्रवर्तकांचा मान दिला पाहिजे. 'कशासाठी पोटासाठी' हे नाटकही त्यांनी लिहिले. पाच बोलपटांच्या कथा त्यांनी लिहिल्या. इयत्तावर भूगोल विषयाची भूमिक पुस्तके रचण्याची कामगिरी यशस्वीपणे पार पाडली. खांडेकरांच्या सहाय्याने रचलेली 'मंगल वाचनमाला' निर्विवाद अजोड ठरली. 'श्री लेखन वाचन भांडार' हे पुस्तकाचे दुकान काढले. वाङ्‌मयीन क्षेत्रात जशी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली त्याप्रमाणे प्रकाशनाच्या क्षेत्रातही महत्त्वपूर्ण कामगिरी केली. ठोकळ प्रकाशनाच्या वतीने त्यांनी आतापर्यंत चारशेवर वाङ्‌मयीन पुस्तके प्रकाशित केली. विठ्ठल रामजींचे समग्र वाङ्‌मय प्रकाशात आणले. त्याचप्रमाणे राजर्षि शाहूंचा मोठा चरित्रग्रंथ प्रकाशित केला. असा हा शारदेच्या दरबारातील अष्टपैलू मोहरा काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावला आहे. या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास त्रिवार वंदन.

**आनंद प्रभुदेसाई** तृतीय वर्ष वाणिज्य

## अनिल बर्वे : मराठी साहित्यातील एक वेगळे व्यक्तिमत्व.

अनिल बर्वे यांचा मृत्यू अवघ्या ३७ व्या वर्षी झाला आणि मराठी साहित्याच्या क्षितिजावरील एक तेजस्वी तारा अकस्मात गळून पडला. 'महाविद्यालयीन जीवनात जहाल राजकारणाचा पुरस्कार त्यांनी केला व देशातील आर्थिक विषमता व शोषण नष्ट करावयाचे असेल तर सशस्त्र क्रांती केली पाहिजे हा दृष्टिकोन समोर ठेऊन त्यांनी नक्षलवादी चळवळीचे समर्थन केले. त्यासाठी त्यांना कारावास भोगावा लागला.' अनिल बर्वे मराठी साहित्याच्या प्रांगणात परिचित झाले ते त्यांच्या 'थँक यू मिस्टर ग्लाड' या कादंबरीने. यातील नायक नक्षलवादी असून या नायकाच्या अंतःकरणातील धगधगीत ध्येयवादाचा आविष्कार त्याच्या जीवनात कसा होतो याचे चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे 'डोंगर म्हातारा झाला' 'अकरा कोटी गॅलन पाणी' या त्यांच्या कादंबऱ्याप्रमाणे 'हमीदाबाईची कोठी,' 'आकाश पेलताना,' 'मी स्वमी या देहाचा,' 'पुत्रकामेष्ठी' ही त्यांची चित्तवेधक नाटकेही रंगभूमीवर गाजली आहेत. चासनाला खाण अपघातावर त्यांनी एक वास्तव अशी लेखमालाही लिहिली. त्यांच्या 'कोलंबस वाट चुकला' या पुस्तकास नेहरु पारितोषिक व व पत्रकारीतेसाठी डहाणूकर पारितोषिक त्यांना मिळाले. बर्वे यांच्या लेखनाने त्यांच्या साहित्यबद्दलच्या फार मोठ्या अपेक्षा रसिकात निर्माण झाल्या होत्या. पण या प्रतिभावंतावर अल्पवयातच काळाने झडप घातली.

**अविनाश खडपकर** द्वितीय वर्ष कला

## पु. ग. सहस्त्रबुद्धे

दि ४ मार्च ८५ रोजी पु. ग. सहस्रबुद्धे यांचे पुणे येथे अल्पशा आजाराने वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. पु. ग. सहस्रबुद्धे हे मराठीतील एक नामवंत समीक्षक, विचारवंत वक्ते, निबंधकार होते. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षक व अध्यापक म्हणूनही त्यांनी नाव कमावले होते मराठीतील पहिली पी. एच्‌डी. मिळवणारे ते पहिलेच माध्यमिक शिक्षक होते. 'स्वभावलेखन' हा त्यांचा प्रबंध 'पराधीनसरस्वती' 'महाराष्ट्र सारस्वत' 'साहित्यातील जीवनभाष्य,' 'भारतीय लोकसत्ता,'

'राजविद्या,' 'माझे चिंतन,' 'विज्ञानप्रणित समाज रचना' इ. त्यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ. काही ग्रंथांना राज्य शासनाची परितोषिकेही मिळाली होती. ते स्वभावतः धर्मनिष्ठ व इहवादी होते. त्यांच्या निधनाने वैचारिक क्षेत्रातील एका उत्तुंग व्यक्तीमत्त्वाला महाराष्ट्र पारखा झाला आहे.

***वनिता मेस्त्री*** अकरावी वाणिज्य

## दुर्मिळ तत्त्व चिंतक : दे. द. वाडेकर

'मराठी तत्त्वज्ञान महाकोश' या त्रिखंडात्मक ग्रंथाचे कल्पक, योजक आणि प्रमुख संपादक प्रा. देवीदास दत्तात्रय वाडेकर हे ५ मार्च १९८५ रोजी पुणे येथे निधन पावले. वाडेकर हे तत्त्वज्ञानाचे एक ख्यातनाम प्राध्यापक होते. १९६९ साली धारवाड येथे भरलेल्या आखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेचे ते अध्यक्ष होते. त्या आधी दोनदा विभागीय अध्यक्ष होते.

वाडेकरांची विशेष प्रसिद्धी त्यांच्या व्यवस्थितपणाबद्दल होती. मराठीत तत्त्वज्ञानमहाकोशांची पद्धत कशी असावी याबद्दल छोटेखानी चार पुस्तकेही लिहिली आहेत. 'मराठी तत्त्वज्ञान महाकोश' या कोशवाङ्मयाची निर्मिती करून मराठी वाचकास वाडेकरानी उपकृत केले आहे. त्यांच्या या प्रदीर्घ कार्यामुळे ते मराठी माणसांच्या दीर्घ काळापर्यंत स्मरणात रहातील.

***मिनाक्षी तारकर*** बारावी वाणिज्य

## अजरुद्दीन : क्रिकेट मधील एक झंझावाती तुफान

क्रिकेट हा भारतीयांचा अत्यंत आवडता खेळ. या क्रिकेटच्या खेळात अजरुद्दीनने आपल्या अपूर्व कर्तृत्वाने, पराक्रमाने भारताचं नाव क्रिकेटच्या जागतिक इतिहासात अजरामर केले.

विश्वनाथच्या भरवशाच्या फलंदाजीनंतर भारतीय क्रिकेट संघात मधल्या फळीतील भक्कम आणि भरवशाच्या फलंदाजाची उणीव अजरुद्दीनने क्रिकेट संघात पदार्पण केल्याबरोबर भरून काढली.

१९८४-८५ या वर्षातील नुकत्याच पार पडलेल्या भारत विरुद्ध इंग्लंड यांच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत तिसऱ्या कसोटीसाठी मोहंमद अजरुद्दीन या हैद्राबादच्या अवघ्या २५ वर्षांच्या तरुणाची निवड झाली. भारताचे पहिले तीन खंदे वीर अवघ्या २७ धावात तंबूत परतले आणि अशा या कठीण परिस्थितीत संघाच्या धावसंख्येवर चांगला आकार देण्याची जबाबदारी घेऊन हा नवोदित युवक मैदानावर आला. आणि न भूतो असा पराक्रम करुन भारताचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविले. तिसऱ्या कसोटीत महत्त्वाची जबाबदारी घेऊन आलेला हा नवयुवक. याने त्याच्या पहिल्या कसोटीत अत्यंत संयमाने कौशल्यपूर्ण खेळ करुन शतक झळकाविलेच. पण त्यापुढील लागोपाठच्या दोन कसोटीतही शतके काढली. क्रिकेटमधील सर डॉन ब्रॅडमन आणि गॅरि सोबर्स यांचे पराक्रम अजरुद्दीनच्या लागोपाठच्या तीन शतकानी फिके झाले आहेत. जागतिक क्रिकेटच्या

इतिहासात अजरुद्दीनने पदार्पण करताच लागोपाठ दमदार तीन शतके झळकविलेली ही तीन शतके सोनेरी पान ठरली आहेत.

पुढील क्रिकेट कसोटीतून त्यांनी अशीच अतुलनीय कामगिरी करावी ही सदिच्छा.

***अनघा कुलकर्णी*** बारावी वाणिज्य

## बिलीयर्ड: मायकेल परेरा

क्रिकेटमध्येच भारताने नाव कमावले आहे असे नाही तर बिलीयर्ड सारख्या अपरीचित खेळामधेसुद्धा मायकेल परेरा या भारतीयाने जागतिक किर्ती मिळवली आहे. भारतात हा खेळ खेळला जात नसतानाही सतत चार वर्षे भारताला अजिक्यपद मिळवून दिले. ही त्यांची कामगिरी निश्चितच भूषणावह आहे. परंतु त्यांच्या या कामगिरीची कदर भारतीयाकडून केली जात नाही. त्याला विशेष मान-सन्मान मिळत नाही. ही एक खेदाचीच गोष्ट म्हणावी लागेल.

***कामिनी जोशी*** बारावी वाणिज्य

## भारताचा अतुलणीय विजय : बेन्सेन अँड हेजेस जागतिक क्रिकेट स्पर्धा

विश्वचषकापाठोपाठ भारतीय क्रिकेट संघाने आशियाई कप जिंकून आपले श्रेष्ठत्व सिद्द केले आणि ऑस्ट्रेलिया येथे भरलेल्या ' बेन्सेस अँड हेजेस ' स्पर्धेत भारताने अद्वितीय पराक्रम करून सुवर्णचषक जिंकला. एक दिवसाच्या आंतरराष्ट्रीय सामन्यामध्ये भारताने सर्व देशास धूळ चारून आपले श्रेष्ठत्व एकदा नव्हे तीनदा सिद्ध केले. भारतीय संघातील रवि शास्त्री या अष्टपैलू खेळाडूस ' मालिकेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ' हा बहुमान मिळाला. शिवाय बक्षिसादाखल ऑडि कार मिळाली.

– ***मिलींद केळकर*** द्वितीय वर्ष कला

## पंजाब प्रश्न

गेल्या दोन वर्षापासून सुरू झालेली ही खलिस्तान चळवळ म्हणजे भारतीय राजकीय इतिहासाला लागलेले एक मोठे गालबोटच होय.

प्रथमत: खलिस्तानवाद्यांच्या मागण्या ह्या काहीशा धार्मिक होत्या. आकाशवाणीवर शिखधर्मिय कार्यक्रमास प्राधान्य असावे. चंदीगड शहर पूर्णपणे पंजाबची राजधानी म्हणून ओळखले जावे आणि पाणी वाटप. या सुरूवातीच्या मागण्यांनी अतिरेक्यांच्या विचारसरणीने उग्र स्वरूप धारण केले आणि सामाजिक दुर्घटनांना प्रारंभ झाला. पंजाबमधील समाजजीवन विस्कळीत झाले. अस्थिर झाले. या अतिरेक्यांनी आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी दहशतवादाचा उपयोग केला. यावेळी दहशतवाद्यांवर सरकारने कडक कारवाईचे धोरण अवलंबिल्यामुळे या चळवळीस उग्र धार्मिक स्वरूप प्राप्त झाले. धर्मावर संकट आले आहे असा प्रचार करून आनंदपूर येथे सर्व शिख धर्मगुरुना एकत्र बोलावून ठराव संमत केला.

भारतापासून पंजाब वेगळे असावे असे ठरवून स्वतंत्र राष्ट्र म्हणून खलिस्तानची घोषणा केली गेली. संरक्षण व परराष्ट्र या बाबी वगळता सर्वाधिकार राज्याकडे

असावेत अशी मागणी केली आणि या मागणीने खलिस्तानच्या चळवळीने उग्र आणि हिंसक रूप घेतले. हिंसाचार वाढला. दारुगोळा व शस्त्र यांचा सर्रास वापर होऊ लागला.

अतिरेक्यांची ही मागणी कोणत्याही भारतीय मनाला मान्य होणारी नव्हतीच. शिवाय सामान्य शिख माणसांना हे अस्थिर जीवन व हा सवतासुभा मान्य नव्हता. यामुळे भारताचे विघटन न होता पंजाबातील सामान्य माणसाला सुस्थिर जीवन लाभावे हिंसाचार थांबवावा यासाठी केंद्र सरकारने अमृतसर येथे लष्कर आणून सुवर्ण मंदिरात घुसलेल्या अतिरेक्यांचा पूर्ण बिमोड केला. अतिरेकी प्रमुख भिंद्रानवाले लष्करी कारवाईत मारले गेले. या खलिस्तानवाद्यांच्या मागण्या अमान्य करून भारताचे अखंडत्व कायम राखले ते त्यावेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनीच.

– **राजेंद्र हिंदळेकर** तृतीय वर्ष कला

## एका तेजस्वी युगाचा अंत: इंदिरा गांधींचे निधन

३१ आक्टो. १९८४ रोजी इंदिरा गांधी यांची स्टेनगनने तीस गोळया झाडून अमानुष हत्या केली गेली.

प्राणरक्षकच प्राणभक्षक बनले आणि देशाच्या या खंबीर कर्तृत्ववान नेतृत्वाचा केसाने गळा कापला गेला. ही अमानुष हत्या म्हणजे मानवतेला काळीमा फासणारे असे जगाच्या इतिहासातील अत्यंत वाईट कृत्य ठरले.

श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची धुरा समर्थपणे गेली १८ वर्षे सांभाळली. त्यांचे कार्य हे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या तोडीचे होते. समर्थ भारत बनविण्यासाठी, बँकांचे राष्ट्रीयप्रकरण, मुंबईतील कापडगिरण्यांचे राष्ट्रीयकरण केले. पोखरान येथे यशस्वी अणू चाचणी होऊन जगास धक्का दिला. पूर्व पाकिस्तानातील जुलमी राजवट उलथून टाकण्यासाठी सक्रिय मदत केली व स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती करून स्वतंत्र देश म्हणून भारताने त्याला प्रथम मान्यता दिली. इंदिराजींचे कार्य ते भारतीय संस्कृतीला साजेसे तर आहेच पण या कार्याने त्यांना जागतिक नेता बनविले. नंतर अलीप्रतेच्या धोरणाचा पुरस्कार केला आणि त्यांच्या कार्याने भारताला अलिप्तराष्ट्र चळवळीचे अध्यक्षपद प्राप्त झाले.

केवळ राजकीय घटनामधेच गुंतून न पडता इतर घटनावरही त्यानी आपले लक्ष केंद्रित केले. एशियाड स्पर्धा यशस्वीपणे घेऊन भारताचे जागतिक स्पर्धा घेण्याचे सामर्थ्य जगाला दाखवून दिले. क्रीडा क्षेत्राबरोबरच अवकाश तंत्रज्ञानात विशेष रस घेऊन रोहिणी, आर्यभट्ट वगैरे उपग्रह सोडण्यास भारतीय शास्त्रज्ञांना प्रोत्साहित केले. अंटार्टिका मोहीम यशस्वीपणे पार पाडली. पणजी येथे राष्ट्रकुल परिषदेचे आयोजन केले. त्यावेळी सुमारे १० देशांचे राष्ट्रप्रमुख भारतात राष्ट्र परिषदेस उपस्थित होते. त्यांची उपस्थिती ही केवळ त्यांच्या वजनदार कर्तृत्वाची द्योतक होती.

अशा या जागतिक लोकप्रियता लाभलेल्या कणखर स्त्रीस भारताचे अखंडत्व

राखण्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान करावे लागले. असे म्हटले तर अवाजवी ठरणार नाही आणि त्यांचे यशस्वी कार्य पाहून म्हणावेसे वाटते–

' रे हिंद बांधवा थांब या स्थळी
अश्रु दोन ढाळी '
ही पराक्रमाची ज्योत मावळे–

*वनिता रहिंडळेकर* तृतीय वर्ष कला

## महाराष्ट्राचा एक तेजस्वी मोहरा हरपला : यशवंतराव चव्हाण–

इंदिरा गांधींच्या निधनानंतर थोड्याच अवधीत महाराष्ट्राचा एक तेजस्वी मोहरा हरपला. यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाने स्वतंत्र्योत्तर महाराष्ट्रातील एक दैदिप्यमान पर्व समाप्त झाले.

यशवंतरावांचा जन्म सातारा जिल्ह्यात एक गरीब कुटुंबात झाला. पण कष्ट, जिद्द, आणि आईने केलेला स्वाभिमानी जीवनाचा संस्कार या गोष्टींनी त्यांनी आपले कर्तृत्व घडवले. १९३० साली मॅट्रीकच्या वर्गात असतानाच महात्मा गांधींच्या हाकेला ओ देऊन सत्याग्रह केला. स्वातंत्र्य आंदोलनात धडाडीने काम केले. नंतर ते भूमिगत झाले. पुढे क्रांतीसिंह नाना पाटलांच्या पत्री सरकारमध्ये काम केले. सन १९४६ साली ते मुंबई असेंब्लीवर निवडून आले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत त्यांचा महत्वाचा वाटा आहे. ५७ ते ६२ च्या काळात मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे. त्यांना आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार मानले जाते. त्यांनी मंत्री मंडळात ग्रामीण नेतृत्वाला स्थान दिले.

महाराष्ट्रात सहकारी कारखाने–सहकारी बँका यांचे जाळे निर्माण केले.

भारताचे संरक्षण मंत्री म्हणूनही त्यांची कामगिरी प्रशंसनीय आहे. १९६२ साली चिनी आक्रमणानंतर पंतप्रधान नेहरूंनी त्यांना संरक्षणमंत्री म्हणून बोलावून घेतले त्यावेळी या घटनेचे वर्णन ' हिमालयाच्या मदतीस सह्याद्रि धावून गेला ' असे केले होते. त्यांनी संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री, उपपंतप्रधान अशा विविध भूमिका बजावल्या. ते कुशल प्रशासक होते. राजकीय क्षेत्रात सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. समाज परिवर्तन झाले पाहिजे हा त्यांचा दृष्टीकोन होता.

ते केवळ राजकारणी नव्हते तर ते एक दर्जेदार साहित्यिक होते. आपले आत्मचरित्र तीन खंडात लिहिण्याचा त्यांनी संकल्प सोडला होता ' कृष्णाकाठ ' चा प्रथम खंड प्रकाशित झाला, आणि त्यांच्या निधनाने हा त्यांचा संकल्प अपूर्ण राहिला पण तरीही हा आत्मचरित्राचा पहिला खंडच मराठी साहित्याचा अलंकार ठरेल यात शंका नाही. ते केवळ साहित्यिक नव्हते तर साहित्यावर त्यांचे अलोट प्रेम होते. त्यांचे ग्रंथप्रेम हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विलोभनीय पैलू होता.

यशवंतरावांच्या निधनाने आज देश कुशल–मुत्सद्दी, व्यापकदृष्टीचा नेता, रसिक, श्रेष्ठ साहित्यिक, उत्तम वक्ता अशा विविध, बहुरंगी व्यक्तिमत्त्वाला मुकला आहे असे म्हणावे लागेल.

*चित्ररेखा पाटणकर* द्वितीय वर्ष वाणिज्य

## भोपाळ येथील भीषण दुर्घटना

इंदिरा गांधींच्या निर्घृण हत्येमधून देश सावरतो न सावरतो तोच ४ डिसेंबर १९८४ रोजी भोपाळ येथे विषारी वायुमुळे दोन हजारापेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडले. तेथील भरवस्तीमध्ये असलेल्या युनियन कार्बाईडच्या कारखान्यात रात्रीच्या वेळी मिथेल आईसोसिनेट वायू टाकीतून बाहेर पडून गळू लागला आणि संपूर्ण भोपाळवर या वायूच्या रूपाने मृत्यू पसरला. त्यानंतर भोपाळच्या ज्या ज्या बातम्या आल्या त्या अतिशय हृदयविदारक आहेत. वायू पसरतो आहे आणि धोकादायक भोंगा वाजविला जातोय. माणसं जिवाच्या आकांताने धावताहेत, रस्त्यात प्रेतांचा खच पडला आहे. काही झोपलेल्या अवस्थेतच मरून पडली आहेत. प्रेतांवर घालायला पांढरे कापडही शिल्लक नव्हते. तर स्मशानभूमीत दहन–दफनासाठी जागा नव्हती.

असा भीषण नरसंहार भोपाळमध्ये या मिथेल आईसोसिनेट वायुमुळे घडून आला. याला जबाबदार कोण ?

हजारो निरपराध व्यक्ती मृत्युमुखी पडल्या तर शेकडो जीव अपंग झाले. इतक्या मोठ्या कारखान्यात अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन सुरक्षिततेसाठी आवश्यक ती उपाय योजना केली गेली नव्हती. अमेरिकेचे नियंत्रण असलेल्या या युनियन कार्बाईडच्या कारखान्यात कॉम्प्युटर नसावा हाच मुळी गंभीर स्वरुपाचा गुन्हा नाही का ?

आता यथावकाश हे संकट अस्मानी की सुलतानी ते ठरेल परंतु आता या अपघातामुळे तरी सरकारने यापुढे असे अपघात होऊ नयेत यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. भोपाळच्या या अपघातात होरपळून निघालेल्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी शब्द अपुरे पडतील.

– ***शैलजा मांजरेकर*** तृतीय वर्ष वाणिज्य

## १९८४ ची लोकसभा निवडणूक

भारतीय आठवी लोकसभा निवडणूक ' न भूतो ' अशी झाली. सत्ताधारी पक्षाला अनपेक्षित पाशवी बहुमत मिळाले. १९५७ साली नेहरुंच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पक्षाला जितके बहुमत मिळाले होते त्यापेक्षा कितीतरी जास्त बहुमत राजीव गांधींच्या कॉंग्रेस पक्षाला मिळाले. कॉंग्रेस पक्षावर अक्षरशः मतांचा पाऊस पडला. इंदिरा गांधींची भीषण हत्या आणि देशातील फुटीर प्रवृत्ती. या परिस्थितीने राजीव गांधींचे पारडे तुल्यबळ ठरले. केवळ इंदिराजींचे निधन, फुटीर वृत्ती एवढ्याच गोष्टी सत्ताधारी पक्षाच्या ' न भूतो ' विजयाला कारणीभूत ठरल्या नाहीत तर विरोधी पक्षाची होऊ न शकलेली एकजूट, त्यांचे काहीसे आडमुठे, अहंकारी नेतृत्त्वही याला जबाबदार आहे. विरोधी पक्षांच्या अवास्तव कल्पना, जागावाटपाबाबतचे झालेले मतभेद, ' मैत्रीपूर्ण लढती ' हा स्वतःची व लोकांची फसवणूक करणारा शब्द. यामुळे या लोकसभेच्या निवडणुकीत विरोधी पक्षांनी जनमानसाचा विश्वास गमावून स्वतःचे पानिपत करून घेतले.

***सुनिता कुलकर्णी*** तृतीय वर्ष वाणिज्य

# प्राक्तन

चित्ररेखा पाटणकर
प्रथम वर्ष वाणिज्य.

गुलमोहरच्या मादक फुलांचा गंध शीतल लहरीत एकरूप होत होता. सागराच्या लाटा किनाऱ्याशी तांडवनृत्य खेळत होत्या. सायंकाळी दिवसभर झगडून दमणारी पाखरे आपल्या घरट्याकडे किलबिलाट करत जात होती. क्षितिजावर रंगमैफल जमली होती. रविराज अस्ताला जात होता. वातावरण आल्हाददायक होतं आणि त्या वातावरणाचा आस्वाद लुटत सागरकिनाऱ्यावर बसली होती रेशमा !

हळूहळू सायंकाळ होतेयं, घरी जायला हवं. अभिजित आता दमून येईल. त्याला काहीतरी खायला करायला हवं, पण रेशमाचं मन मात्र त्या जागेवरून उठण्यास तयार नव्हतं. तिला त्या एकाकीपणी साऱ्या स्मृती आठवत होत्या. त्या तिच्या मनाला प्रत्येक क्षणी जबर जखमा करून जात होत्या.

एक वाऱ्याची नाजुकशी लहर आली आणि रेशमा पुलकीत झाली; पण क्षणात भानावर आली. तिचे पाय आपोआपच बंगल्याकडे वळले. अभिजित तर आला नसेल ना ? आला असला तर मात्र मी घरात नाही असे पाहून माझ्यावर रागवेल. जितेंद्र शाळेतून आला असणार.

' मम्मी...मम्मी...! ' जितेंद्र धावत आला. आणि रेशमाच्या कमरेला त्याने विळखा घातला. ' मम्मी, मला भूक लागलीय ' ' बाळ भूक लागलीय ना ? चल घरात. '

रेशमाने दिलेले गरम दूध पिऊन जितेंद्र नेहमीप्रमाणे खेळायला निघून गेला.

रेशमा जेवणाच्या तयारीला लागली. इतक्यात टॅक्सीचा हॉर्न ऐकू आला. अभिजितने घातलेली ती एक प्रकारची सादच होती, त्याच्या आगमनाची !

रेशमा बाहेर आली पण आजचा अभिजित नेहमीचा नव्हता. तो काहीही न बोलता घरात आला. रेशमा त्याच्या वागण्याचा अर्थ समजू शकत नव्हती.

' अभिजित, कॉफी हवीय ना ? '

' होय. '

रेशमाने बिस्कीटस् आणि कॉफी अभिजितला दिली. त्याने ती घेतली पण त्याच्या वागण्यातला फरक तिला चांगलाच जाणवला. का कोण जाणे, हे दोन दिवस काही वेगळंच घडत होतं.

अभिजित आणि रेशमा यांचा प्रेमविवाह झाला होता. खरं तर त्यांच्या विवाहाला रेशमाच्या माहेरच्या कुणाचीच परवानगी नव्हती. कारण त्यावेळी अभिजित हा एक मध्यमवर्गीय होता तर रेशमा ही अतिशय श्रीमंतीत वाढलेली गोंडस मुलगी होती.

अभिजित पैशाने श्रीमंत नसला तरी तो मनाने श्रीमंत होता. बुद्धीने श्रीमंत होता. रेशमासारख्या श्रीमंत तरुणीने आपल्या गुणावर आशक होऊन आपल्याशी विवाह केलाय याची त्याला जाणीव होती. तिला जपण्याचा तो प्रयत्न करीत होता आणि रेशमा त्याच्या प्रेमाच्या सावलीत आपली संसारवेल फुलवीत होती.

अभिजित नोकरी करीत करीत खूप शिकला आणि एक नामवंत वकील झाला. घरात भरपूर पैसा येऊ लागला. हळूहळू त्याच्या आचार-विचारात बदल होऊ लागला.सेवेला नोकर-चाकर, अनेक प्रकारच्या साड्या. इत्यादींनी तिच्या श्रीमंतीत भर टाकली होती.

त्यांच्या उत्कट प्रेमाची पूर्तता जितेंद्रने केली होती, त्याने रेशमाचा गोरा गव्हाळी रंग आणि अभिजितचे गोंडस रूप घेतले होते. त्याचे पिंगट केस. निळे डोळे आणि लाल ओठं पहाणाऱ्याला क्षणभर तरी स्मिमित करत. अभिजित-रेशमा प्रमाणेच तो सुद्धा अतिशय हुषार होता. जितेंद्र एक दिवस जरी दिसला नाही तरी अभिजीतला क्षणभरही चैन पडत नसे. आणि त्याच अभिजितच्या मनावरचा ताबा सुटून त्याला तो डोळ्यापुढेही नकोसा होऊ लागला होता.

अभिजितचं दिवसेंदिवस वाढत जाणारं बेबंद वागणं रेशमाला असह्य होत होतं. तिचं मन दिवसेंदिवस कोमेजून जात होतं. आणि याला एकमेव कारण म्हणजे अभिजितला लागलेलं व्यसन...

अभिजित एक वकील होता. साहजिकच त्याची उठबस मोठ्या लोकात होऊ लागली. पण दुर्दैवाने त्याला मित्र चांगले लाभले नाहीत. त्या मित्रांच्या वेळोवेळी होणाऱ्या पार्ट्यांमध्ये तो कधीच सहभागी होत नसे, तरीही त्याच्या जीवनात आलेला एक दिवस त्याच्या संपूर्ण आयुष्याचा वैरी ठरला...

एकदा ते सारेजण फिरायला निघाले असता वाटेतच अभिजितचं लक्ष सहज एका दुकानाच्या पाटीवर गेलं 'प्रशांत बिअर बार !' पण त्याने तिकडे दुर्लक्ष केलं. कारण त्या मादक पेयांचा त्याने आपल्या ओठांना कधीच स्पर्श होऊ दिला नव्हता.

" अभिजित आजपर्यंत तू आमचं ऐकलं नाहीस पण आज तू आम्हाला कंपनी दिलीच पाहिजेस." एक मित्र.

अभिजितला काहीही बोलू न देता त्यांनी ओढतच त्याला आपल्याबरोबर नेले आणि आपल्यामध्ये धरून बसवले. अभिजितचा अगदी नाईलाज झाला.
" चिअर्स... चिअर्स..."

पार्टी ऐन रंगात आली होती. एका मित्राने पुढे केलेला पेला त्याने नाईलाजास्तव हातात घेतला. क्षणभर तो त्या पेल्याकडे पहातच राहिला आणि दुसऱ्या क्षणी त्याने तो पेला ओठांना लावला. त्या पेयाने त्याच्या घशाची जळजळ झाली. पण क्षणभरच ! ती चव त्याला हवीशी वाटू लागली आणि हाच मोहाचा क्षण त्याचा आणि त्याच्या संसाराचा वैरी ठरला.

अभिजितचे हे व्यसन दिवसेंदिवस वाढत गेले. याबरोबर त्याला जुगाराचंही भयंकर व्यसन लागलं. आज त्याने कशीबशी टॅक्सी आणली. ' आज खूप उशीर झालाय. ' अभिजित कसा आला नाही, या विचाराने रेशमा व्याकूळ झाली. त्याला ही व्यसने सोडून देण्यासाठी रेशमा खूप समजावीत होती पण अभिजितचा सारा समंजसपणा दारुच्या पेल्यात आणि पत्त्यांच्या डावात बुडून गेला होता.

अभिजितच्या व्यसनांचा त्याच्या वकीलीवर भयानक परिणाम झाला होता. त्याच्याकडे येणाऱ्या केसीस थांबल्या होत्या आणि तो दिवसच्या दिवस व्यसनाधीन होऊन बाहेर रहात होता. साहजिकच घरात येणारी पैशाची गंगा कोरडी पडू लागली. त्याच्या बेबंद वागण्याने घरातले नोकरचाकर निघून गेले. एकेक वस्तू विकली जात होती. त्याची कारही त्याच्या व्यसनापायी विकली गेली.

' रेशमा, गोदरेजच्या कपाटाची किल्ली दे लवकर ' अभिजित.

' मिळायची नाही ' रेशमा.

कधी नव्हे ते रेशमाने ठणकावून सांगितले. अभिजितला नशा पूर्णपणे चढली होती. रेशमाच्या शब्दांनी त्याच्या डोक्यात खून चढला. त्याने जवळचे स्टूल उचलले आणि रेशमाच्या दिशेने भिरकावले पण रेशमाच्या सुदैवाने ते बाजूला पडले. इतक्यात ' मम्मी .. मम्मी ' अशा हाका मारीत जितेंद्र शाळेतून आला. त्याने हे सारे पाहिल्यावर तो वडिलांना ' पप्पा...पप्पा ' अशा हाका मारीत त्यांना जाऊन बिलगला. पण अभिजितच्या

नजरेला आपला मुलगा दिसलाच नाही. त्याने चिडून त्याला लाथेने उडवून दिले.

असं काही होईल अशी रेशमाने स्वप्नातही कल्पना केलेली नव्हती. पण आज ते सारं प्रत्यक्ष घडत होतं. अभिजितने रेशमाला दिलेलं वचन दारुड्याच्या पेल्यात केव्हाच विरुन गेलं होतं. तिच्या खऱ्याखुऱ्या प्रेमाशी त्याला दारुच्या पेल्याने बेईमान व्हायला लावलं होतं.

जीवनात काही गोष्टी फार वेगळ्या असतात. अशा गोष्टींचे निर्णय आपणच घ्यायचे असतात. अभिजितला दारुचं व्यसन त्याच्या मित्रांनी लावलंही असेल पण आपल्या आयुष्याचा विचार अभिजितनेच करायला हवा होता. तो स्वतःच्या हाताने त्याची फुलणारी संसारवेल नकळतपणे उपटून टाकीत होता.

रेशमा रोज त्याच्या काळजीने झुरत होती. तिने त्याला खूप समजावले पण तो ऐकत नव्हता. आता तिला जितेंद्रची काळजी फार वाटत होती. ह्या निष्पाप, निरागस बालकाचं जीवनही कधीच फुलणार नाही का? ते असेच कोमेजून जाणार की काय या धास्तीने ती थकली होती. रेशमाने मनात रचलेले स्वप्नांचे मनोरे पार ढासळून गेले होते. माणसाने मनात रंगवलेली स्वप्नं एकदा विरुन गेली की त्याचं दुःख त्याला आयुष्यभर करावं लागतं. अशा गोष्टी दुसऱ्यांना सांगून उपयोग नसतो. आपली दुःखं आपल्यापाशीच ठेवावी लागतात.

आता त्यांची परिस्थिती फारच खालावली होती. चांगले अन्न आणि चांगल्या कपड्याला ती कधीच पारखी झाली होती पण दोन वेळ पोट भरण्याचीही त्यांना विवंचना होती. जितेंद्रला ती आवश्यक त्या गोष्टी पुरवू शकत नव्हती.

जितेंद्र शाळेतून आला. ' मम्मी ... मला भूक लागलीय. ' रेशमाने डब्यात उरलेली दोनच बिस्किटे व पाण्याचा ग्लास त्याच्यापुढे ठेवला. काहीही न बोलता ती बिस्किटे खाऊन व वर पाणी पिऊन तो अभ्यासाला बसला. तो आता कसला हट्ट करीत नसे कारण त्याची ती सवयच परिस्थितीने मोडून टाकली होती.

' मम्मी...मम्मी... मला गणिताचं पुस्तक कधी घेऊन देणार ? मला पहिला नंबर टिकवायचाय पण पुस्तकच नाहीय. '

' उद्या घेऊ हं बाळ, आता तू अभ्यास कर. ' रेशमा.

असेच दिवस हळू हळू जात होते. रेशमाने दोन-तीन ठिकाणी नोकरीसाठी प्रयत्न केले होते पण त्यासाठी भली मोठी रक्कम ती पुरवू न शकल्याने तिला त्या नोकऱ्या मिळाल्या नाहीत.

असाच एक दिवस अभिजात तर्र होऊन आला आणि म्हणाला ' रेशमा, पोटात आग पडलीय, चल लवकर वाढ बघू, ' रेशमा आता मात्र भडकली. तिने पाण्याचा पेला अभिजितपुढे आदळला.

' हे पाणी पी आणि पोटातली आग शमव. ह्या पाण्याशिवाय या घरात आज काहीही नाही, अभिजित मला लग्नापूर्वी कधीच वाटलं नव्हतं की असा निघशील. जितेंद्र.. ते निष्पाप छोटे पोर आज उपाशी आहे. '

' रेशमा ! ' अभिजित किंचाळला, मरु दे तो जितेंद्र. मला फक्त जेवण हवंय. समजलं ? नाहीतर...
' तर काय ? तुला या घरातून घालवून देईन—
असंच ना अभिजित ? ? '

' अभिजित, आजपर्यंत तुझ्यासाठी खूप सहन केलं. तुझ्या प्रेमासाठी माझ्या जन्मदात्यांना आणि भावांना मी तोडलं, त्यांना दुःखाच्या दरीत लोटून दिलं. आजपर्यंत तुला सुखी करण्याचा प्रयत्न करत आले ... ... पण, आज... आज मला कळून चुकलय... मी पूर्ण फसलेय... तू आज अशा वाटेवर उभा आहेस की मी जेथून तुला कधीच परतवून आणू शकणार नाही. अभिजित, आपल्या फुललेल्या संसाराचे आता तू उजाड, वैराण वाळवंट करून टाकलंस. त्या निष्पाप जितेंद्रला तू वैरी मानतोयस, त्या दारूच्या ग्लासापुढे तुला तुझ्या बायकोचा. मुलाचा, इभ्रतीचा... कसला कसलाच मोह उरलेला नाही. मी तुझ्यावर प्रेम केलं होतं ते तुझ्या कलागुणांची पारख करून... मला पैशाचा मोह नव्हता; श्रीमंतीची ओढ नव्हती. लक्षात ठेव, ज्यावेळी तू एक गरीब मनुष्य होतास त्यावेळी मी जन्माच्या वाटचालीसाठी तुझ्या हाती हात दिला. आजवर

सहन केलं पण अभिजित, मनाचा संयम पाळायलाही काही मर्यादा असते. तू आता मर्यादा ओलांडलीस. आता तरी सांग तू हे व्यसन सोडणार की नाही ?

इतका वेळ गप्प ऐकणारा अभिजित एकदम भडकला आणि त्याने त्या रागासरशी रेशमाला मारायला सुरुवात केली. त्याला अडवायला घरात कुणीच नव्हते. एक जीवघेणा दणका तिच्या कपाळावर बसला आणि ती खाली कोसळली ती कायमचीच !

अभिजितने रेशमाला ठार मारल्याच्या आरोपावरून त्याला अटक झाली. केस होऊन त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

आता जितेंद्रची परिस्थिती फारच हलाखीची झाली होती. केसचा निकाल लागेपर्यंत तो पोलीसांकडेच होता.

अभिजितच्या इच्छेवरुन जितेंद्रला कस्टडीत भेटायला पोलिसांनी नेलं. जितेंद्रनं पाहिले मात्र ' पप्पा...पप्पा ' त्याने हाक मारली आणि तो धावत गेला– पण त्या दोघांमध्ये तुरुंगाचे गज उभे होते. ' पप्पा ..पप्पा तुम्ही आत काय करताय ? बाहेर या ना, मला मम्मीकडे जायचंय '

'बेटा, बाळा...जितू ये. ' अभिजितने त्याचा चिमुकला हात गजातूनच हाती घेतला. ' बाळ मम्मी कुठे आहे असा प्रश्न पुन्हा नको विचारु. खरंच रे, नको विचारु.'

दुःखाच्या भरमात तो मनाला येईल ते बडबडत होता. ...बोलण्याची वेळ संपली. जितेंद्रला पोलीसांनी बाहेर उचलून नेलं. ' अभिजितचा बंगला त्याने काढलेल्या कर्जापायी जप्त झाला आणि जितेंद्र पुरा निराधार झाला. अभिजितच्या हाती आता फक्त पश्चाताप करणं एवढेच राहिले. त्याची रेशमा त्याला कधीच दिसणार नव्हती. त्यांची संसारवेल मदिरेच्या पुरात वाहून गेली.

अखेर जितेंद्रची रवानगी अनाथाश्रमात करण्यात आली.

केवळ एका दारुच्या प्याल्याने त्यांची संसारवेल उन्मळून गेली. आणि याचा परिणाम ? एका निष्पाप बालकाच्या आयुष्याला-फार भयानक प्रकारची कलाटणी मिळाली आणि अभिजितचं भावी जीवन वेढलं गेलं दुःखाच्या महाभयानक लाटांनी आणि पश्चात्तापाच्या खोल खोल दऱ्यांनी ! !

' रसराज ' अंकास हार्दिक शुभेच्छा !

आंब्याच्या भरघूर फलधारणेसाठी
कोंबडी शीट

संपर्क :

**क्वालिटी सी एंटरप्राइजेस**
**विजयदुर्ग, ता. देवगड.**

☎ : ३१

# पर्याय

**आनंद प्रभुदेसाई**
तृतीय वर्ष वाणिज्य

रेवतीच्या किंकाळीने रघुनाथ देवळेला जाग आली. कंदीलची वात मोठी करून त्याने रेवतीकडे पाहिलं. घाबरलेल्या रेवतीचा चेहरा पाहून नेहमीप्रमाणे ते भयंकर स्वप्न तिला पडलं असणार हे त्याने ओळखले.

रघुनाथ देवळे, कोंडर वाडीतला एक गरीब ब्राह्मण गावच्या टोकाला तग धरून उभ्या असलेल्या पडक्या घरात तो आपली बायको व रेवती या मुलीसह दिवस कंठीत होता. रेवती ही रघुनाथची एकुलती एक मुलगी होती. गावातील शाळेत आपल्या परिस्थितीला मानवेल असे बारावीपर्यंतचे बेताचे शिक्षण तिने घेतले होते. लांबसडक केस, पाणीदार डोळे, रेखीव बांधा, कोवळ्या अडसराच्या पाण्याप्रमाणे गोड बोलणारी रेवती लाघवी होती. पण का कुणास ठाऊक, अलीकडे ती विचित्रपणे वागत होती. गावातील काही वडीलधाऱ्या मंडळींनी रेवतीचे लवकरात लवकर लग्न करण्याचा सल्ला दिला होता. रघुनाथला हा सल्ला जरी पटला तरी लग्नासाठी त्याच्याकडे पैसा नव्हता.

रघुनाथच्या बायकोने त्याला समजावले तेव्हा काहीवेळ तो तसाच भिंतीकडे पहात राहीला. लग्नासाठी लागणाऱ्या हुंड्याच्या रकमेने तो बेचैन झाला होता. हुंडा म्हणजे जणू गेल्याजन्मीची शिक्षाच. आपल्यासारख्या गरीबानं काय करावं ? कर्ज काढून का होईना पण रेवतीचं लग्न यावर्षीच करण्याचे त्याने ठरवले. तरीही रेवतीला आलेली सात-आठ स्थळं केवळ हुंड्यापायी मोडली होती. दिवसेंदिवस तो जसा चिंताक्रांत दिसत होता तसेच रेवतीसमोर तिचे अंधारमय भविष्य नाचत होते आणि तिची आई देव्हाऱ्यातल्या देवीला साकडं घालीत होती. ' देवी माऊली, तूच आमचा सांभाळ कर. माझ्या रेवतीच लग्न होऊ दे, तुझी खणानारळानं ओटी भरीन. '

यानंतरच्या आठ-दहा दिवसातच कोसरगावचे सावकार रेवतीला पहायला येणार असल्याचे पत्र रघुनाथला आले. भुजंगराव सरदेशपांडे ! कोसरगावचा सावकार म्हणून प्रशिद्ध होता. अलिकडेच त्याने हुंडाबंदीवर व्याख्यानही दिले होते, एक समाजसेवक आणि हुंड्यासारख्या अनीष्ट रुढींना नष्ट करण्याचा प्रयत्न करणारा माणूस आपला पाहुणा होतोय म्हणून रघुनाथ आनंदात होता.

आपल्या भाग्याचा हेवा करत असताना आठ-दहा दिवस कसे गेले ते रघुनाथला कळलेच नाही. आज सकाळीच त्याने स्नान करून पूजा केली. रेवतीही एका आगळ्या आनंदात होती. प्रत्यक्ष भावी पतिराज आज तिला पहायला येणार होते. रेवतीची आईही आनंदात असल्याने तिच्या चेहऱ्यावर सतत दिसणाऱ्या चिंतेच्या सुरकुत्या कुठेतरी हरवल्या होत्या.

कारचा आवाज आला. रघुनाथच्या घरासमोर काळी कार थांबली. आतून पांढरी टोपी, सदरा, धोतर नेसलेले पन्नाशीच्या घरात पोचलेले भुजंगराव उतरले. पाठोपाठ त्यांचा मुलगा विलासही उतरला.

चहापान झाले, रघुनाथाने विचारले, रेवतीला हाक मारू का ?

'हो हो, बोलवा ना, पाहू दे तरी तुमची रेवती.' भुजंगरावांनी हसतहसत म्हटल्यावर रघुनाथने रेवतीला बोलावले.

लाडवांचे ताट घेऊन समोर आलेली रेवती मुलाकडे पहाताच बावरली आणि तिच्या हातातले ताट एकदम खाली पडले. रडत रडतच ती आत पळाली.

रघुनाथला समजेना, काय बरे झाले ? तिची समजूत काढत तिच्या रडण्याचे कारण विचारता रेवती पुन्हा रडू लागली.

'बाबा अशा घरात मला देणार असाल तर त्यापेक्षा विहीरीत लोटून द्या. नाहीतर विष द्या. पण बाबा...

'अग पण झालं तरी काय ? रघुनाथ विचारीतच होता. आता रेवतीची आईही आली. आईला पाहताच रेवतीने तिला मिठीच मारली आणि ती पुनःपुन्हा हुंदके देऊन रडू लागली, 'आई, त्या मुलाला तुम्ही पाहिलत ? त्याचा डावा पाय प्लॅस्टिकचा आहे. अपंग आहे तो. अशा अपंगाशी लग्न लावण्यापेक्षा मला...' आणि तिला पुन्हा हुंदका अनावर झाला.

'अगं मुली रडू नकोस. भुजंगराव म्हणजे सावकार घराणं आहे. अर्थात त्यांचा मुलगाही सावकारच. तुला कशाचीही कमतरता पडणार नाही. सुखात राहशील तू.' रघुनाथ तिला समजावीत होता.

रेवतीने देव्हाऱ्याकडे पाहिलं. माऊलीची धीरगंभीर मूर्ती समईच्या उजेडात तिला दिसली. जणू ती रेवतीला धीरच देत होती. आपले ओघळते अश्रू आवरीत ती म्हणाली, 'आई, मी या मुलाशी लग्नाला तयार आहे. माझ्या लग्नासाठी चाललेले तुमचे प्रयत्न मी पहातेय. आज वर्षभर बाबा माझ्यासाठी हेलपाटे घालताहेत, पण यश नाही. आज हे चालून आलेलं स्थळ सोडलं तर तुम्हा दोघांनाही किती मानसिक यातना होतील ? तेव्हा बाबा, मी या मुलाशी लग्नाला तयार आहे.' भारावलेला रघुनाथ काहीही न बोलता रेवती व पत्नीसह बाहेर आला.

'काय झालं ? पोरगी मागे का गेली !' भुजंगरावांनी विचारले.

'काही नाही — काही नाही. अती लाजण्याचा परिणाम '— रघुनाथने स्वतःला सावरीत उत्तर दिले.

रेवतीला पाहिल्यावरच एकदम पसंत असा शेरा भुजंगरावांनी दिला. 'आणि एकच रघुनाथराव ! — भुजंगराव सांगू लागले, 'माझा मुलगा एकटाच. त्याला आई नाही. आज वीस वर्षानंतर आमच्या घरात स्त्री येतेय. तेव्हा रेवतीला म्हणावं, आम्हाला सांभाळ.' भुजंगरावांच्या बोलण्यात एक प्रकारची जरब होती. बोलताना झुपकेदार मिशा हालत होत्या.

रघुनाथने मग हुंड्याचा विषय काढला. आपली हुंडा देण्याची तशी परिस्थिती नाही हे सांगून आपल्या एकुलत्या एका मुलीसाठी फूल ना फुलाची पाकळी म्हणन शक्य होईल तेवढे देणार आहे असे सांगताच भुजंगरावाना मनातून आनंद झाला. बराच वेळ खलबते झाली आणि शेवटी दहा हजारावर तडजोड झाली. इतरापेक्षा ही रक्कम कमीच असल्याने रघुनाथ तेवढ्यातही खूष होता.

लग्न रजिस्टर पद्धतीने झालं, पण त्याचा मोठा स्वागत समारंभ भुजंगरावाच्या घरी झाला. एका बाजूला बसून रघुनाथ सपत्नीक हा सोहळा पहात होता.

० ० ० ०

भुजंगरावाच्या घरात रेवतीच्या रूपाने जणू लक्ष्मीच आली होती. पण लग्न होऊन वर्ष होतं न होतं तोच हुंड्याची उरलेली पाच हजाराची रक्कम रघुनाथने दिली नाही म्हणून भुजंगराव रेवतीला व मुलाला बोलू लागला. विलासही रेवतीला त्रास देऊ लागला. हुंडा बंदीवर व्याख्याने देणारा आपला सासरा स्वतःच्याच सुनेचा हुंड्यावरून छळ करील याची रेवती कल्पनाही करू शकत नव्हती. सुरवातीच्या सुखाच्या दिवसाची जागा अपमान, त्रास, छळ मारहाण याने घेतली होती. रेवती हे सर्व मुकाट सहन करत होती. पायाने पंगू असलेला आपला नवरा मनानेही पंगूच निघाला याची तिला खंत वाटे, अनेकदा या सर्व त्रासाला वैतागून ती आत्महत्त्येचा विचार करी पण आईवडिलांची मूर्ती दृष्टीसमोर येताच मनातले वाईट विचार विरून जात. दिवस असेच जात होते.

अधूनमधून रेवती अवाच्य बोलून घेत होती, मारहाण सोसत होती. अपमान गिळत होती.

० ० ० ०

आज चंडीवन देवीच्या उत्सवानिमित्त गावात यात्रा भरली होती, पण रेवतीच्या नशिबी त्याहीपेक्षा वेगळं होतं. यात्रेतील मुख्य कार्यक्रम रात्री होता. देवीला बकरीचा बळी देण्याचा !

सायंकाळ झाली, आकाशात वळवाचे काळेकुट्ट ढग जमा होऊ लागले. वातावरण उदास व भयाण वाटत होते. रेवतीच्या मनात विचारांचं काहूर उठलं. तिने घरातूनच देवीला नमस्कार केला. आज उत्सवाचा दिवस असल्याने सुखाचा जाईल असे तिला वाटत होते. पण माणसाच्या वाटण्याशी दैव नेहमी सहमत असतेच असे नाही.

गावदेवीचे प्रमुख मानकरी भुजंगराव होते पण आज त्यांनी आपल्यातर्फे विलासला पाठवले होते.

रात्र होऊ लागली तशी माणसे घराघरातून देवळाकडे निघाली. घरात होते फक्त रेवती व भुजंगराव. घरातले काम आटोपून रेवती खोलीकडे निघाली. पण ... समोरचं दृश्य पाहून तिला घर आपल्याभोवती फिरत आहे असे वाटले.

भुजंगराव कोचावर बसून दारुचे पेग घेत होते आणि मधूनच रेवतीकडे पाहून अचकट-विचकट हसत होते. ' अग चांडाळणी, तुझ्या बापाने अजूनही पाच हजार दिले नाहीत. त्याची वसुली आज मी करणार आहे.' भुजंगरावाच्या आवाजाने रात्रीच्या शांततेचा भंग केला. ' आज बरेच दिवस मी ही योजना आखली होती, याच रात्रीची वाट पहात होतो. चल, पुढं ये, भुजंगराव रेवतीच्या दिशेने कोसळलेल्या कड्याच्या शिलाखंडाप्रमाणे घसरला.

रेवतीने मारलेली आर्त किंकाळी दशदिशात नाद उमटवून विरुन गेली. दारुच्या नशेत असलेल्या भुजंगरावाने मुलीसमान असलेल्या सुनेचा हात पकडला आणि एक जोरदार ठोसा त्यांनी तिच्या कोमल चेहऱ्यावर ठेवून दिला. आणि विकट हास्य करून म्हणाले, ' आता तू केवळ एक स्त्री आहेस आणि मी एक पुरुष. ' बिचारी रेवती आपल्या रक्षणाचे निष्फळ प्रयत्न करत होती. तिची ओरड ऐकत होत्या त्या वाड्याच्या भिंती, ऐकत होता फक्त भुजंगराव आणि ती स्वत: ! त्या पतीव्रतेची हाक देवी चंडीकेलाही ऐकू जात नव्हती. दारुच्या नशेत कामांध झालेल्या भुजंगरावाने शेवटी रेवतीचा पूर्ण ताबा घेतला.

वाड्यातल्या घड्याळाने रात्री बाराचे ठोके दिले. क्षणभर शांततेला तडा गेला. नेमके याचवेळी देवीसमोर बकरीचा बळी दिला जात होता. पहिला घाव घालण्याचा मान विलासला मिळाला होता. बकरीचे तुटके शीर देवीच्या पायावर पडले होते आणि देवीच्या पायावर रक्ताभिषेक होत होता.

० ० ० ०

पोस्टमनच्या हाकेने रघुनाथने पुढे येऊन पत्र घेतले. रेवतीचं पत्र पाहून त्याच्या घशाला कोरड पडली. तिला होत असलेल्या त्रासाचं वर्णन वाचून मन सुन्न झालं. आता त्या पतीपत्नीपुढं एकच प्रश्न होता. यावर उपाय काय ? पण रघुनाथच्या पत्नीने उपाय सुचवला. तो त्यालाही पटला. अखेर मुलीच्या सुखापुढे त्याला आपल्या घराची किंमत शून्यच होती.

आपले रहाते घर विकून रघुनाथ व त्याची बायको एका बोचक्यानिशी बाहेर पडली. कधी एकदा ते पाच हजार रुपये भुजंगरावांना देतो नि आपल्या मुलीला सुखात नांदताना पाहतो असं रघुनाथाला होऊन गेलं.

कालचा अघोरी प्रकार भुजंगरावाच्या मनाला कुठेतरी खात होता. घर भकास दिसत होतं. बांगड्यांच्या काचा कोंबडीच्या पुढ्यात दाणे भिरकावल्याप्रमाणे विखुरल्या होत्या. रक्ताचे सुकलेले थेंब फरशीवर दिसत होते.

विलास पहाटेच घरी आला होता. कालची घटना त्याच्या गावीही नव्हती, रेवती न दिसल्याने तो सतत चौकशी करत होता आणि भुजंगराव काहीतरी बोलून सारवासारव करत होते.

' विलासराव आहेत का ?' रघुनाथने हाक मारत घरात प्रवेश केला. त्या पतीपत्नीला असे अचानक पाहून विलास दचकलाच. ही माणसं अशी एकाएकी कशी इथं ?

'या आत बसा' असे म्हणत त्याने वडिलाना हाक मारली

'या–या कसं येणं केलंत ? भुजंगरावने भीती लपवत प्रश्न केला.

'रेवती कुठाय ?' रेवतीच्या आईने विचारले.

'आँ–ती–ती ना येईलच इतक्यात. पाण्याला गेली असावी.' भुजंगराव काहीतरी बोलायचे म्हणून म्हणाले.

'हे घ्या पाच हजार रुपये.' असे म्हणत रघुनाथने भुजंगरावांच्या पुढ्यात नोटांचे पुडके ठेवले.

'आणि हा चांदीचा करंडा रेवतीला द्या. अक्षय आहे म्हणावं–' असे म्हणत रेवतीच्या आईने चांदीचा करंडा पुढे केला.

'अग ए रेवती, आलीस का ?' आई हाक मारत होती. पोरीला पहाण्यासाठी ती आतुर होती. पण तिला कुठं माहीत होतं की आपली रेवती हा आवाज ऐकू येण्यापलीकडे पोचलीय.

'माझी रेवती कुठंय ?' ती पुन्हा पुन्हा विचारीत होती.

'हे पहा, आता या प्रश्नाला उत्तर येणार नाही.' हवालदाराच्या आवाजाने वातावरणात बदल झाला.

'तलावात आत्महत्या केलीय तिनं. नुकतंच तिचं प्रेत ताब्यात घेतलंय आम्ही. आणि भुजंगरावांना अटक करण्यासाठी आलोय.

० ० ० ०

बाहेर रेवतीला पहाण्यासाठी सारा गाव लोटला होता. घराच्या अंगणात तिचं मृत शरीर ठेवलं होतं.

सुटलेले अस्ताव्यस्त केस.. ओली हिरवट रंगाची साडी... निस्तेज, ताठरलेले डोळे आणि काहीतरी सांगण्यासाठी उघडलेले तोंड.

'रेवती ऽ ऽ का आम्हाला सोडून गेलीस तू ? तुझ्या सुखासाठी पैसेही घेऊन आलो होतो आम्ही आणि तू काय केलंस हे !'— रघुनाथ व त्याची पत्नी धाय मोकलून रडत होती.

तिचे उघडे डोळे जणू सांगत होते की, आई–बाबा, तुमच्या हंबरड्याने जमीन हादरेल. आकाश काळवंडेल पण मला ही हाक ऐकू येणार नाही. कारण या सर्व स्वार्थी, कृतघ्न जगापासून-अनिष्ट रूढी परंपरापासून मुक्त झालेय मी. आता उशीर झालाय ! फार उशीर झालाय ! माझा बळी घेतलाय– अपर्याप्त हुंड्यानं !

'रसराज' अंकास हार्दिक शुभेच्छा !

**श्री. पाटणकर बंधू**

किराणा व किरकोळ मालाचे व्यापारी

**केसकर वाडी, वाडा.**

# स्वप्न सत्य जाहले

**मीना चव्हाण**
अकरावी आर्टस्

भो ऽऽऽओ ऽऽ...

गोव्यावरुन देवगड बंदराकडे वळलेल्या बोटीने आपला भोंगा वाजवून आल्याचा इशारा केला, आणि त्याबरोबर पडावाच्या वल्हेकरांनी वल्हे मारायला सुरुवात केली. डुबूक् ऽऽ डुबूक् ऽऽ या आवजाची सुरुवात झाली. बोटीच्या दिशेने पडाव हलत–डुलत जाऊ लागली...विमलच्या अंतःकरणातून एक दीर्घ दुःखाचा उमाळा आला...धक्क्यापासून केवळ दहा मिनिटांच्या आंतरावर ' कोंकण सेवक ' बोट उभी होती. पण......याच क्षणी आपण किती दूर जात आहोत याची जाणीव तिला झाली. ती फक्त अवाक् होऊन समोर आलेल्या अवाढव्य बोटीकडे पहात होती.

पडाव बोटीजवळ थांबली. आणि सर्व प्रवासी नेहमीच्या सवयीने जनावरांसारखे आत घुसू लागली. विमलसुद्धा आपल्या मामाबरोबर बोटीमध्ये गेली. अक्षरशः गोंधळून! खरंच ते, कारण ग्रामीण भागात दहावीपर्यंत शिकलेल्या विमलला आज अवाढव्य जगाचे थोडेसे दर्शन होत होते. बोटीमध्ये गोव्यावरुन आलेले ते विविध फॅशनचे कपडे घातलेले प्रवासी, माकडचेष्टा करणारे हिप्पी अशी अनेक तऱ्हेची माणसे ती आज पहात होती. एखाद्या परकी गावात बांधून नेलेल्या जनावरासारखी!

अखेर सर्व प्रवासी आत गेल्यावर व त्यांचे सामान-सुमान आत ठेवल्यावर पॅसेंजर घेऊन येणारे पडाव पुन्हा माघारी वळले. आणि बोटीने इशारा दिला मुंबईकडे निघाल्याचा.

बोटीच्या खालच्या मजल्यावर आपले सामान व्यवस्थित ठेवून विमल व तिचे मामा चादर व्यवस्थित अंथरून आता खाली बसले होते. निरनिराळ्या गावावरून आलेली मंडळीही आपापल्या माणसासमवेत गटागटाने बसली होती. प्रत्येकजण अगदी निरनिराळ्या हेतूने मुंबईकडे जात होती. कुणी चार दिवस आपल्या म्हातारीला पहायला गावी आलेला परत जात होता; कुणी केवळ आराम करण्यासाठी–मौज करण्यासाठी जात होता. तर त्या हजारो माणसात एखादा बिचारा जात असेलही आपल्या आजारी माणसाला पहाण्यासाठी. पण प्रत्येकाचे कारण निराळे. मात्र जात होते एकाच ठिकाणी मुंबईला.

आता गटागटातून गप्पांच्या लहरी उठत होत्या. वातावरण प्रसन्न होत होते.

पण...

विमल मात्र निःस्तब्धच होती. एखाद्या तपस्व्यासारखी तिची नजर होती गतकाळात वावरत, भवितव्याच्या आशावादावर, आणि त्याचे कारणही तसेच होते.

विमल ही आईवडिलांची एकुलती एक मुलगी होती. तिचे वडील मुंबईतील कुठल्याशा एका मिलमध्ये होते. परंतु साच्यावर काम करीत असताना कुठलासा एक रॉड तुटला व ते त्या अपघातात दगावले. विमल तेव्हा फक्त एक वर्षाची होती. तिच्या वडिलांची मुंबईत एक खोली होती. परंतु गावी शेतीवाडी व घर असल्याने वडिलांची खोली तिच्या आईने आपल्या भावाच्या स्वाधीन केली व गिरणीतून मिळालेल्या रकमेची

गुंतवणूक करून ती छोट्या विमलला घेऊन गावी राहू लागली. नवऱ्याच्या अकाली निधनामुळे तिने मुंबईत पुन्हा पाऊल टाकले नाही. कालचक्र रहाटगाडग्यासारखे फिरत होते. विमलची आई झालेल्या गोष्टीचे दुःख पाठीशी बांधून आता विमलच्या भवितव्यासाठी दिवस घालवीत होती. विमल सुस्वभावी होती. ती शालेय जीवनाची एकेक पायरी भरघोस यशाने पार पाडीत होती. समाजातही ती मानसन्मान मिळवून होती. कोणाला हवी कुणाला नको. शालेय जीवनातील मॅट्रीकची पायरी तिने गेल्याच वर्षी पार पाडली होती. ६० टक्के मार्कस मिळवून ती पास झाली होती.

आपल्या शिक्षणाचा सर्वांनाच उपभोग व्हावा ही तिची नेहमीच मनीषा असे. कुणाच्या मुलांना इंग्लीश-गणित सारखे विषय शिकव, कोणी आजारी असो अथवा अडचणीत असो ती नेहमीच मदतीला हजर.

आणि म्हणूनच तिच्या परिसरातील सर्व माणसे तिला तोंड भरून आशीर्वाद देत, म्हणत असत,
' आमच्या विमुला अगदी चांगले घर मिळेल हो. खूप सुखी होईल पोर.'

दिवसामागून दिवस जात होते. एस. एस. सी. होऊन दोन वर्षे होत आली होती आणि आज अचानक तिच्या मामाचे पत्र आले होते. पत्र तिच्या लग्नासंबंधीच होते. आईने विमलला पत्र वाचायला सांगितले.

ती. ताईस

साष्टांग नमस्कार वि. वि.

मुद्दाम पत्र लिहिण्याचे कारण चि. विमलच्या लग्नाच्या विचारात मी गेले वर्षभर होतो. परंतु कुठे मनासारखे स्थळच सापडत नव्हते. परंतु गेल्याच आठवड्यात शिरवडे ह्या गावातील पाहुणे माझ्याकडे आले होते. नवरा मुलगाही आला होता. मुलगा १२ वी पास आहे. इन्कमटॅक्समध्ये क्लार्कची नोकरी करीत आहे. मुलगा आपल्या विमुच्या स्वभावाशी सुसंगत आहे. साधाभोळा आहे. तरी तू तुझा विचार काय तो कळविणे. तसेच विमुचाही विचार घेणे आणि हो, मी पुढच्याच आठवड्यात गावी येत आहे. आणि विमलला मी मुंबईला आणणार आहे तरी तयारीत असणे.

जास्त भेटी अंती बोलू

आपला भाऊ,

विश्वास

विमल पत्र वाचत होती. शब्दाशब्दाला तिच्या आईचा चेहरा फुलत होता. तिचेही खरंच होते. एकदा पोरीची जबाबदारी संपली की झाले. मग आपल्याला रामराम म्हणायला मोकळीक झाली.

विमलचा मामा पत्र पाठविल्याप्रमाणे ठरल्यावेळी हजर झाला. इकडे विमलच्या शेजारी-पाजारी मंडळींना तिच्या लग्नाविषयी माहिती झालीच होती. तिचा मामा आठ दिवस राहून शेवटी दुसऱ्या दिवशीच्या बोटीने मुंबईस जाण्यास निघाला.

नाही म्हटले तरी विमलला भडभडून येत होते. आईपासून दूर जाताना तिला रडू येत होते. पण होणाऱ्या गोष्टीला इलाज नव्हता.

दुसऱ्या दिवशी ती व मामा ११ च्या गाडीने देवगडला येण्यास निघाली. तिला पोहोचविण्यासाठी आजुबाजूच्या बाया-बापड्या हजर झाल्या होत्या. सर्वजणी एकीकडे दुःखी कष्टी होत होत्या तर दुसरीकडे तिला आशीर्वाद देत होत्या.

' विमू अग तू कोणाचे वाईट केलेले नाही. तुझे चांगले होईल. तुला सुखी घर आणि चांगला गुणी नवरा मिळेल.' आईचा जड अंतकरणाने निरोप घेऊन ती शेवटी आज आपल्या भवितव्याच्या मार्गाकडे जात होती.

बोट हेलकावे खात जात होती. बोटीच्या पंख्याने समुद्राचा तळ जणू ढवळून निघत होता. सूर्यास्त होत होता. सूर्यदेव जणू भट्टीत घातलेल्या थाळीप्रमाणे लालभडक होऊन सागरात झेप घेत होता. विमलच्या मनात भावी जीवनाविषयी विचारांचा तळही समुद्राच्या तळाप्रमाणे ढवळून निघत होता. आता आपला लग्नाचा विचार मामांनी तर नक्कीच केला आहे. पण... पण आपला जीवनसाथी कसा असेल ? तो सुस्वभावी असेल का ? मला

समजून घेणारा असेल ना ? एक ना दोन हजारो विचारांनी तिच्या मनात दाटी केली होती. ती आजपर्यंत देवाजवळ एकच मागणे मागत होती. देवा मला मिळणारा माझा साथीदार गुणी हवा. मामानी स्थळ नक्की केले होते. पण आज काहीच ग्वाही देता येत नाही. ती कितीतरी वेळ नुसती समोर पहात होती रात्रीचे नऊ केव्हा वाजले तेही समजले नव्हते. तिचा मामा बोटीच्या डेक वरून जेव्हा खाली आला आणि त्याने विमलला जेवणासाठी हाक मारली तेव्हा ती भानावर आली– तिची मनःस्थिती पाहून मामाने विनोदाला हात घातला–

'वेडे एवढयापासून भावी संसार रेखाटू लागलीस की काय ? अग जेवायचे आहे की नाही ?'

'मामा काही तरीच काय... पण खरंच हो किती वाजले हेच समजले नाही.' विमल.

'बरोबर, आता जेवण कसले नी काय. आता फक्त पतिराजाचा विचार...' मामा–

आणि ती दोघे खळखळून हसली.

विमलने जेवणाचा डबा उघडला. ती दोघे जेवली. थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या व बोटीतील सगळी मंडळी हळुहळू निद्रादेवीच्या आधीन होऊ लागली. बराच वेळ विमलचा डोळा लागत नव्हता. अखेर ती सुद्धा झोपी गेली.

पहाटेचे सहा वाजले. हळुहळू सगळे प्रवासी जागे होऊ लागले. प्रार्थविधीचे कार्यक्रम आटोपेपर्यंत सात वाजूनही गेले आणि बोट धक्क्याला लागली. सगळे प्रवासी आपल्या निवासस्थानाकडे निघून गेले. विमल व तिचा मामाही दहा वाजता बांद्र्याला आपल्या खोलीवर गेले. तिच्या मामीने तिचे अगदी आनंदानेच स्वागत केले. दिवसभर गप्पा-गोष्टी झाल्या.

दुसऱ्या दिवशीच मामानी ज्यांना शब्द दिला होता ती मंडळी विमलला पहाण्यासाठी आली. नवरा मुलगाही आला होता. मामानी सांगितल्याप्रमाणे मुलगा खरोखरच सुस्वभावी होता. त्यानेही विमलला पसंत केली. बराचवेळपर्यंत गप्पा गोष्टी झाल्या. मुलाने आपले मत स्पष्ट सांगितले. पुढच्याच आठवडयात निर्णय पक्का करण्याचे वचन देऊन पाहुणे-मंडळी निघून गेली.

विकासला खरोखरच विमल पसंत होती. तोसुद्धा आपल्याला पत्नी कशी मिळावी याचे चित्र रेखाटत होता. त्याने आपणास मिळणारी जीवनसाथी कशी असावी याची वेळोवेळी दिवास्वप्ने कल्पनेच्या दिव्य भराऱ्यांनी रंगविली होती. आपली पत्नी आपणास सांभाळून घेणारी असावी. तिने आपल्या संसारामध्ये आपणास पूर्ण साथ द्यावी, वगैरे-वगैरे.. नि आज...

खरोखरच या दोन सुस्वभावी जीवांची गाठ पडली होती. नव्हे ती गाठ विश्वकर्त्याने जन्मतःच घातली होती. खरोखरच विमल-विकासचे स्वभाव म्हणजेच एका नाण्याच्या दोन बाजू होत्या. त्यांचा भावी संसार निश्चितच सुखाचा होता.

पुढल्या आठ दिवसातच दोन्हीकडचे निर्णय पक्के झाले. पुढील बोलाचाली झाली आणि साखरपुडा पुढील महिन्यात ठरला. विमलच्या आईला लवकरच मुंबईला आणले. साखरपुडा वगैरे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. आणि विवाह मुहूर्त पंधरा दिवसात धरण्यात आला.


मित्र धाम हॉल पाहुणे मंडळीनी भरून गेला होता. सर्व वातावरण आनंदाने फुलून गेले होते आणि शेवटी दुपारी ३ वाजता विमल-विकास विवाह थाटाने पार पडला.

दोन जीव–जे आपल्या भावी आयुष्यात आपणास आपला जीवनसाथी लायक मिळण्यासाठी आतुर झाले होते. ते दोन जीव आज खरोखरच लग्न विधीच्या रूपाने एकत्र आले होते...

स्वप्न सत्य झाले होते...


# कीर्ती पताका....

**सदानंद देसाई**




जनरल सेक्रेटरी

**नूतन पाटील**




विंद्यार्थिनी प्रतिनिधी

**प्रदीप साळसकर**




विद्यापीठ प्रतिनिधी

**अविनाश सावंत**




तृतीय वर्ष वाणिज्य
प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**कल्पना तावडे**




सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात
बारावी कलाशाखेत सर्वप्रथम

**पद्मजा पारकर**




**गजानन तारी**



बारावी वाणिज्य
प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


# आकांक्षा पुढती जिथे गगन ठेंगणे !

**जयंत सातम**



जनरल चँपियन (विभागून)


**पद्मजा पारकर**



जनरल चँपियन


## सिनीअर

**प्रदीप खवळे**



जनरल चँपियन
पोहणे–जिल्ह्यात प्रथम, विभागीय मध्ये तिसरा, ॲथलेटीक्स (भालाफेक) जिल्ह्यात प्रथम व विभागीय मध्ये तिसरा


**सरिता नाईकसातम**



जनरल चँपियन


## ज्युनिअर

**संजय बांदेकर**



पोहणे–जिल्ह्यात प्रथम विभागीय मध्ये तिसरा

**मंगेश कोयंडे**



पोहणे–जिल्ह्यात प्रथम विभागीय मध्ये तिसरा

## मृद्गंध

रम्य त्या स्मृतींची उजळून एकतारी
नभी चंद्र आज हासे, ऐकून रीत न्यारी
कळले नव्हते आजवरी मज, गुपीत जीवनाचे
फूल उमलण्याआधी जुळते, गंधफुलांचे नाते
जुळवून सूर सारे, गीत जन्म घेई
भरल्या मुक्या स्वराला, मग शब्दरुप येई
चुंबून घेती किनाऱ्यासही, शुभ्रधवल या लाटा
सूर्यचंद्रही नभी रेखती, काळाचीही गाथा
पुनवेची गुलजार रात ही, मैफील चांदण्याची
ओळख मजला अजुनही पटते, कोमल मृद्गंधाची
नभांगणीची बाग कशी ही, सागरात फुलली
लाजऱ्या तिमिराला कशी ही, रातराणी भुलली
मृदुल फुलांना तुडवून जाणे, हीच जगाची रीत
प्रज्वलीत दिव्याचा अंतही अखेर, अंधाराच्या—
क्षितीजात

**चित्तरेखा पाटणकर**
प्रथम वर्ष वाणिज्य

## प्रीत वृक्षा बहरुनी ये

प्रीत वृक्षा बहरुनी ये
साज तुझा हा आगळा
जाई भरुनी कुणाही डोळा
टवटवीत त्या प्रीतफळा
मंद सुहास घेवून ये
प्रीत वृक्षा बहरुनी ये
गोड शब्दांचा हा पसारा,
पसरुनी जणु मोरपिसारा,
देहभान विसरुनी सारा,
मधुर स्मीत घेवूनी ये
प्रीत वृक्षा बहरुनी ये
निसर्गराजाची ही करणी
कळी फुलावी फुलावाणी
सुस्वर मंजुळ गात गाणी
धुंद प्रीत घेवूनी ये,
प्रीत वृक्षा बहरुनी ये

**राजन ढोके**
प्रथम वर्ष कला

## ॲक्टरचा मंत्री

वर्ग चालू होता. शिक्षक ऐन रंगात येवून शिकवत होते पण सुनिलचे त्याकडे लक्ष नव्हते. त्याला त्यात गोडी वाटत नव्हती हे शिक्षकांच्या लक्षात आले. त्यांनी त्याला उभे करून विचारले ' तुझी लक्षणे काही ठीक दिसत नाहीत. तू पुढे कोण व्हायचं ठरवलंस तरी कोण ?
' बेस्ट ॲक्टर ! ' सुनिल उत्तरला आणि मनात म्हणाला, आता प्रश्न सुटला, गुरुजी निरुत्तर होणार पण गुरुजी हुषार होते. ते म्हणाले —
' ते ठीक आहे रे. आपण तसे प्रयत्नही करु पण पुढे तुला राजकारणात शिरुन मंत्री वगैरे व्हावे लागेलच आणि मंत्री झाल्यावर पैसे कसे खायचे यासाठी शिक्षणाची गरज आहेच. '
बिचारा सुनील खाली बसला.

**राजेंद्र हिंदळेकेर**
प्रथम क्रमांक,

## ' जेवण गावात '

घाटावरचा मनुष्य मालवणला कामाकरिता आला होता दुपारचे बारा वाजले होते. तो मनुष्य एका घरी गेला व जेवण मिळेल का याची चौकशी केली; त्या घरातल्या माणसाने उत्तर दिले, ' जेवण गावात '. त्याला वाटले, गावात कुठेतरी एखादी खाणावळ असेल. म्हणून तो आणखी पुढे गेला. तिथेही चौकशी करता, ' जेवण गावात ' असंच उत्तर त्याला मिळालं. आणखी दोन-तीन ठिकाणी चौकशी करता अशीच उत्तरे मिळाली. शेवटी एका सद्गृहस्थाला त्याने विचारले—
' प्रत्येकजण मला जेवण गावात म्हणून सांगतोय, तेव्हा कुठल्या गावात मला जेवण मिळेल ?'
' जेवण गावात म्हणजे जेवण मिळेल !'

**शुभांगी सप्रे**
द्वितीय क्रमांक

श्री. सदाशिव हरी केळकर
कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

★

# जामसंडे ग्रुप विविध कार्यकारी सहकारी सेवा मंडळ, लि.,

जामसंडे

तहसील : देवगड  जिल्हा : सिंधुदुर्ग

## बंध रेशमाचे

कळले कधी न तुला
माझ्या हृदयाचे मोल
कळले कधी न तुला
माझ्या नयनांचे बोल

कळले नाही तुला
स्वप्न माझ्या उरीचे
बंध असे हे रेशमाचे
सांग का तू बांधले

जयंत साठम
प्रथम वर्ष कला

## वसंतागमन

मुकूट घेउनी शिरी सुगंधी
वसंत हा आला
हर्षामधुनी गीत गुलाबी
बरसू तो लागला
शाल लेवुनी हिरवी शिखरी
कुरणे ही नाचती,
ढगाळ ललना धुके पटेरी
किरणे ती झाकती
गीत कोकीळ गाते मंजुळ
वात हा दुमदुमतो,
वनी वेळूच्या कडे कपारी
नाद मृदंगी घुमतो.
आमराईच्या गर्द छायेतून
पाने ती गळती,
टप् टप् टप् टप् त्या तालावर
संगीतात मिळती

भारती जाधव
बारावी वाणिज्य

## प्रतिबिंब

चंद्राचं प्रतिबिंब
पडते जेव्हा जळात
एकरूप होतो चांद,
जणू त्या जलाशयात
प्रतिबिंब आपुले,
आपण पाहता आरशात
प्रतिबिंब अन आपण
सांग काय फरक दोघात ?
एकरूप शब्द दोन
वृक्ष अन छाया
सांज होता लोपते छाया,
उरते फक्त वृक्षकाया
नव्हे तू लेखणी, स्फूर्ति माझी,
प्रतिभेची झालर,
झरझर ते नव काव्य कथा,
साहित्य बहार
नव साहित्यामधुनी ध्वनी उमटे
एक ग जवळीचा
ध्वनी मागुनी दरवळेल का ?
सांग सुगंध प्रीतिचा !

मोहन मिराशी
द्वितीय वर्ष कला

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

**उजाडले, पण सूर्य कोठे आहे ?**

**या प्रश्नाचे उत्तर सहकाराला सापडले आहे.**

ग्रामीण कर्जमुक्ती, भूमिहीन, बेघर, जंगलकामगार, शेतकरी, मच्छिमार
आदि गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी सहकाराचा हा सूर्य खेडोपाडी पोहचला आहे
सहकाराचा हा मंत्र घेऊन स्वावलंबनाच्या मार्गाने मच्छिमारांचे हित जपणारी सिंधुदुर्गच्या
सहकारी क्षेत्रातील अग्रेसर मच्छिमार संस्था

**तारामुंबरी सहकारी मच्छी व्यावसायिक संस्था मर्या.**

**मु. पो. तारामुंबरी ता देवगड, जि. सिंधुदुर्ग**

**ऑडिट वर्ग 'अ'** **फोन ४२**

- मासळी विक्री
- डिझेल व मच्छिमार साहित्य विक्री
- ट्रक व टेंपोद्वारे वहातुक व्यवस्था

मासेमारी व्यवसायाची आपली कोणतीही अडचण असो आम्ही निश्चित काहीतरी मदत करूच

**मंगेश ना. कुबल** — व्यवस्थापक
**लक्ष्मण मा. गोलतकर** — व्हाईस चेअरमन
**मुरलीधर ल. जोशी** — संस्थापक व चेअरमन

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

**चोपडेकर ब्रदर्स**

**देवगड फोन ५६**

**उत्कृष्ट फोटोग्राफीसाठी**

**रामदास फोटो स्टुडिओ**

(लग्न व शुभकार्याच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील)

**ताज्या व उत्कृष्ट फराळासाठी**

**समता उपहार गृह**

**चवदार मच्छीजेवणासाठी**

**समता भोजनालय**

## बंध रेशमाचे

कळले कधी न तुला
माझ्या हृदयाचे मोल
कळले कधी न तुला
माझ्या नयनांचे बोल

कळले नाही तुला
स्वप्न माझ्या उरीचे
बंध असे हे रेशमाचे
सांग का तू बांधले

जयंत साठम
प्रथम वर्ष कला

## वसंतागमन

मुकूट घेउनी शिरी सुगंधी
वसंत हा आला
हर्षामधुनी गीत गुलाबी
बरसू तो लागला
शाल लेवुनी हिरवी शिखरी
कुरणे ही नाचती,
ढगाळ ललना धुके पटेरी
किरणे ती झाकती
गीत कोकीळ गाते मंजुळ
वात हा दुमदुमतो,
वनी वेळूच्या कडे कपारी
नाद मृदंगी घुमतो.
आमराईच्या गर्द छायेतून
पाने ती गळती,
टप् टप् टप् टप् त्या तालावर
संगीतात मिळती

भारती जाधव
बारावी वाणिज्य

## प्रतिबिंब

चंद्राचं प्रतिबिंब
पडते जेव्हा जळात
एकरूप होतो चांद,
जणू त्या जलाशयात
प्रतिबिंब आपुले,
आपण पाहता आरशात
प्रतिबिंब अन आपण
सांग काय फरक दोघात ?
एकरूप शब्द दोन
वृक्ष अन छाया
सांज होता लोपते छाया,
उरते फक्त वृक्षकाया
नव्हे तू लेखणी, स्फूर्ति माझी,
प्रतिभेची झालर,
झरझर ते नव काव्य कथा,
साहित्य बहार
नव साहित्यामधुनी ध्वनी उमटे
एक ग जवळीचा
ध्वनी मागुनी दरवळेल का ?
सांग सुगंध प्रीतिचा !

मोहन मिराशी
द्वितीय वर्ष कला

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड व
रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

## चेतन लंच होम

शाकाहारी व मांसाहारी जेवणाची उत्तम सोय

प्रोप्रा. : सुंदर जगताप

## मेसर्स अमृत विष्णु नलावडे

जनरल मर्चंट फोन : १६

## श्री. कृष्णा एन्. बोरफळकर

## श्रीकृष्ण फर्निचर वर्क्स

इमारती व फर्निचरसाठी सर्व प्रकारचे
लोखंडी सामान योग्य भावात मिळेल

प्रोप्रा : मेस्त्री बंधु

दे व ग ड, जि. सिंधुदुर्ग

# वेदनेची व्यथा

स्मृती त्या उगाळून
मनी दुःख होते
वेदनेच्या व्येची
धार शिघ्र होते
अंधारल्या जगी
वाट ही काटेरी
काळोखात माझा
जीव खालीवर होई
अश्रुंची पुष्पमाला
दुःखाच्या सोबती
वेदनेची व्यथा
होती ग संगती
सखे तुझी भेट
झाली ती अखेरी
पाण्याचा तो हंडा
होता डोईवरी
सखे तुझे माझे
प्रीतिचे ते गाणे
मनी गात बसतो
होता आठवण
तुच माझा आत्मा
तुच माझा प्राण
हृदयात माझ्या
तुझे अमोल स्थान
तुझ्याविण सखे
मीच कसा राहू

# दृढ निश्चय

कधीं न तुला भेटणार
कधी न तुज विचारणार
कधीं न कधी शब्दात
मीच मला ओवणार.

झरतो बघ एक अश्रु
त्यात तुझी मूर्ती दिसे
टाकतो निश्वास एक
त्यात तुझी स्मृती असे

पण हे सारे असेच
मिटुनी ओठ संपणार
निश्चय हा अती कठोर
हे असेच चालणार


**जयंत साठम**
प्रथम वर्ष कला

---

का तुझ्या सोबती
स्वयं मीच येऊ ?
स्मृतीची वलये
मनी उठतात
आणि माझे डोळे
आणि माझे डोळे
अश्रू ढाळताय

**विलास कांबळी**
प्रथम वर्ष वाणिज्य

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !



मेसर्स

**श्रीराम मोरेश्वर गोगटे**

*आंबा वाहतुक सर्व्हिस*

जामसंडे व नाडण

तहसील– दे व ग ड, जिल्हा– सिंधुदुर्ग पीन-४१६६१२

## जीवनाचा अर्थ

आयुष्याच्या कितीतरी वाटा
पायाखाली तुडविल्या गेल्या
अजून ध्येय दूर आहे
कुठवर चालायचं समजत नाही
दूरवर यशाचे शिखर दिसते
वाटेवर वाटसरु भेटतात
साथ देऊन निघून जातात
अखंड साथी कुणीच नाही
दूरवर यशाची तुतारी वाजते
पण तुतारी ऐकायला मन
स्थिर नसते–ते भरकटते
जीवन जगण्यासाठी आहे
पण त्यातला अर्थच कळत नाही.

चंद्रकांत परब
द्वितीय वर्ष वाणिज्य

## निसर्ग प्रेम

छंद मला निसर्गाचा
त्याच्या कला सौन्दर्याचा
वेडं मन धुंद फुला
लाभ तव दर्शनाचा
कसं सांगु किती तुला
ओठाशी शब्द थांबला
धुंद मन भिरभिरते
आठवुनी पुष्पा तुला
सुटो हवा वादळी
मार्ग काटे चिखली
तुझ्यासाठी धावेन मी
सोडूनी सर्व साऊली
स्वप्न तुझे जागेपणी
छळत असे नयनाला
येशील का मम अंजली
सांग मज सांग फुला
जळणाऱ्या गवताचा
जाळ मुळी दिसणार
फुका भय कशासाठी
मरणात जग जगणार

चंद्रकांत परब
द्वितीय वर्ष वाणिज्य

## एक वृक्ष

एक वृक्ष मातीत वाढलेला मातीवरी पोसलेला
शेवटी मातीनेच त्याला स्वघशात घेतला
होता जीवनाची रंगवीत स्वप्ने कालपर्यंत
सकाळ होता स्वप्नाचे रुपांतर बनले राखेत
करुनी निराधार नवरोपटयांना जगात
होती दहा डिसेंबरची सकाळ उजळत
बागडत होत्या वेली त्याच्या फांद्यापानावरती
सकाळ होता सर्व त्या भूवरी कोलमडती
कित्येक हळहळती, तसे आक्रोशतीही
परि वृक्ष न हाले न डोले जराही
दुःखात न्हाऊनी तव आप्तेष्टमाला
सुवर्ण पर्ण रुपी अश्रू अर्पिती तयाला
उमजे जेव्हा रोपटयांना रडुनी त्यांनी आकांत केला
परि वृक्षावरी याचा काही परिणाम नाही झाला
पृथ्वीच्या कुशीत तो चिरनिद्रेसाठी पहुडला
मग असेल कशी ? वादळी वाऱ्याची चिंता
त्याला

मनोहर जोईल
बारावी वाणिज्य

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

**उजाडले, पण सूर्य कोठे आहे ?**

**या प्रश्नाचे उत्तर सहकाराला सापडले आहे.**

ग्रामीण कर्जमुक्ती, भूमिहीन, बेघर, जंगलकामगार, शेतकरी, मच्छिमार
आदि गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी सहकाराचा हा सूर्य खेडोपाडी पोहचला आहे
सहकाराचा हा मंत्र घेऊन स्वावलंबनाच्या मार्गाने मच्छिमारांचे हित जपणारी सिंधुदुर्गच्या
सहकारी क्षेत्रातील अग्रेसर मच्छिमार संस्था

**तारामुंबरी सहकारी मच्छी व्यावसायिक संस्था मर्या.**

**मु. पो. तारामुंबरी ता देवगड, जि. सिंधुदुर्ग**

**ऑडिट वर्ग 'अ'** **फोन ४२**

● मासळी विक्री ● डिझेल व मच्छिमार साहित्य विक्री
● ट्रक व टेंपोद्वारे वहातुक व्यवस्था

मासेमारी व्यवसायाची आपली कोणतीही अडचण असो आम्ही निश्चित काहीतरी मदत करूच

| | | |
|---|---|---|
| **मंगेश ना. कुबल** | **लक्ष्मण मा. गोलतकर** | **मुरलीधर ल. जोशी** |
| व्यवस्थापक | व्हाईस चेअरमन | संस्थापक व चेअरमन |

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !

**चोपडेकर ब्रदर्स**

**देवगड फोन ५६**

**उत्कृष्ट फोटोग्राफीसाठी**

**रामदास फोटो स्टुडिओ**

(लग्न व शुभकार्याच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील)

**ताज्या व उत्कृष्ट फराळासाठी**

**समता उपहार गृह**


**चवदार मच्छीजेवणासाठी**

**समता भोजनालय**

## जाण्यासि ज्या परत न येणे....



इंदिरा गांधी



यशवंतराव चव्हाण

## * श्रद्धांजली *



**हेमंत हिरनाईक**

प्रथम वर्ष कला ह्या वर्गातील महाविद्यालयाचा हा गुणी विद्यार्थी
काळाने अचानक आमच्यातून हिरावून नेला... ... ...

प्राचार्यांसमवेत कलाशाखेचे विद्यार्थी-



निरोप........



प्राचार्यांसमवेत वाणिज्य शाखेचे विद्यार्थी

# भारतरत्न श्रीमती इंदिराजी

नथुराम उपदकर
तृतीय वर्ष कला

३१ आक्टो. १९८४ सकाळी ९ वाजून १८ मिनीटे. अचानक अवकाशातून स्वयंप्रकाशित सूर्य तुटून खाली कोसळला. पण त्या तळपत्या सूर्याचा प्रकाश आजही जगाचा संपूर्ण कानाकोपरा व्यापून आहे. स्वतेजाने तळपणाऱ्या सूर्याचा शेवटपर्यंत विघ्नसंतोषी गटाना अडथळा व्हावा, का तर आपल्या संकुचित वृत्तीप्रवृत्तीना वाव मिळविण्यासाठी. कारण आजपर्यंत अशा प्रकाशात तळपणाऱ्यांना त्यांच्या कार्यापासून वेगळे करण्याचे प्रयत्न झालेत. किती समाजविघातक कार्य ! आणि अशा अंधाऱ्या भागाला स्वतःचा प्रकाश देणारे श्रीमती इंदिराजी सारखे रत्न त्यांच्या कार्यात आडवे येणे त्यांना खपत नाही. त्यांना आपल्या कार्यापासून वेगळे करण्यासाठी या गटांनी आपले संपूर्ण जाळे या भारतरत्नाभोवती आवळून त्यांना निष्प्रभ करण्याचे प्रयत्न केले. त्यात त्याना यश मिळालं पण त्याचं हे यश अल्पकाळ टिकलं. त्यांची इच्छा सफल झाली नाही. इंदिराजींच्या शरीरातील प्राण निघून गेला पण त्यांचं कार्य, त्यांचा आत्मा, त्यांचे विचार आजही इथल्या कणाकणाला चिकटून आहेत, येथील रक्तारक्तात भिनलेले आहेत. ते पुसले जाणार नाहीत.

इंदिराजींना जे कार्य करायचे होते ते त्यांच्या अनुपस्थितीत होणारच आहे. कारण त्यांनी आम्हाला केलेल्या मार्गदर्शनाने देशाला आपल्या तेजात तळपत ठेवले आहेच. त्यांनी आम्हाला दिलेले धैर्य, चिकाटी, निश्चय आज आमच्याजवळ आहे आणि त्या बळावरच त्यांना प्रिय असलेले ऐक्य आणि एकसंघ भारत आम्ही निर्माण करु. त्या स्वतः बालपणापासून भारतासाठी वाढल्या, भारतासाठी जगल्या आणि भारतासाठी उभ्या ठाकल्या. शेवटी भारतासाठीच स्वतःच्या छातीवर गोळ्याही झेलल्या. हा यज्ञ त्यांनी संपूर्ण, अखंड भारतासाठी केला. आम्ही सर्व देशबांधव शेजारी राहून एकमेकांचे वैरी बनू नये म्हणून त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केलेत. त्याना माहीत होतं की यासाठी प्रसंगी प्राणही द्यावे लागतील. देशाचे तुकडे तुकडे होण्याचे वाचवायचे असतील, येथील प्रत्येकाला आपल्या एकतेची जाणीव व्हायची असेल आणि त्यासाठी आपले प्राण हवे असतील तर ते आपण हसत देऊ ! असा हा अलौकिक निर्धार होता.

अशा या महान क्रांतिकारक देशसेविका, स्वातंत्र्याच्या तपस्विनी, देशप्रेम व स्वातंत्र्याचे धडे बालपणापासून गिरवत होत्या. घरी मेजावर उभे राहून सर्व नोकरवर्गाला बोलावून त्यांच्यासमोर आपल्या पित्याच्या तोंडची वाक्ये आठवून बोलत होत्या. एकेक पाऊल पुढे टाकत होत्या.

९ ऑगस्ट १९४२. सर्व भारतीय नेत्यांची धरपकड चालली होती. गांधीनी छोडो भारताचा आदेश दिला होता. अशा कठीणप्रसंगी इंदिराजी बाहेर राहून भूमिगताना पैसा आणि राजकीय प्रचारसाहित्य तसेच संपर्काचं महत्वाचं कार्य करत होत्या. मानेवर सतत ब्रिटीशांची टांगती तलवार होती.

तरीही त्या मोठ्या आत्मविश्वासाने कार्य करत होत्या. तुरुंगवासाची पर्वा नव्हती. त्यांच्या थोर मनाचे प्रत्यंतर त्यांच्या प्रत्येक कृतीतून येते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची घटना. त्यावेळी त्यांची धावपळ व त्रासाने प्रकृती खालावली होती. पण महात्माजींच्या आदेशाप्रमाणे त्या दिल्लीच्या मुस्लीम मोहल्ल्यात गेल्या. त्याना खायलाप्यायला मिळते की नाही, त्यांचे कसे काय चालले आहे ते पाहिले. यावेळी हिंदुमुस्लीम दंग्याना जोर आला होता.

अशावेळी कोणीही कार्यकर्ता बाहेर पडायला तयार नव्हता. इंदिराजींना मुस्लीम मोहल्लाही माहीत नव्हता. अशावेळी धैर्याने आपलं शिर हातात घेऊन त्या मुस्लीम मोहल्ल्यात गेल्या, ते भारतातील पिडीत बांधवासाठी दोन भावांत चाललेला झगडा मिटवण्याठी, त्यांच्या आशेचा किरण उगवण्यासाठी. त्यांना काय हवं होतं ? पंतप्रधानपद की हुकूमशाही ? नाही, त्यांना आसवं पुसायची होती, भुकेल्यांची सोय करायची होती आणि आम्ही काय करत होतो ? त्यांनी दोन हिंदू मारले तर आम्हाला चार मुस्लीम कसे मारता येतील याचे बेत आखत होतो. त्यावेळी इंदिराजींना हुकूमशहा, लोकशाही विरोधक हे संबोधणारे आजचे पुढारी कोठे होते ? इंदिराजींवर अनेकांनी ओरखडे ओढले. यावेळी त्यांच्याच शब्दाने दिलासा मिळतो. ' जे पकडले गेले किंवा मेले त्यांचा शोक करू नका, पण जे उदासीन आहेत त्यांचा शोक करा. '

या महान तेजस्विनीचा जन्म १९ नोव्हें. १९१७ रोजी अलाहाबादला झाला. भारताच्या सेवेसाठी एक रत्न हजर झालं. १९२८ मध्ये महात्मा गांधींच्या चरखा संघाचा बालक विभाग त्यानी स्वतः सुरू केला. आपल्या कार्याला आणखी धार येण्यासाठी वानर संघटना स्थापन केली. चलेजाव आंदोलनात सर्व नेतेमंडळी तुरुंगात जात असताना त्यांचं काम स्वतः करण्यास सुरवात केली. १० सप्टें. १९४२ मध्ये आठ महिन्याच्या कारावासानंतर दिल्लीत मुसलमान मोहल्ल्यात त्यांच्यावर कोसळलेल्या आपत्तीतून मार्ग काढण्यासाठी त्यानी जिकीरीचे कार्य केलं.

त्यांचं कर्तृत्व, संपन्न व्यक्तिमत्व, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, महात्मा गांधींच्या जवळचा. त्यांनी हा दृष्टिकोन, रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनमध्ये शिकला. तेथे त्याना भारतीय संस्कृतीचं दर्शन झालं. त्याची छाप इंदिराजींवर पडली. त्यानंतर त्या शिक्षणासाठी लंडन व स्वित्झर्लंडमध्ये राहिल्या. तेथील भाषा व संस्कृतीचं ज्ञान प्राप्त करून घेतले. आपल्या पवित्र देशासाठी आपलं पवित्र कार्य त्यांनी तेथूनच सुरू केलं. आपल्या पित्याच्या कारकीर्दीत त्यानी पंडितजीना उल्लेखनीय मदत केली. साहजिकच पंडितजींनी आपला वारस म्हणूनच इंदिराजींना घडवलं व भारतीय जनतेला एक धगधगता, कर्तव्यतत्पर, तेजस्वी व्यक्तिमत्वाचा सेवक अर्पण केला. असा हा धगधगता निखारा देशाच्या सर्वोच्च नेतेपदी चढला. २४ जानेवारी १९६६ रोजी हा नेता भारताचा तिसरा पंतप्रधान बनला.

अशा या निखाऱ्याची झळ जशी संधीसाधू राजकारण्याना लागली. तशीच ती आंतरराष्ट्रीय साम्राज्यवाद्याना लागली. याचा दाह त्याना सहन होईनासा झाला. तरी हा निखारा आपल्या मायेचा प्रेमळ प्रकाश आपल्या लेकरांवर पांघरत होता. त्या प्रेमापायी जनतेनं परत १८ मार्च १९७१ मध्ये त्यांना पंतप्रधानाचा मान दिला. आपल्या शेजारी बांधवांच्या दुःखात सामील होवून त्यानाही सुरक्षितता, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व प्रदान करण्यासाठी बांगला देशाच्या बाजूनं युद्धात उडी घेऊन शेजाऱ्याच्या हाकेला ओ देवून आपलं कर्तव्य निभावलं. हुकूमशहाना आपली मान खाली झुकवावी लागली.

त्यानंतर आलेली आणीबाणी, देशात माजलेला गोंधळ कमी करण्यास कारणीभूत ठरली. परंतु जनता इंदिराजीवर रागावली. पण हा राग फक्त दोनअडीच वर्षेच टिकला. इंदिराजींच्या नेतेपणाला दुसरा पर्याय नाही हे जनतेला पटलं. आपल्या इंदिराजी १४ जानेवारी १९८० मध्ये पुन्हा पंतप्रधान बनल्या. भोळ्या जनतेनं पुन्हा एकदा विश्वास टाकला. आता स्वस्थपणानं आपलं कार्य करावं भारताला ठराविक दिशेने प्रगतीच्या शिखरावर न्यावं

उत्तरोत्तर प्रगती करावी यासाठी २० कलमी कार्यक्रमाद्वारे आपलं ध्येय निश्चित केलं. भारत प्रगत राष्ट्रांच्या मालिकेत बसायला, त्यांच्या पंगतीस धडके देवू लागला. याची जाग विकसित देशाना व हितशत्रूना आली. त्याना संकटाची चाहूल लागली. भारताची चारी बाजूनी चाललेली घोडदौड, नेत्रदीपक प्रगती, भारताची समृद्धी खुपणाऱ्या पाशवी शक्तीनी अशा या महान तेजस्विनीभोवती आपले पाश आवळण्यास सुरवात केली.

इंदिराजीना अशा फुटीरवादी धर्मांधाकडून धमक्या येत होत्या. त्यांची त्यांना पर्वा नव्हती. त्यांच्या त्या स्वतःच्या राहिल्याच नव्हत्या. पूर्वीपासून व मृत्यूच्या एक दिवस अगोदर 'ओरिसा'च्या दौऱ्यात त्यांनी निक्षून सांगितलं, 'राष्ट्रकार्य करताना माझा बळी पडला तरी मला दुःख वाटणार नाही. या राष्ट्रासाठी माझ्या रक्ताचा थेंब न थेंब कारणी लागला याचे मला समाधान होईल.'

खरोखरच त्यानी आपल्या शरीरातील रक्ताचा शेवटचा थेंबही राष्ट्राच्या एकतेसाठीच ३१ ऑक्टोबर सकाळी ठीक ९-१८ वाजता राष्ट्राला अर्पण केला. याची त्याना कल्पना होती. हे केव्हा तरी होणार होतं. त्यासाठी त्या सदैव तयारीत होत्या. भारताचा कारभार हा आपल्या सेवेतून फुलवत राष्ट्राच्या ऐक्यासाठी वेदीवर आपला बळी देवून त्या हुतात्मा बनल्या.

आणि त्याबरोबर तुम्हा-आम्हावर जबाबदारी टाकली. ती कोणती हे त्यांनी सांगितलं आहेच, 'आमचा शत्रू एकच आहे—सामाजिक आणि आर्थिक अन्याय. आणि आपले ध्येयही एक आहे. बलवान, स्वावलंबी भारताची निर्मिती करावी, जातियतेचं, प्रांतियतेचं, प्रादेशिकतेचं व संकुचित वृत्तीचं भूत आपण आपल्या मनातून काढून टाकावं. त्यातच एकसंध भारताचं हित आहे.' यासाठी फूटीरवाद्यांना त्यापासून परावृत्त करून त्या प्रवृत्तीशी लढा देऊन राष्ट्रीय एकात्मता साधता येईल. अन्यथा राष्ट्राच्या एकीला खिंडार पडेल.

स्वतः इतिहास घडवणाऱ्या अशा थोर महात्म्याला श्रद्धांजली ही आम्ही त्याचं राहिलेलं कार्य करुनच व्हावी. त्यांना निव्वळ शब्दांची श्रद्धांजली नको! त्यांच्या आत्म्याला पहायला हवं आहे. जात, प्रांत, धर्म विसरलेला भारतीय समाज. असा समाज राष्ट्राच्या प्रगतीसाठी आपलं सर्वस्व अर्पण करणारा भारतीय नागरिक तसेच भारताचे मोठेपण, भारताची सहिष्णुवृत्ती दुसऱ्या धर्मा-पंथाबद्दल आदर, त्याचं पावित्र्य जपणारा भारतीय नागरिक. आणि अशानेच भारताची स्पष्ट प्रतिमा उभी राहील. त्यामुळेच जागतिक साम्राज्यवादी पुन्हा संभ्रमात पडतील. खरोखर इंदिराजी भारतात अजुनही वास करतात की काय? आणि तीच श्रद्धांजली इंदिराजीना पोहचेल. त्यावेळी स्वर्गीय पंडितजी मुलीस लाडिकपणे म्हणतील, इंदू, खरोखरच तू सांगत होतीस ते खर होतं. ते बघ भारतवासी, तुझं राहिलेलं कार्य करताहेत!

भारतीय जनतेवर इंदिराजींचा दृढ विश्वास होता आणि या विश्वासाच्या आधारावर त्या म्हणू शकतात 'भारतीय जनता अशा विकट परिस्थितीतून नक्कीच बाहेर पडेल. तसेच द्वेष आणि सूडाच्या भावनेला तिलांजली देऊन एकजुटीने पुढे वाटचाल करील.'

अशा या इतिहास निर्माण करणाऱ्या, विसाव्या शतकातील जगप्रसिद्ध थोर महात्म्यास माझे कोटी-कोटी प्रणाम!

# महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण

वनिता हिंदळेकर
तृतीय वर्ष कला

दिनांक २५ नोव्हेंबर १९८४ ला स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या इतिहासातील एका दैदिप्यमान पर्वाचा अस्त यशवंतराव चव्हाणांच्या मृत्यूने झाला. काँग्रेसमध्ये त्या एका ओॲसिसचे वाळवंट झाले. महाराष्ट्राच्या मानसात समरस झालेल्या, महाराष्ट्राने एकमुखाने गौरवलेला, सुसंस्कृत राज्यकर्ता, मानवतेचा झरा, समाजवादी सहकारी चळवळीचा नेता, स्वातंत्र्य सैनिक, कुशल प्रशासक, राजकारणात राहूनही सांस्कृतिक विषयाचा भोक्ता, आठव्या अर्थआयोगाचा अध्यक्ष, परराष्ट्र मंत्री, इंदिरा काँग्रेसचा जेष्ठ नेता व खासदार, सामान्य जनतेचा नेता, महाराष्ट्रीय जनतेचा आप्त या बहुविध नात्यानी महाराष्ट्राशी समरस झालेला नेता आपल्या मृत्यूने साऱ्या महाराष्ट्रावर दु:खाचे आभाळ कोसळून गेला.

यशवंतरावांच्या बालपणीचा विचार करता आपल्याला असे आढळते की, सामान्य माणसाच्या जीवनात राजकारण, समाजकारण इ. क्षेत्राना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यांचा जन्म कऱ्हाड नजिकच्या देवराष्ट्रे या खेड्यात १२ मार्च १९१४ ला झाला. त्यांचे वडील बेलिफ होते. बालपणीच पितृसुखाला मुकलेले यशवंतराव यांचा सांभाळ त्यांची आई व जेष्ठ बंधू यांनी केला. बालपणापासूनच त्यांनी आपल्या तल्लख बुद्धीची चुणूक दाखविली. आपण मोठे व्हायचे या ध्येयाने ते प्रेरीत झालेले होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण देवराष्ट्रे या खेड्यात झाले. त्यांच्या कुटुंबियाजवळ आर्थिक पाठबळ नसतानाही शिक्षण घेण्याच्या तीव्र इच्छेपोटी १९२७ ला कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये त्यानी प्रवेश घेतला. विद्यार्थीदशेतच त्यांनी आपले लक्ष स्वातंत्र्य चळवळीत व ध्येयवादी दृष्टी निर्माण करण्यात घालवले. १९३० ला त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. त्यामुळे त्यांना विद्यार्थीदशेतच सश्रमकारावासाची येरवडा तुरुंगात शिक्षा झाली. तुरुंगात असताना त्यांना आचार्य भागवत, यासारख्या थोर मंडळींचा सहवास लाभला. त्यांच्या सहवासामुळे त्यांना विद्यार्थी जीवनाच्या बाहेरच्या जगाची, त्याच्या तत्त्वज्ञानाची ओळख झाली. देशाबद्दल असणारे प्रेम आचार्यांच्या सहवासातून अधिकच उत्कट बनले. बालवयातील या तुरुंगवासाने त्यांच्या भावी कर्तबगारी यशाचा पाया घातला.
या विद्यार्थीदशेत त्यांची सामान्य समाजाची सेवा करण्याची इच्छा होती. त्यामुळे अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयात रस घेऊन आपल्या शालेय जीवनाची यशस्वी वाटचाल करुन ते पदवी परीक्षा पास झाले.

महाराष्ट्रीय मातीत रुजणारा लोकशाही समाजवाद त्यांना हवा होता व याच ध्येयपूर्तीकरता त्यांनी नेहरुंचे, पर्यायाने काँग्रेसचे ध्येय मान्य करून १९३४ ला काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला. १९४२ च्या आंदोलनाच्या सातारयातील भूमीगत चळवळीचे नेतृत्व यशवंतरावांकडे आले. त्यावेळी त्यांना नाना पाटील, किसनवीर, पांडूमास्तर यासारखे सहकारी लाभले. भूमीगत चळवळीचे नेतृत्व केले या सबबीखाली त्यांना कारावास

भोगावा लागला. कारावासातून सुटून आल्यावर त्यांनी १९४६ च्या निवडणुकीत भाग घेऊन यश मिळविले. नंतर त्यांचा प्रांतिक मंत्रीमंडळात समावेश झाला. १९४७ पर्यंत त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीकरता व ग्रामीण समाजाचे प्रश्न सोडवण्याकरता प्रयत्न केले. इतरांशी जुळवून घ्यायची वृत्ती, मृदु स्वभाव यामुळे कार्यकर्त्यांना संघटित करून त्यांनी बहुमोल कार्य केले.

वयाच्या ४२ व्या वर्षी म्हणजे १९५६ साली मुंबई प्रांतासारख्या सर्वात मोठया प्रांताचे ते मुख्यमंत्री झाले. कॉंग्रेसश्रेष्ठीत त्यांची गणना होऊ लागली. पंडित जवाहरलाल नेहरुंवर त्यांची एकनिष्ठ श्रद्धा होती. यशवंतरावांच्या राजकीय जीवनाचा परामर्श घेताना संयुक्त महाराष्ट्राचा कालखंड महत्त्वाचा आहे. वयाच्या ४२ व्या वर्षी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बनून त्यांनी आपल्या अद्वितीय कर्तबगारीची साक्ष दिली व यामुळेच त्यांच्या राजकीय विचारांची, कर्तृत्वाची दिशा निश्चित झाली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ज्यावेळी जोमाने चालू होती त्यावेळी नेहरूवरील निष्ठेपायी ' महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे ' असे विधान करून स्वतःवर अपप्रचाराचे मोहोळ त्यांनी उठवून घेतले. संयुक्त महाराष्ट्रवाल्यांनी त्यांना बदनाम करण्याचा, राजकीय जीवनातून उठवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राचे मारेकरी, सूर्याजी पिसाळ यासारखी विशेषणे लावली. परंतु स्वतःच्या मताशी एकनिष्ठ असणारे यशवंतराव प्रखर निष्ठेमुळे व स्वकर्तृत्वाने या अपप्रचाराच्या मोहोळातून सहीसलामत बाहेर पडले. संयुक्त महाराष्ट्राकरता त्यांना सलोख्याचा, मुत्सद्दीपणाचा, सनदशीर मार्गाचा अवलंब हवा होता. महाराष्ट्राच्या यशस्वी जीवनाची वाटचाल करून ते दिल्लीला पोहोचले.

आपल्या राजकीय जीवनात यशवंतरावांनी महाराष्ट्रात अनेक कार्यकर्ते निर्माण केले. राजकीय जीवनातील सारी वाटचाल स्वतःचे वेगळेपण दाखवण्यात व आपली राजकीय जीवनातील अपरिहार्य ठरणारी महत्त्वाकांक्षा साकार करण्यात खर्च केली. संरक्षणमंत्री, अर्थखाते, गृहखाते, परराष्ट्रखाते या सारखी महत्त्वाची खाती सांभाळून त्यात ते यशस्वी झाले.

१९६२ च्या चीनी आक्रमणाच्यावेळी पं. नेहरूंनी त्यांना दिल्लीला बोलावले. त्यावेळी ' हिमालयाच्या मदतीला गेलेला सह्याद्री ' म्हणून त्यांचा गौरव झाला. अर्थमंत्री असताना त्यांनी बँकांना समाजाभिमुख बनवण्याचा प्रयत्न केला. कर्ज देण्याच्या पद्धतीत बदल केला. लहान व्यापारी, लहान शेतकरी, लघु धंदे यांना अल्पदराने कर्ज देण्याची कल्पना त्यांनी मांडली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर असे कार्य करणारे ते पहिलेच अर्थमंत्री होत. यशवंतरावांची ग्रामीण अर्थव्यवस्थेबद्दलची ओढ पहाता त्यांनी ग्रामीण समाज व्यवस्थेत क्रांतिकारक बदल केले. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद यांना जास्तीत जास्त अधिकार दिले. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला प्रोत्साहन देण्याकरता सहकारी तत्त्वावर साखर कारखाने उभारले व सहकार चळवळ यशस्वी केली.' आज सहकार तत्त्वाचा वटवृक्ष चव्हाणांच्या खतपाण्यावर पोसला आहे.' त्यांच्या विविध कार्याचा विचार करता ते महाराष्ट्राच्या राजकीय, औद्योगिक, सामाजिक जीवनात यशस्वी झाले. त्यांच्याजवळ महत्वाची पदे असूनही रक्तात नसणारा अहंकार, मनमिळावू वृत्ती सामान्यांबद्दलची आस्था या गोष्टी त्यांच्या यशस्वितेला कारणीभूत ठरल्या.

तसा विचार केला तर राजकारण व साहित्य यांचे वावडेच असते. पण यशवंतरावजी याला अपवाद होते. साहित्यावर त्यांचं अपार प्रेम होते. बालपणापासूनच त्यांना साहित्याची आवड होती. त्यांनी स्वतः लेखनही केले. कलाक्षेत्राला रसिक या नात्याने जाणीवपूर्वक साथ दिली. त्यांच्याजवळ उत्तमोत्तम ग्रंथ होते. ग्रंथकार, विद्वान, लेखक, कवी, कलाकार यांच्याबद्दल त्यांना आस्था होती. साहित्य संस्कृती मंडळातर्फे कवीताकार, कादंबरीकार अशा व्यक्ती, ज्यांना लोकप्रियता नाही पण संशोधन व ज्ञानवृद्धी अपार आहे अशांच्या मौलिक शास्त्रीय साहित्याच्या प्रकाशनास सहाय्य केले. मराठी भाषेबद्दल त्यांना अपार प्रेम होते व त्या प्रेमापोटीच त्यांनी जगातील उत्तमोत्तम ग्रंथ मराठीत आणले. साहित्याचे प्रेम असणारे यशवंतरावजी यांनी सांस्कृतिक विषयात रस असणाऱ्या परंतु लोकप्रियता नसणाऱ्या व्यक्तींना

पुढे आणण्याचा प्रयत्न केला. राजकारणाबरोबर साहित्याची चाड असणारा हा नेता संस्कृत संमेलन, साहित्य संमेलन, कवींची, गायकांची मैफल यात आवर्जुन हजर रहात असे.

असे हे यशवंतराव चव्हाण राजकारणात दोन देणारे व दोन घेणारे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन सावधपणा, धोरणीपणा, सुसंस्कृतपणा, प्रामाणिक कष्ट स्वतःच्या मताशी एकनिष्ठ असणे या विविध पैलूंच्या बळाबर ते महाराष्ट्राचे शिल्पकार बनले. परंतु जीवनाच्या शेवटच्या पाच-सहा वर्षात त्याना हार खावी लागली. इंदिरा गांधीशी राजकारणाची काही काळ सोडलेली साथ, चरणसिंग मंत्रिमंडळात स्विकारलेले उपमहामंत्रीपद या घटनांच्या संदर्भात त्यांचे राजकीय डावपेच वादग्रस्त ठरले. त्यानी घेतलेल्या या भूमिकेमुळे अनेक सहकाऱ्यांचा रोष ओढवून घेतला. नंतर इंदिराबाईंच्या पडत्याकाळात १९७७ च्या निवडणुकीनंतर बाईंची साथ सोडून ते समाजवादी कॉंग्रेसमध्ये आले. पुन्हा १९८१ ला इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून लोकांच्या निर्भत्सनेस बळी पडले. काहीनी त्यांना सत्तालोलुपी ठरविले. त्याना स्वतःही याचा त्रास झाला. आणीबाणीच्यावेळी इंदिराबाईना यशवंतरावांची साथ नको होती. साहेबाना खच्ची करण्याचे प्रयत्न होऊ लागले. पण महाराष्ट्रात घडणाऱ्या बदलात यशवंतरावांच्या शब्दाला किंमत होती. आणीबाणीत मानवी मूल्यांची होणारी गळचेपी याविरुद्ध व्यक्ती स्वातंत्र्यावर आधारलेले रॉयवादी गटातून आलेले यशवंतराव गप्पच राहिले हे सर्वात मोठे दुर्दैव होय. आणीबाणीतंरच्या काळात त्यांच्या मनाने कधी उभारी घेतलीच नाही. इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्याने शरद पवारावारखे सच्चे अनुयायी गमवावे लागले. दुर्दैवाने याचवेळी त्यांच्यावर व्यक्तिगत आपत्तीही आल्या. महाराष्ट्राला खंबीर नेतृत्व देवून महाराष्ट्राचे शिल्पकार असणारे धुरंदर राजकारणी पत्नी व पुतण्या यांच्या मृत्यूने पार कोलमडले. मानसिकदृष्ट्या ते एकाकी बनले. सह्याद्रीची उपमा दिलेला उत्तुंग नेता सहचारिणीचा मृत्यू पेलू शकला नाही. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्राच्या सुवर्णकाळाचा अंत झाला. महाराष्ट्राचे सांस्कृतिक-राजकीय जीवन पोरके झाले. मराठी माणसाचा आप्त या मृत्यूने गमावला. या साऱ्याना पोरके करून यशवंतरावजी आपल्यातून गेले. त्यांच्या स्मृतीला माझे व माझ्या महाविद्यालयाचे विनम्र अभिवादन.


श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय,
देवगडला व रसराजला हार्दिक शुभेच्छा !

**सर्व प्रकारच्या साड्या, कापड, मुलांचे रेडिमेड कपडे,**
**पँट व शर्टपीस, टेलरिंग मटेरियल,**
**यांचे प्रमुख स्टॉकिस्ट**



**कविता वस्त्रालय**
बाजारपेठ देवगड
प्रोप्रा- **राजा कदम**

# ग्रामीण विकास सर्वेक्षण

अंजली नलावडे
द्वितीय वर्ष कला

**प्रस्तावना :**

भारतात ८० टक्के लोक खेड्यात रहातात. या खेड्यांचा विकास करणे हे अर्थव्यवस्थेचे आद्य कर्तव्य ठरते. येथील लोक अंधश्रद्धा, रूढी, भ्रामक समजुती आणि निरक्षरता यामुळे अविकासाच्या अंधारात चाचपडत आहेत. त्यांना प्रकाशाच्या किरणांचा दृष्टांत होणे आवश्यक आहे. त्यांच्यापर्यंत अधुनिकीकरणातील नवजीवनाचे मर्म पोचविणे अत्यावश्यक आहे.

गांधींच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना असे आढळते की खेड्यांचा विकास केल्याशिवाय आपणाला आर्थिक विकासाचे पुढचे पाऊल टाकता येणार नाही. खेडी ओस पडली तर भारताचा नाश होईल असे त्यांनी भाकीत वर्तविले होते. त्या भागातील उणीवा, त्रुटी यांची जाणीव आपणास होणे आवश्यक आहे. या भागात कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, तेथील लोकांचे विचार, समजुती, आर्थिक स्थिती पहाणे आवश्यक आहे व या अडचणी दूर करण्यासाठी कोणते प्रयत्न करता येतील याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्हा युवक मंडळींचा हा प्रयत्न !

**उद्देश :**

मिठबाव गावच्या विकासातील अडचणी कोणत्या ? हे जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण करताना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक पहाणी करून, या गावच्या सद्यःपरिस्थितीचे चित्र स्पष्ट करून विकास करण्यास कोणते उपाय योजता येतील हे सांगण्याच्या उद्देशाने या गावचे सर्वेक्षण हाती घेण्यात आले. हा अभ्यास तीन गटात स्पष्ट केला आहे.

**अभ्यासाची पद्धती :**

नमुना पद्धतीचा अवलंब.

१) सद्यःस्थिती
२) विकासातील अडचणी
३) विकासासाठी सूचना

## १) सद्यःस्थिती :

अ) भौगोलिक रचना :

देवगड तालुक्यातील डोंगराच्या कुशीत लपलेले निसर्गरम्य ठिकाण म्हणजे मिठबाव असंच म्हणावं लागेल. त्याच्या एका अंगाने खाडी आहे व एका बाजूस भव्य पर्वतराजी आहे. मिठबाव गावात एकूण ३० वाड्या आहेत. गावचे क्षेत्रफळ १६२४७० चौ. कि. मी. आहे. जमीन व जमीन मालकीसंबंधी विविध नोंदी तेथिल स्थानिक सरकारी दप्तरात आहेत.

ब) शिक्षण :

विसाव्या शतकात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणाविना आजचे जीवन व्यर्थ आहे. मिठबाव गावात प्राथमिक शाळा ४ असून माध्यमिक विद्यालय एक आहे. येथील एक बालवाडी महिलामंडळ चालविते व येथे एक अध्यापक विद्यालय आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर मात्र येथील मुलांना उच्च शिक्षणासाठी देवगड येथे यावे लागते. मिठबाव गावात किंवा जवळपासही तांत्रिक शिक्षणाची सोय नाही. तसेच विद्यार्थ्याला बाहेर पाठवणे हे पालकांना परवडण्यासारखे नाही. या गावात अध्यापक महाविद्यालय असल्याने १० वी पास झाल्यानंतर मुले

त्या क्षेत्राकडे वळलेली आढळतात. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

क) वैद्यकीय सोयी :

मिठबाव गावचा सर्व्हे करताना आरोग्यविषयक परिस्थितीसंबंधी खालील माहिती मिळाली. या गावात आरोग्यविषयक सोयी, समजुती, डॉक्टरवरील येथील लोकांचा विश्वास यावरून आरोग्यविषयक स्थिती समाधानकारक आहे. मिठबाव येथे जि. प. दवाखाना एक, खाजगी दवाखाने तीन, पशुवैद्यकीय दवाखाना एक असून लहान मुलांना क्षयप्रतिबंधक लस, ट्रीपल्स, देवीची लस, पोलिओ डोस याबाबत येथील लोक दक्ष आहेत.

ड) वाहने :

एकाद्या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी दळणवळणाच्या सुविधा असणे अत्यावश्यक असते. मिठबाव गावची दळणवळण व्यवस्था साधारण बरी आहे. प्रत्येक वाडीत जाण्यासाठी सडक आहे. देवगड–मिठबाव ५ गाड्या दररोज सुटतात. त्यामुळे येथील लोकांना इतर गावाशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. एप्रिल–मे महिन्यात आंबा मोसम सुरू झाल्यानंतर देवगड येथील आंबा वहातुकीच्या कंपनीचे ट्रक यांची वर्दळ या गावात सुरू होते. तसेच येथे बैलगाडी, टेंपो याद्वारेही वहातुक केली जाते. दळणवळण हे विकासाचे साधन आहे. त्यासाठी यामध्ये वाढ होणे महत्वाचे आहे.

इ) उद्योग :

या गावात किराणा दुकाने २८, हॉटेल ५, पिठाच्या गिरण्या ८, लाकूड गिरण्या २ आहेत. तसेच येथे हातमाग व्यवसाय नव्यानेच सुरू झाल्याने, बेकार मुलामुलींना व रिकाम्या वेळात प्रौढ स्त्रियांनाही रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात थोडीफार भर पडली आहे.

फ) लोकजीवन :

या गावची लोकसंख्या ४३६९ आहे, येथे सुशिक्षितांचे प्रमाण कमी आहे, असे आढळून आले पण साक्षरतेचे प्रमाण जास्त आढळले. येथील लोक धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. या गावात पाच देवालये आहेत. येथे गणेशजयंती, दत्तजयंती, हरिनाम सप्ताह हे सार्वजनिक उत्सव चालतात.

मानवी जीवनात जीवनाश्यक वस्तूंना फार महत्व आहे. या गावातील लोकांना जीवनावश्यक वस्तू नियंत्रित दराने मिळतात. सरकारी दुकानातून काही वेळा धान्य किंवा तेल निकृष्ट दर्जाचे मिळते. डाळी, कडधान्ये सरकारी दुकानातून मिळत नाहीत. त्याचप्रमाणे मिळणाऱ्या वस्तू पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने जीवनाश्यक वस्तू खाजगी दुकानातून घ्याव्या लागतात. जीवनावश्यक वस्तूत भेसळ नसल्याचे उत्तरदात्यांच्या बोलण्यावरून लक्षात आले. मिठबाव गावातील लोकांना स्वस्त दराने कापड पुरवठा होत नाही. येथे खाजगी कापड दुकाने आहेत. काही वेळा येथील लोक कापड खरेदीसाठी देवगडमध्ये येतात.

अन्न–वस्त्राबरोबरच निवाऱ्याची नितांत गरज असते. आमच्या पहाणीत असे आढळुन आले की जवळजवळ ८० टक्के लोकांची स्वतःची घरे आहेत. बाहेरील गावाहून नोकरी-व्यवसायानिमित्त आलेल्या लोकांनी भाड्याने घरे घेतलेली आहेत.

## २) विकासातील अडचणी व गैरसोयी :

अ) सरकारी योजना :

येथील लोकांना सरकारी योजनांचा लाभ घेता येत नाही. कारण सर्वच सरकारी योजना लहान खेड्यापर्यंत पोचू शकत नाहीत. सरकारने नवनवीन योजना जाहीर केल्या तरी लोकांना त्याचा उपयोग होऊ शकत नाही. येथील सुशिक्षित बेकारांना व्यवसाय योजनांचा लाभ मिळत नाही.

ब) शिक्षण :

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर आर्थिक परिस्थितीमुळे व इतर कारणामुळे येथील लोक उच्च शिक्षणास मुकलेले आढळतात. प्रौढांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याने मुलांना उच्च शिक्षणास प्रवृत्त

करण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न होत नाहीत. काहींची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने शिक्षण बंद होते.

क) शेती, पाणीपुरवठा व अधुनिक तंत्रांचा अभाव :
शेती ही पर्जन्यराजाच्या कृपेवर केली जाते. त्यामुळे शेती बारमाही करता येत नाही. म्हणून उत्पन्न कमी येते. येथे पाणीपुरवठ्याचा अभाव असल्याने उन्हाळी पिके घेतली जात नाहीत.

शेती परंपरागत पद्धतीने उदरनिर्वाहापुरती केली जाते. निकृष्ट बि-बियाणे, खते, ट्रॅक्टर वगैरे आधुनिक तंत्रांचा अभाव असल्यामुळे मिठबावमधील शेतीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. कारण येथील लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे.

ड) जोडधंद्यांचा अभाव :
जोडधंदे हे मानवाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत करतात. दुग्धव्यवसाय कुक्कुटपालन, काथ्याव्यवसाय यासारखे व्यवसाय येथे अल्पप्रमाणात केले जातात. वार्षिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शेतीउत्पन्नाबरोबर दुग्धव्यवसायासारखा जोडधंदा फार महत्वाचा ठरतो हे येथील लोकांना अजून समजलेले दिसून येत नाही. कुक्कुटपालन हा जोडधंदा बहुतेक घरातून स्थानिक अथवा स्वतःच्या गरजेसाठी केला जातो. आमच्या पहाणीत असे आढळून आले की जवळजवळ ९० टक्के लोकांनी जोडधंदे करण्याची इच्छा दर्शविली. त्यांनी आम्हाला त्याबाबत मदत मिळाल्यास जोडधंदे करून उत्पन्न वाढविण्याची इच्छा प्रदर्शित केली.

इ) मनोरंजन :
या गावात मनोरंजन समस्या मोठ्या प्रमाणात दिसून आली. केव्हातरी गावात विशेष प्रसंगी, फिरते चित्रपट दाखविण्यात येतात. शालेयस्तरावर मनोरंजनासाठी नाटके, करमणुकीचे कार्यक्रम केले जातात. तसेच भजने, सार्वजनिक उत्सव इ० मनोरंजन साधने उपलब्ध होतात. परंतु ही साधने कायम स्वरुपाची नसतात. तात्पुरती अशी विशिष्ट परिस्थितीनुसार, कालखंडानुसार मनोरंजन साधने उपलब्ध होतात.

फ) कर्जपुरवठ्याचा अभाव :
येथील काही लोकांना एकवेळ जेवण मिळत नाही. अशी हालाखीची परिस्थिती असताना कर्ज घेऊन स्वतःचा विकास करण्याची प्रवृत्ती नाही. गावात एक सहकारी सोसायटी असूनही काहींना ते माहीत सुद्धा नव्हते. याचे कारण म्हणजे अज्ञान, निरक्षरता. येथे बँकेमार्फत कर्ज घेण्याचे प्रमाणही कमी आढळले. कारण अज्ञान निरक्षरतेमुळे सार्वजनिक कामाची त्यांना भिती वाटते.

ग) खारजमीन :
मिठबाव गावातील कुटुंबाच्या मालकीची जमीन अल्प, आणि त्यात खारजमीन ही एक समस्या असल्याने जमीन पडीक राहून उत्पन्न कमी मिळते.

## ३) विकासासाठी सूचना :

अ) सरकारी योजना :
सरकारी योजनांचा म्हणावा तेवढा उपयोग मिठबाव गावातील लोकांना होत नाही. त्यादृष्टीने सरकारी अधिकाऱ्यांनी काही मनोरंजनाच्या साधनाद्वारे सरकारी योजनांचा प्रसार व प्रचार केल्यास त्या योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होऊ शकेल.

ब) शिक्षण :
उच्चशिक्षणाचे प्रमाण कमी. प्रौढ शिक्षणाचे प्रमाणही कमी असल्याने प्रौढ साक्षरतेचे वर्ग सुरू करणे आवश्यक आहे. यामुळे प्रौढांना शिक्षणाचे महत्त्व कळेल. परिणामी येथील लोक मुलांना उच्च शिक्षणासाठी प्रवृत्त करू शकतील. शिक्षणामुळे खोलवर विचार करण्याची प्रवृत्ती वाढीस लागेल व शेतीवर पडणारा अतिरीक्त ताण कमी होईल.

क) पाणीपुरवठा व आधुनिक तंत्राचा वापर :
शेतीउत्पन्न वाढविण्यासाठी मुबलक पाणीपुरवठ्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी विहिरी, पंप, नळ योजनाद्वारे येथील लोक दुबार पीक घेऊ शकतील. यासाठी त्यांना सरकारी योजनेमार्फत कर्ज देणे आवश्यक आहे.

तसेच आधुनिक बी-बियाणे, सुधारीत खते, सुधारीत अवजारे, लोकांना अल्प किमतीत किंवा ग्रामपंचायतीतर्फे अनुदानाच्या स्वरुपात द्यावीत.

ड) जोडधंद्याची आवश्यकता :

येथिल लोकांना जोडधंद्याची माहिती व कर्ज देणे आवश्यक आहे. स्त्रियांना सरकारी योजनेमार्फत शिलाई मशीन दिले पाहिजे. बँकेमार्फत, सहकारी सोसायटीमार्फत येथील लोकांना कर्ज देऊन जोडधंद्यास प्रवृत्त केले पाहिजे.

इ) मनोरंजन :

मनोरंजनाच्या बाबतीत मिठबाव गावातील लोकांना कोणतीच साधने उपलब्ध नाहीत. जीवनातील नेहमीच्या कटकटीपासून काही काल तरी दूर जाण्यासाठी मनोरंजनाच्या साधनांची आवश्यकता असते. मिठबाव गावात एखादी बाग करता येईल तसेच ह्या भागात चित्रपटगृहे, नाटचगृहे असावीत यासाठी लोकांना सरकारी माहिती दिली पाहिजे.

फ) खारजमीन :

येथील जमीन खार जमिनीमुळे पडीक राहिली आहे. सरकारने खार जमीन प्रकल्पामार्फत ही जमीन शेती योग्य केली पाहिजे. त्यासाठी ग्रामपंचायतीने प्रयत्न केले पाहिजेत. पडीक जमिनीचा वापर करण्यासाठी पाण्याच्या सोयी, बंधारे, कालवे तयार केले पाहिजेत. यामुळे उन्हाळी उत्पादन करून उत्पन्न वाढविणे शक्य होईल.

ग) सारांश :

एकंदरीत या गावची सर्वसाधारण माहिती मिळाल्यानंतर असे आढळुन येते की गावचा विकास करणे हे तेथील लोकांवर अवलंबून असते. मात्र सुशिक्षित मनाची आवश्यकता, गावाच्या विकासाची कळकळ या दोन गोष्टी असल्यास आजच्या काळात गावच्या विकासाच्या बाबतीत अडथळे येतील असे वाटत नाही.



रसराज वार्षिकास हार्दिक शुभेच्छा !

शुभकार्यासाठी स्पीकर भाडयाने मिळेल


संपर्क

प्रभाकर साऊंड सर्व्हिस, नाडण

प्रोप्रा– प्र. गो. नारकर



सत्काराला उत्तर देताना
**प्राचार्य डॉ. अ. ना. जोशी**
**श्री. शां. कृ. पंतवालावलकर**
अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना
पीएच्. डी. मिळाल्याबद्दल सत्कार.




स्नेहसंमेलन प्रमुख पाहुणे
**डॉ. म. दा. नलावडे**
पारितोषिक वितरण करताना.





विद्यार्थिनी वसतिगृहाचा भूमिपूजन
समारंभ सिंधुदुर्ग जिल्हा परिषद
चीफ ऑफीसर
**श्री. कुलकर्णी साहेब**

## स्नेहसंमेलन क्षणचित्रें



नाटक :
लेकुरे उदंड झाली...
←





एकांकिका :
कुणी गोविंद घ्या...
←

# धकल्याची चाय

**राजेंद्र हिंदळेकर**
तृतीय वर्ष कला

**पात्रपरिचय :**

१) धकल्या : रामरावांचा धाकटा मुलगा.
२) थोरल्या : रामरावांचा थोरला मुलगा.
३) रामराव : धकल्या, थोरल्याचे वडील.
४) सोमा : एक सुशिक्षित तरुण.
५) परब्या : रामरावांचा समवयस्क शेजारी.
६) गणोबा : गावचा सरपंच.
७) शामभट : त्या गावातील ब्राह्मण
८) किष्णा : दारु पाडणारा एक माणूस.
९) यशवंत : देवस्की करणारा माणूस.
१०) इन्स्पेक्टर : ... ... ... ...
११) रावड्या : गणोबाचा साथीदार.

**प्रवेश १ ला :**

( एका खेडेगावातील शेतकऱ्याचे घर पडदा उघडतो त्यावेळी थोरल्या स्टेजवर रेडिओ ऐकत आहे. गाणे संपते. गाणे मालवणी डिस्को आहे. )

थोरल्या : आवशीक खाव, मालवणीत सुद्धा डिस्के इलो. ओ काय इचारु नुको. काय डिस्को करती, नी काय करती ! ( कागदांकडे लक्ष जाते ) ह्या काय ? धकल्याचा प्रेमपत्र न्हय ना ! नाय म्हंजे प्रेमा हाली वाढत चालली हत म्हणून म्हनतंय ! (एकेक अक्षर लावून वाचतो)

धकल्या : (प्रवेशून) काय रे थोरल्या, वाचतं हं काय ?

थोरल्या : काय नाय रे, ह्या कागदावर बघ काय लिवलला असा तां !

धकल्या : मेल्या, जिनसांची यादी ती ( टाकून देतो ) मरांदे ती ! बाबा खय गेले रे ?

थोरल्या : माका म्हायती हां. मियां तुझ्याआदी वायच इलंय ! पन हे रोज ख्येका जातत रे ?

धकल्या : आता माका काय म्हायत ? तुझा नी तेंचा काय लय जुळता ! सारखे ह्येच्यामारी नी तेच्यामारी करीत असतास !

थोरल्या : तेचा लय मोठा गुपीत हां ! तुका नाय समजाचां !

धकल्या : सांग रे काय ता ?

थोरल्या : मी नाय सांगणार.

धकल्या : सांग नायतं बघ !

थोरल्या : असले लय बघले. दादागिरी दाखवतं काय ?

धकल्या : बरां, बरां नुको सांगा, मगे माझवं काय आसला तर ताव तुका सांगाचय नाय !

थोरल्या : अरे तुझ्याकडे हाच काय सांगासारखा ?

धकल्या : आरे लय मोठा हां !

थोरल्या : मगे सांग बघू.

धकल्या : चल ! मी नाय सांगणार.

थोरल्या : सांग रे !

धकल्या : माझा मातं सांग आनी तुझा दडवून ठेव. तुझा जर पयला सांगत असशीलना तर मगे मी सांगान.

थोरल्या : नक्की रे ?

धकल्या : अरे नक्की म्हंजे काय !

थोरल्या : आयच्यान ;

धकल्या : आयच्यान !

थोरल्या : मगे असो जवळ ये ! अरे किष्णन हाली पाडूक सुरुवात केल्यान ना ! थयं हे ऽ...

रामराव : (रामराव दारु पिऊन प्रवेशतो) अरे ह्येच्या मारी ! आवशीक खांव ! दोगवले भाव इतक्या जवळ कशे ? (चालायला होत नाही) छयाँ ! लागलो, दमो लागलो, चलवतच नाय. (बाकावर बसतो)

थोरल्या : काय ओ बाबानु, दुपारचे सकाळचे सोयन येतासनी जातास आनी सांजेर सो तुमका दमो लागता ?

रामराव : केल्यान सुरू केल्यान, काय मेल्याचो प्रश्न काय ?

थोरल्या : धकल्या, कोन रे तो लंहानपनी व्हावल्या पानयात बसान प्रश्न इचारी तो ?

धकल्या : कोन ?

थोरल्या : बघ मगे शास्त्रज्ञ झालो तो काय ! पानी पाटीपुढे होताना बघल्यान नी कसली तरी चक्की सौधल्यान बघ ?

धकल्या : हं, ऽ हां. ऽ ऽ मेल्या, तेनी व्हावल्या पानयाचे प्रश्न इचारल्यान म्हणून तो शास्त्रज्ञ झालो तुझ्यासारखी गुळाच्या पानयाची नाय चौकशी करी !

रामराव : काय रे काय ? गुळाचा पानी ? कसला ? मेल्यानु तुमका आनी ह्या कोनी सांगल्यान ? धकल्या, बडबड लय केलस ! आता पुरे कर पुरान, वायंच चायचा पानी कर जा बघू.

धकल्या : ओ पन चायचा पानी करूक चाय खंय हां ?

रामराव : हां ! तुका आनी ह्या समजाचा नाय ! तरी मेल्या चारदा बसान द्यावी पास झालहस ! नाय तं काय इचारूक व्हया होतां ?

थोरल्या : ओ पाचदो बसलो तो !

रामराव : ता मरांदे ! पन मी काय म्हतलय ता तुका समाजला !

थोरल्या : व्हय तं माका समजाचा नाय असा होयंत काय ? मी आता हानतंय (आत जावून) पण चाय खयं हां ओ !

धकल्या : अवो बघलास चाय आसल्याशिवाय तेचा पानी तो तरी कसा करीत ?

रामराव : अरे, चाय करा चाय ! राधे खयं गेला ?

थोरल्या : आम्ही इलांव त्यापासून आये नाय हां !

धकल्या : तुमका चाय होयी हां की काय ? मगासपासून असा आमका सांगायचा नाय !

थोरल्या : अरे बाबा, ह्येका चाय व्हयी हां ! आता हानतय, पन टोपात नाय हां शी वाटतां !

रामराव : अरे नाय हां तर करूक होयी ! छयाँ, बोलताना पन तरास होता. (खोकला येतो) धकल्या माझी करटी खय टाकहलस ?

धकल्या : आमका शाळेत सांगल्यानी हां रोग्याची थुंकी खयतरी टाकू नये म्हनून—

रामराव : खालस कि काय गियॉन.

धकल्या : नाय नाय, ती झाकून ठेवलय कोंबडेच्या धुडाखाली हानुकी काय ?

रामराव : मेल्या ती ओतून टाक पाटचे बाजूक नी करटी हान. करटी टाकलस नी पानी साठला तर डास कवटा घालतील भुतूर.

धकल्या : ता वो तुमका कसा म्हायत ?

रामराव : मेल्या तूच सांगलस ना ! चल जा. (धकल्या करटी आणतो रामराव त्यात थुंकतो व घेवून जातो.)

थोरल्या : (चेष्टा करण्यासाठी) धकल्या, हां ! (खुणावत) आए इली की काय ?

रामराम : काय ? इला ? ह्योच्या मारी ! चटय वाल रे ! मी पडतय, नि इला रे इला की बरा नाया म्हनून सांगा. काय सांगशाल ? ताप इलो हां म्हनून सांगा.

थोरल्या: मी सांगान, बाबानु निग ते घेवन निजले आनी तुका सांगाक सांगल्यानी--

रामराव : काय ?

थोरल्या : आंथरून कांबरून.

रामराव : तु नुको सांगा. माझो धकलो सांगात सांगाचा काय ता !

धकल्या : हां ! मी सांगान ! तुमी निजा ! (रामराव घोंगडी अंथरुन चादर अंगावर घेवून झोपतो)

रामराव : नाय ना ! आजून खयं नायनां, तसा नाय येवचां ता ! मरां दे निजान नायतं ताप येयत ! (उठतो. पण चालायला होत नाही.) धकल्या ! मेल्या धर तरी. थोरल्या तुका सुद्धा ह्या सांगाक व्हया ! म्हाताऱ्या झालल्या बापसाक कसा सांभाळूक व्हया ह्या तुमका आता सांगाक नुको. मेल्यांका अक्कलच नाय ! लगीन करुन दिला आसतां तं येवा दोन दोन पोरोचे बापूस झाला आसतास !

धकल्या : बाबानु (वळवळंत, पोट दाबीत) नाय ओ नाय, मोडक्या आंल्याकडन येतय, ह्येका ! ( दोन बोटे दाखवत जातो )

थोरल्या : व्याळाक पानी इला आसान ते बघ, नायतं लोंडो बिडो येयत नि चड्डी व्हावान जायंत )

रामराव : अरे ह्येच्या मारी ! तु सुद्धा लय सुधारलय !

थोरल्या : मगेन सगळी दूनिया सुधारली, पन तुमी आपले गटारात ते गटारातच !

रामराव : काय ? मेल्या कोणाक काय म्हनतस ह्या ? तु आसतस तेवा काय गंगा असती रे ! मेल्या माका धरुन जो तुका हानुचो लागतां केवढी भाग्यवान बापूस हय मी !

थोरल्या : ता जांवदे ! पन. आज किती मारलास ?

रामराव : मेल्या, तो वरचो इज्यांचो सोमा इलोना आज !

थोरल्या काय सोमा इलो ! अवो कधी ? आना काय निसतो चालीवर उडवित आसात ! भापाबिशा बोलतां काय ओ ?

रामराव : अरे काय बघशी तेची इसकी, तोच म्हणाक लागले येतास तं चला ! मगे मीच तो ! गेल्याशिवाय न्हवान की काय ! इतक्यात येवचो पन, खय नाय सो वाटता !

थोरल्या : मी आदी बघून येतय हां कसलो झालो हां तो ! (बाहेर जावून आत येतो) बाबानु, बाबानु, सोमा हकडीचं येता हां !

रामराव : आवझवारी पीडाच हां ही ! (सोमा प्रवेशतो) इलस बाबा ! बस बस ! तेका कांबळा टाक रे !

सोमा : अरे मघाशी तुम्ही व्यवस्थित बोलत होता. आता काय झाले? आणि वास कसला येतोय !

रामराव : वायेच घेवची लागता रे संध्याकाळची ! त्याशिवाय चैनच पडत नाय ! पाच सा दिवस घितलय नाय काय पॉट फुगलाच म्हणून समज ! थोरल्याक म्हायती हां !

थोरल्या : होय होय ! नगारो होता नगारो !

सोमा : मग तुम्हाला आताच सावध व्हायला पाहिजे. कदाचित जठराचा अलसर असेल !

थोरल्या : माझ्या फुडयात तरी ही मोठेपना सांगा नुकी सोमा ! तूच दिलसं नारे तेंका !

सोमा : काय ? मी ? कोणी सांगीतले तुला ! ( रामराव रागाने थोरल्याकडे पहातो )

थोरल्या : ह्यच.

सोमा : अच्छा अच्छा ! म्हणजे मघाशी तुम्ही माझ्याकडून पैसे घेतलेत त्याचा असा वापर केलात तर ! जो माणूस दारुच्या पेल्यात अडकला तो काय करील ते सागता येत नाही

थोरल्या : अरे पन हे पेल्यान नाय घेयत गलासान घेतंत !

सोमा : अरे ग्लासाने घेतले काय आणि पेल्याने घेतले काय मद्य ते मद्यच. ते जाळीतच जाणार !

थोरलो : मद्य ! ह्या कसला आनी मद !

सोमा : थोरल्या, तुला काय वाटते, स्वतःला जास्त समजते ?

थोरल्या : नाय बाबा पन तुकारे ह्या कसा म्यायत ?

रामराम : अरे त्येच्या मुंबयक सगळा कळता ! आमच्या थोरल्याक एकदा पाठवूक होयो हां ! तेका ह्येचा कायता लयच !

सोमा : मुंबईला नुसतं राहिलं म्हणजे झालं नाही त्यासाठी मोठमोठ्या माणसांची भाषणं ऐकावी लागतात ! शिक्षण घ्यावं लागतं. मी मी सध्या मेडिकल कॉलेजला जातो. त्यामुळे मला हे सर्व समजते. अरे कित्येक लोकांची जीवने या दारूने नष्ट केली आहेत. आता इतकेच करा की या दारूला पुन्हा स्पर्श करू नका !

थोरल्या : म्हंजे, देनाऱ्याकच टाळचात ओतुक सांगा मगे झाला !

सोमा : थोरल्या, तु सुद्धा काय एकेक जोण करतोस रे ? हिच जर तुमची बुद्धी चांगल्या कामासाठी उपयोगात आणाल तर कितीतरी सुधारणा तुम्ही करू शकाल ! गावाची सुधारणा होणे आवश्यक आहे !

थोरल्या : सोमा ! अरे काय सांगतस तू ह्या ? अरे गटार न गटार सुधरात मुंबयचा. पन ह्या गाव काय सुधराचा नाय. लिवॉन ठेव लिवॉन !

सोमा : अरे गाव म्हणजे नक्की कोण ? तुम्हीच ना ! मग तुम्ही सुधारलात की गावाची सुधारणा झाली म्हणून समजा. स्वतःचं घर सुधारलं की घराघरानीच गाव होत असतं ना !

रामराव : थोरल्या, मी याक इचारतय तां सांग ! समज आम्ही दारू खावची बंद केली तर तेंचा काय होतेय रे ?

थोरल्या : कोनचा ?

रामराव : इकनारोचा ?

सोमा : त्यांचे मद्य विक्री व्हायचे बंद झाले की ते आपोआप दुसरा धंदा पहातील.

थोरल्या : गांजा इकतील !

सोमा : तो सुद्धा वाईट असतो. ते लोक शेती अगर तत्सम उद्योगात लक्ष घालतील व त्या क्षेत्राचा विकास करतील. पण जोपर्यंत तुम्ही लोक दारू प्यायची बंद करणार नाही तोपर्यंत गावाचा विकास होणार नाही. पुराणातील कथा माहित आहे ना दैत्यांचा नाश करण्यासाठी देवानी त्याना मद्य दिले होते. तसाच नाश तुमचा होईल यासाठी तुम्ही आजपासून सावध रहायला हवे !

थोरल्या : ती गोष्ट माका म्हायती हां पर्वत घालून घुसळल्यानी तो काय ! कमाल नाय रे एवढी मोठी पर्वत सापाक बांधून घुसळूचो म्हंजे ! त्यावेळाचे देवच काय येगळे.

सोमा : अरे आपण नुसतं आश्चर्य करून भागत नसतं त्यापासून आपण बोध घ्यावयास हवा! (धकल्या प्रवेशतो) काय कॉलेजकुमार, तू म्हणे दहावी पास झालास.

धकल्या : हो ऽ ऽ हो

थोरल्या : पाचदा बसान !

सोमा : अरे काही का असेना ! गाव सुधारण्यासाठी सर्वांना शिक्षणाची गरज आहे. शिक शिक तू ! इथे किती वर्ग आहेत ?

धकल्या : ज्युनिअर कॉलेजच हां ह्या !

सोमा : अरे त्यानाने खूप सुधारणा झाली आपल्या गावात. कॉलेज आले आपण त्याचा लाभ घ्यावयास हवा ! बरे आता तुम्ही सगळे भेटलात काकू कुठे गेली ? कुठेतरी गेलीशी वाटते. काकू ऽ ऽ ए काकू

धकल्या : तू सांग

थोरल्या : मी नाय तूच सांग.

धकल्या : सांग रे ! ! मोठो हस !

थोरल्या : ती मायेशक गेली आसा !

सोमा : अरे मग थांबून उपयोगच नाही. चहा सुद्धा कोण धर म्हणणार नाही ! येतो मी ! येईन मग सावकाश. दारूबंदीचा प्रचार करावयास हवा ! दोन चार पोराना घेवून येतो ! (जातो.)

रामराव : (खवळून) अरे मेल्यानु मगासपासून निसतो बोंबालतहय... राधे खयं गेला ?... राधे खयं गेला ? पन साले बोलतील तं हराम मगाशी माका 'ता' इला म्हनून कोनी सांगलल्यान रे ? थोरल्या कोनी सांगल्यान ?

थोरल्या : मी नाय...त.. (एकमेकांची नावे सांगतात)

धकल्या : मी ?... छयाँ ..

धकल्या थोरल्या : आमी सागललावच नाय...!

रामराव : माझी काठी खयं हां ती ?

धकल्या : ती काय थय हां !

थोरल्या : मी हाजू

रामराव : खरा सांगा कोणी सांगतल्यान ?

थोरलो : मी

धकल्या थोरल्या : आमीच सांगललाव !

रामराव : (दोघांच्या खांद्यावर हात ठेवून) माझे दोघवले झील लय चांगले हत देवा अशीच बुद्धी न्हवोदे रे होची !

धकल्या : एका अटीवर !

रामराव : खयच्या ?

धकल्या : तुम्ही दारू सोडायची दारूमुळ मान न्हवत नाय ! आरोग्य चांगला न्हवत नाय ! काय दारू करीत ता सांगता येत नाय ! थोरल्या तू पन दारू सोडूक व्हयी !

थोरली : (रडव्या स्वरात) चला बाबा सोडली !

रामराव : सोडली ?

थोरलो : तं प्रकार काय होतत ते बघतास !

रामराव : मगे सोमा सांगता खरां तर दारू सोडूक व्हयी आपन पण दारू सोडली,

सोमा : (प्रवेशतो दारुचे गॅलन तिरडीवर ठेवून चारपाच पोराना घेऊन येतो. )

दारुबंदी करूया चला गड्यानो !
दारुबंदी करुया चला !
आला आला रे सोमा आला रे !
आला आला रे सोमा आला !
वरच्या विठ्याचो ह्यो रे नातू
आता झालो हा मोठो नेतो
हयेचा साला बिला हवला मुंबयला ॥ धृ ॥

गावाची व्हतली सुधारना ।
पोटा पानयाचे रे गुजारना ।
कोन दिसाचा नाय गावात बाटलीवाला ॥ धृ ॥

या आमच्या गावाची स्थिती ।
किती गटारातल्यानी पडती ।
चांगला दिसत नाय कोन संसारवाला ॥ धृ ॥

दारुमुळे न्हवतं नाय मानं ।
ढापून थेवचे लागतत कानं ।
म्हनून सांगता ह्यो थोरलो सगळ्या गावाला ॥धृ॥

सोमा : दारुबंदी झालीच पाहिजे ! दारुबंदी झालीच पाहिजे !!

॥ अंधार ॥

**प्रवेश २ रा :**

(सकाळची वेळ, स्टेजवर हळुहळू प्रकाश आल्यांची --- हळदीकुंकू लावलेली पाने, एक नारळ, निरांजन, तुळस किंवा झाडाचा पार यांची स्टेजवर धकल्या थोरल्या व रामराव मांडणी करीत आहेत.)

रामराव : (मांडणी करून झाल्यावर) धकल्या, थोरल्या तुमी तवसर नमान म्हनून घेवा मी येतय थूतूरना लवकर आटपूक व्हया ! (जातो.)

थोरल्या : सुरु कर कायतां !

धकल्या : सीयन म्हन हां ! देवाचा काम हो. रुप पहाता लोचनी ... ... ...

थोरल्या : चला दारुच्या दुकानी !

धकल्या : काय मेल्या ह्या ? अरे सोयन म्हन ! तो हा विठ्ठल बरवा !

थोरल्या : किती घ्यायची ठरवा !

धकल्या : ओ मगे घेवा, मगे घेवा, आधी पाया पड ! बहुत सुकृताची जोडी

थोरल्या : आता ओता थोडी थोडी !

धकल्या : आता तुझ्या पायाखाली जीव देव काय ? मेल्या ह्या काय चलल्ला आनी तू काय बडबडतं ? सोयन म्हन ! सर्व सुखाचे आगर...

थोरल्या : अर्ध्या बाटलीने काय होणार ?

रामराव : (प्रवेशून) ए मायझयानू, काय चालवलास व्हयतां ? गावात दारुबंदी झाली नी ? मगे व्हयता कित्याक, जला गारान्याक उभे न्हवा!

थोरल्या : चला, चला ! सुरु करा !

रामराव : बा देवा म्हाराजा ! तू व्हयली ठिकानदार तुका पाच पाना ठेवलेली हत ! आज आठ दिवस आमी सगळी जना मोडयान शीक आसंव ! तरी तू म्हनशील दारु खावन भ्रष्टाचार झालो तर सोमा इलो तेच्या दूसऱ्या दिवसापासून आमी दारु सोडली व्हय नारे थोरल्या (हो म्हणतो) तर जी काय घरात रोगराई भरलेली आसा तेचो बंदोबस्त करुन तू घरच्याक सामील करुन घेवन कुलाचाराची समज घाल ! नी आसलसा वेडावाकडा सुष्टावो दिष्टावो पायाधाली घाल ! तेचो बंदोबस्त कर. भूतानखेतान मान वर काढल्यान आसली तर तेच्यामानेर पाय देवन लिंगडीच्या तीन पानार तेका उडव नी बरा ता कर रे बाबा ! (प्रत्येक वाक्यामागे धकल्या आणि थोरल्या होय म्हाराजा म्हनतात) धकल्या नारळ फिरव ! (धकल्या नारळ फिरवून ठेवतो.) बा देवा महाराजा ! तू हयलो तुळशीकडचो ! तुका ह्यो नारळ ठेवलेलो आसा ! ही पाच पाना ठेवलेली आसतं !

धकल्या : पन हालवतय नाय हय !

रामराव : काय ?

धकल्या : पाना, पाना !

रामराव : मेल्या नारळ हालवलस नी पाना कोन हालवील तुझो काका ?

थोरल्या : मी हालवू !

रामराव : हा हालव ! (थोरल्या पाने हालवून ठेवतो.) अरेरे ! झालो घोटाळो.

थोरल्या : काय झाल ?

रामराव : मेल्या पाना तू कशी हालवलं ?

थोरल्या : (दाखवून) अशी ! कित्याक ?

रामराव : मेल्या नारळ तेनी हालवल्यान आनी पान तू कित्याक हलवल ?

थोरल्या : बरा ! आता नारळसुद्धा मी हालवतय मगे झाला (हालवून) बास्स ?

रामराव : काय म्हन धकल्या तू ! पन थोरल्याक थोडीशी हां हां ! ह्या कोनाक सूचला असता ? तुका तरी ?

धकल्या : नाय बाबा !

रामराव : हां ! तर बा देवा महाराजा ! तू तुळशीकडचो तुका पाच पाना आनी हालवून हालवून नारळ ठेवलेलो आसा ! तो पावन करून घी ! आजं आम्ही आठ दिवस मोडयान शीक आसश ! त्याचबरोबर माझी बायको राहो ! हिका मी दारुच्या नशेत मारलय ! तर ती रागाने मायेराक गेली आसा ! तिची तू खात्री पटवून दी ! आनी परत येवंदे असा कर ! ती इली तर तुका अख्खी... नाय नाय अर्धी... चूकला पावशेर पेढे नी अख्खो नारळ ठेवीन रे म्हाराजा !

थोरल्या : होय म्हाराजा माका जेवन करूक लागता रे म्हाराजा !

धकल्या : आनी मी पानी हानतय रे म्हाराजा ! (रामराळ नारळ फोडतो.) (सोमा प्रवेशतो आणि या सर्व हेरबाळ्याकडे तो पहात रहातो)

सोमा : धकल्या मेल्या ह्या काय ? ( सगळे त्याच्याकडे बघत रहातात त्याचा वेश व भाषा बदलली आहे) अरे ! अशे काय बघतास माझ्याकडे ?

धकल्या : अरे तु भाषा बोलस ना !

सोमा : अरे आल्यापासून सारो गांव हिंडतय ! इथल्या लोकांशी बोलायच ना तां गावढळीतच बोलाक व्हया ! नाय तूं सगळे टेर उडवतत !

थोरल्या : ता जावंदे ! पण सोमा ते दिवसची बेलभोटम काय केलस रे ? इकलं वीकलं की काय ? (सगळे हसतात.)

सोमा : अरे मुंबईचे कपडे इथे गावात काय उपयोगी? अरे पण हे काय ?

रामराव : अं... अरे जो आपला जीवन चालवता तेची पूजा !

सोमा : अरे पण हे कशासाठी ?

रासराव : बाबा ! मागे इललस तो तेच्या नंतर दोन तीन दिवसापासून एक एक शीक पडत गेलाव ! काय तरी भष्टाकार सालो खरा !

सोमा : भष्टाकार ! आता पोटफुगी कशी आहे ?

रामराव : शाप बंद !

सोमा : मगे आता ताप बंद करुचो आसाल तं डाक्टराक गाठूक होयो. डागटरान विंजीक्शन दिल्यान की ताप बंद ! समाजला!

रामराव : मगे आता ह्या नुको करु म्हनंत ?

सोमा : करा ना ! पण प्रयत्न न करता नुसता ह्या करीत न्हवलास तर देव बरो करुचो नाय ! काय तरी उपाय करून जर देवाक हात जोडलास तर देव बरो करीत !

रामराव : मगे आता हेचा काय करू म्हनेतं ?

सोमा : हा सगळा संसार नदीत नेवून सोडा !

थोरल्या : पन आंगारना काढून तरी न्हेंवदे !

रामराव : आंगारना काढून काय दिष्टावो हा हुचो ! थोरल्या, ह्या सगळा पिशयेत घाल नी न्हयत घेवन जा ! नायतं व्हाळात टाकलस तरी चालात ! (थोरल्या पिशवीत ते सर्व भरतो व घेवून जातो.)

सोमा : ते नारळाला दोन चार रुपये घालण्यापेक्षा डॉक्टर जवळून औषध का नाही आणलत ?

रामराव : अरे निसत्या मोडयाक नाय नारळ ठेवलय, माझा राधे ऽऽ (रडण्या स्वरात)

सोमा : (दचकून) का ? काय झालं काय ?

रामराव : तसा काय झाला नायरे पन ता आजून इला नाय रे ! मी चूकलय पन ता येता कसां ?

सोमा : एवढच ना ! तिला पटलं, की तुम्ही दारू सोडलीत तर ती नक्की येईल.

रामराव : पन ता कळणार कसा ते का ?

सोमा : तसा आपोआप कळाक काय ती शंकराची पार्वती हा थोडीच तिला जावून समजावून सांगितले पाहिजे ! धकल्या तू एकदा जा आणि तिला घेवून ये ! समाजला ?

रामराव : मगे हय आता किती दिवस हस सोमा ?

सोमा : आणखी पंधरा दिवस रजा आहे माझी पण गरज लागली तर वाढवून घ्यावी लागेल !

रावराव : पन काय रे सोमा, तु इतको गावासाठी किल्याक तरास काढतं ? बाकीचे चाकरमानी येतत ते आरामशीर म्हयनोभर न्हवतत आंबे गरे खातत नी आपले इल्यासारखे परत जातत !

सोमा : अहो कोणीतरी काढणे आवश्यक आहे. आज मी एक चांगली योजना सर्वांना समजावून सांगितली आहे ! तुम्ही ही ती घ्या !

रामराव : खयची रे बाबा ऽऽ ... !

सोमा : असे अगदीच कसे हो तुम्ही ! काही नवीन कराव असे गावाच्या लोकाना वाटतच नाही. मी बहुतेकाना कुकुटपालनासाठी कर्ज उपलब्ध करून दिलच आहे. आता आमच्या गावातून अंडी नेण्यासाठी खास गाडी येईल. तशीच आपल्या सरकारने ग्रामपंचायतीमार्फत ही दूसरी योजना राबविण्याची ठरविली आहे, जास्त दूध देणाऱ्या गायी, म्हशी पाळणे, गायी दोन प्रकारच्या असतात. जर्सी, हेस्टींग धकल्या तुका ह्या समजात ! तुम्ही तुमच्या गोठ्यात गायी, म्हशी राखता तशा प्रकारे यांची जोपासना करायची नाही. माणसा पेक्षाही जास्त जोपासना यांची करायची ! या गायी म्हशींना बंद गोठे असले पाहिजेत! ही योजना गावागावातून पोचली पाहिजे.

थोरल्या : ( प्रवेशून ) इलय पोचवून इलय !

धकल्या : काय ?

थोरल्या : दिललांस तां !

सोमा : बरा केलस ! लय बस ये ! धकल्या तू शिकलल्लो पोरगो हस तेवा तू माझ्या सोबतीक येवक होया ! तुझा कॉलेज सकाळचा आसता ना ! मगे संध्याकाळचो तू रिकामोच आसतलं ! बरा, माका आता काम आसा ! बाळाजवळ जावचा हां ! तेना मातं मी सांगलय ता पटवून घितल्यान हां ! मगे येतय मी ( जातो. )

थोरल्या : असो काय रे तो, मदीच उठान चलत न्हवता?

धकल्या : अरे मुंबयची डिस्को फॅशन हाती !

रामराव : पन काय रे ? ह्यो सोमा गावात सबंध दिवस फिरत आमता ! तेका काय फायदो रे?

थोरल्या : काय तरी आसात त ! उगीच फिरता काय तो दिवसभर ?

धकल्या : तुका मेल्या फायद्याशिवाय काय दिसता हां ? नायतर आमचो गणोबा बघ ! मेलो एकदा ग्रामपंचायतीचा मतदान झाला तेवा दिसलल्लो! तेका निवडून दिलास काय उपयोग हा काय तेवी ? त्या वासुन सात-बाराचो उतारो मागल्यान तं तलाठ्याच्या आदी ह्येका १० रुपये देवचे लागले !

थोरल्या : ह्या मातं खरा ही !

रामराव : पन सोमा इतक्या गावासाठी करता हा की नाय तेका निवडून देवक हरकत नाय ! तो उभो न्हवलो तर पडाचो मातं नाय हां !

धकल्या : पन तो उभो न्हवलो तर माका इचारा ?

थोरल्या : तो आपलो उभो न्हवांदे नुको ? पन गावात दारु खावन होनाऱ्यो मारामाऱ्यो नी झेंगटा थांबलो कि नाय ?

रामराव : किष्णान हाली पाटूची बंद केल्यानं काय रे थोरल्या !

थोरल्या : मी हाली गलहय खयं ?

धकल्या : तुमीच पाटी न्हवलास ! तेनी पानाची गादी टाकल्यान झाले आठ दिवस ! पन खटपट मातं सोमानं केल्यान ? नेका बँकेतनां पैसे घेवन दिल्यान.

थोरल्या : अरे काय म्हनतस काय ?

धकल्या : तं ! उगीच नाय सोमा गावासाठी इतक्या करता हां ! ह्या गण्यानं आपल्या आयुष्यात

केल्यान नसात ! आनी त्या साधून माशांचो धंदो सुरु केल्यान ! बंदरासून माशे हानता नी हय इकता ! अरे पाचसा रुपयान बास्कीट हानतां नी वीस पंचवीस रुपये करता तेचे ! आता कोनच प्वार तेच्या पाठी लगात इतके दिवस तेचा लगीन नाय होयत व्हता ना मगे आता बघा ! पाठी लागतील, काय समजलास काय सोमा म्हंजे ? तो जर हय आसतो तं सगळा गाव सुधरल्यान असतां !

रामराव : होवंदे ! होवंदे ! कोनतरी असो होवकच होयो !

थोरल्या : बरां ! ता जावंदे ! आदी जवनाचा कायता बघा दोंपार झाली.

रामराव : जेवान झाला हां ?

थोरल्या : तं ! केवाच झाला हां जेवान !

धकल्या : मगे चला तं ! आज कुळदाची पीठी हां ! तोंडाक चव येतली !

रामराव : पन माझा राधे जवान करी नां तसला माले तुमका जमाचा नाय !

धकल्या : अहो ! शेवट बायकांचीच जात ती जेवान चांगला करनारच ! खानाऱ्यांच्या तोंडाक निसता पानी सुटाक व्हया !

थोरल्या : धकल्या वाढ जा तू ! (धकल्या जातो) हे वनयेस कधी संपणार आमचे ! तरी ते दिवस तुमका मी सांगत हुतय थोडीच घेवा म्हनून ! पन आमचा कोन आयक्ता ? नाय वत आनखी वत आनखी ! करून खालास आणि घराकडे येवन आयेक मारलास ! कारण नसतांना ! आनी दागीने काढून घीतलस !

रामराव : पण तू माका आडवायचा नाय !

थोरल्या : मी कसो आडवनार ? ते येळेक मी पन फुल हुतय ! माझी पन टाकी टायर !

धकल्या (आतून) चला ! जेवान वाढून झाला हां !

रामराव : चल बाबा !

थोरल्या : चला ! ( जातात )

॥ अंधार ॥

## प्रवेश ३ रा

(स्टेजवर हळुहळू प्रकाश, सकाळची वेळ, धकल्या स्टेजवर दात घासत आहे, स्टेजवर धकल्या एकटाच आहे. मधून मधून बाहेरून थुंकून येतो.)

रामराव : (संडासचे टंब्रेल घेऊन बाहेरून प्रवेशतात) टंब्रेल खय भूतूर हानतय ! असा इसराक होता ! ( बाहेर जावून) धकल्या तांबयोभर पानी हान पाय धुवाक......मेल्यानु करतास वाय भूतूर ? काय लकनी येता हा डोळचार ? मेल्याच्या डोळचावरची नीज जायतरं नां ? (धकल्या आत जावून तांब्या रामरावाला देतो, टेबलावर बसतो.)

थोरल्या : (आतून) धकल्याऽऽ! परत जावन निजलस की काय ? कालजात नाय जावंचा हां ? न्हावन घी चल (धकल्या आत जातो.)

रामराव : (बाहेरून रिकामा तांब्या घेऊन प्रवेशतो.) ओम नमो शिवाय ऽ ऽ ! (फोटोस नमस्कार करतो.) अरे धकलो न्हालो किनाय ? लेका पानी तापवून दिलं ?

धकल्या : (आतून) न्हातहय !

रामराव : न्हातहय......! मेल्याच्या डोळचावरची नीज जायतरनां ! कुंभकर्णी सारखी एकेकाची झोप असता ! काय झोपतात नी कशे झोपतात ते तेंचा तेंकाच म्हायत ! (धकल्या आतून कपडे करून यतो. नमस्कार करतो.)

धकल्या । (कोटातले पैसे काढीत) आज उशीरच झालो उटाक ! बाबानु जातय ओ, (जातो.)

रामराव : जा ! सोयन अभ्यास काय तो कर ! ह्या तुझ्यासाठी चलल्ल ! हा सगळचा ! त्या यशवंताचो तुझ्याबरोबरचो झील कामाक पन लागलो. तरी पन आमचो बाबू आजून शिकतां हां !

थोरल्या : (दारातून) अहो ह्या सांगताहास कोनाक ? तो गेलो जावक !

रामराव : तो गेलो ना तो जावंदे ! थोरल्या तू न्हालं?

रामराव : हां ! मग तेनी बरोबर काय तां सांगल्यान आसता की नाय !

थोरल्या : पन मी म्हनतय तुझा नी गन्याचा इतक्या चांगला होता त तू नाय जावन तेका सोयन सांगायचा ?

परबो : मी कसो सांगा ? माझा नि तेचा दिनसला ते दिवस ! तुका म्हांयतं नाय !

बामराव : अरे झाला काय ?

परबो : तेचा म्हनना कि मी सोमाक तार करून बोलावलय ! तेच्या वरसून तेचा नि माझा भांडान झाला- मी नाय म्हनून सांगतय तरी आपलो ह्यो होयच म्हनतां ! माका मारूक सुधा इलो ना ! ह्यो सोमा इलो नी सगळ्या गावाचो हिसगड घातल्यान म्हनून मी सांगतय तो ह्यासाठी तुमी धकल्याक तेच्या बरोबर पाठवू नुको. मी आपलो तुमच्या जवळचो म्हनून मी तुमका सांगाक इलय ! सोमाच काय झाला ता म्हायती हां ना तुमका ! टकलेर वार बघलास किती झालल ते ! आपलो तसलोच म्हनून वाचलो !

रामराव : म्हनजे ते वार गन्यान केल्यान की काय ?

परबो : गन्यान म्हंजे तेच्या साथीदारानी ! मारुचो बेत हुतो तेंचो !

थोरल्या : पन ह्या तु आज आमका सांगतल्स ? तेवा पोलीस इचारीत सारखे कोनी मारल्यान ? कोनी मारल्यान ? पन तेवा नाय कोनाचा त्वांड उघडला ?

परबो : अरे पन कोन कसो सागात ? तो जितो न्हवलो आसतो मगे ?

थोरल्या : जर त्या टायमाक माका ह्या म्हायती आसता तर मी सगळा सांगलं आसतय तेंका !

रामराव : अरे पन हाली रामा आसता खंय ?

परबो : आसता आपलो खुळ्यासारखो फिरत ! कोनचा तरी काम गावला तर करता नी इड्यो फुकत आसता !

रामराम : काय बिचाऱ्याची अवस्था केल्यानी, तेका मानसातना उठवल्यानी तेका उठवलांस पन देव तुमका मानसातना उठवल्याशिवाय न्हवाची नाय ?

थोरल्या : काय होवचा नाय तेंचा ! अवो चांगल्याच्याच पाठी देव हात धूवान लागणार !

रामराव : कायव म्हन थोरल्या पन जगांत देव आसा हो ! केवातरी तो आपला करतुत दाखवल्याशिवाय न्हवाचो नाय ! ह्या साल्याका लोळवून लोळवून मारीत ना तेवाच ह्येंचे डोळे उघडतले.

थोरल्या : म्हंजे मेल्यावर पुन्ना डोळे उघाडतले कि काय?

परबो : काकानू तुमी काय जरी म्हतलास तरी हयेंचा काय होवचा नाय. हे अशेच व्हनार !

थोरल्या : व्हयता सांगलास ना ता माका पटला ! अरे देवाक जर डोळे आसते तर इतक्या करून गनी निवडान इलो आसतो !

परबो : निवडून काय देव देयत नाय ! तुमीच दिलास ना?

थोरल्या : कोनी ? आमी ? तु दिलं आसशी!

परबो : हां ! बरां मी दिलय ! तेवा मी तेच्या पार्टीत हूतय ना ! आतामातं तुमच्या पार्टीत हय ही !

रामराव : अरे पार्टीत कोनाच्याव असा पन मानूस बघुक नुको, तेची लायकी काय ती बघुक नुको ? आता ह्या बघीनास, सोमासारखो गावात एक चांगलो मानूस इलो, तेची काय लायकी केल्यान तेनी ? आतां आनी सभेत खेचनार हा ना तो ?

परबो : तेका खेचीत ती खेचीत पन तुमच्या धकल्याक आदी जपा ! कारण रजा संपली की सोमा जायत मुंबयक ! पन धाकल्याकं हय न्हवाचा आसा हयाच तुमका मी सांगाक

रामराव : हां ! तर बा देवा महाराजा ! तू तुळशीकडचो तुका पाच पाना आनी हालवून हालवून नारळ ठेवलेलो आसा ! तो पावन करून घी ! आज आम्ही आठ दिवस मोडचान शीक आसश ! त्याचबरोबर माझी बायको राहो ! हिका मी दारुच्या नशेत मारलय ! तर ती रागाने मायेराक गेली आसा ! तिची तू खात्री पटवून दी ! आनी परत येवंदे असा कर ! ती इली तर तुका अख्खी... नाय नाय अर्धी... चूकला पावशेर पेढे नी अख्खो नारळ ठेवीन रे म्हाराजा !

थोरल्या : होय म्हाराजा माका जेवन करूक लागता रे म्हाराजा !

धकल्या : आनी मी पानी हानतय रे म्हाराजा ! (रामराव नारळ फोडतो.) (सोमा प्रवेशतो आणि या सर्व हेरबाठ्याकडे तो पहात रहातो)

सोमा : धकल्या मेल्या ह्या काय ? ( सगळे त्याच्याकडे बघत रहातात त्याचा वेश व भाषा बदलली आहे) अरे ! अशे काय बघतास माझ्याकडे ?

धकल्या : अरे तु भाषा बोलस ना !

सोमा : अरे आल्यापासून सारो गांव हिंडतय ! इथल्या लोकांशी बोलायच ना तां गावढळीतच बोलाक व्हया ! नाय तूं सगळे टेर उडवतत !

थोरल्या : ता जावंदे ! पण सोमा ते दिवसची बेलभोटम काय केलस रे ? इकलं वीकलं की काय ? (सगळे हसतात.)

सोमा : अरे मुंबईचे कपडे इथे गावात काय उपयोगी? अरे पण हे काय ?

रामराव : अं... अरे जो आपला जीवन चालवता तेची पूजा !

सोमा : अरे पण हे कशासाठी ?

रामराव : बाबा ! मागे इललस तो तेच्या नंतर दोन तीन दिवसापासून एक एक शीक पडत गेलाव ! काय तरी भष्टाकार सालो खरा !

सोमा : भष्टाकार ! आता पोटफुगी कशी आहे ?

रामराव : शाप बंद !

सोमा : मगे आता ताप बंद करुचो आसाल तं डाक्टराक गाठूक होयो. डागटरान विजीक्शन दिल्यान की ताप बंद ! समाजला!

रामराव : मगे आता ह्या नुको करु म्हनंत ?

सोमा : करा ना ! पण प्रयत्न न करता नुसता ह्या करीत व्हवलास तर देव बरो करुचो नाय ! काय तरी उपाय करून जर देवाक हात जोडलास तर देव बरो करीत !

रामराव : मगे आता हेचा काय करू म्हनेतं ?

सोमा : हा सगळा संसार नदीत नेवून सोडा !

थोरल्या : पन आंगारना काढून तरी व्हेंवदे !

रामराव : आंगारना काढून काय दिष्टावो हा हयो ! थोरल्या, ह्या सगळा पिशयेत घाल नी व्हयत घेवन जा ! नायतं व्हाळात टाकलस तरी चालान ! (थोरल्या पिशवीत ते सर्व भरतो व घेवून जातो.)

सोमा : ते नारळाला दोन चार रुपये घालण्यापेक्षा डॉक्टर जवळून औषध का नाही आणलत ?

रामराव : अरे निसल्या मोडचाक नाय नारळ ठेवलय, माझा राधे ऽऽ (रडण्या स्वरात)

सोमा : (दचकून) का ? काय झालं काय ?

रामराव : तसा काय झाला नायरे पन ता आजून इला नाय रे ! मी चूकलय पन ता येता कसा ?

सोमा : एवढच ना ! तिला पटलं, की तुम्ही दारू सोडलीत तर ती नक्की येईल.

रामराव : पन ता कळणार कसा ते का ?

सोमा : तसा आपोआप कळाक काय ती शंकराची पार्वती हा थोडीच तिला जावून समजावून सांगितले पाहिजे ! धकल्या तू एकदा जा आणि तिला घेवून ये ! समाजला ?

रामराव : मगे हय आता किती दिवस हस सोमा ?

सोमा : आणखी पंधरा दिवस रजा आहे माझी पण गरज लागली तर वाढवून घ्यावी लागेल !

रावराव : पन काय रे सोमा, तु इतको गावासाठी किस्याक तरास काढतं ? बाकीचे चाकरमानी येतत ते आरामशीर म्हयनोभर न्हवतत आंबे गरे खातत नी आपले इल्यासारखे परत जातत !

सोमा : अहो कोणीतरी काढणे आवश्यक आहे. आज मी एक चांगली योजना सर्वांना समजावून सांगितली आहे ! तुम्ही ही ती घ्या !

रामराव : खयची रे बाबा ऽ ऽ ... !

सोमा : असे अगदीच कसे हो तुम्ही ! काही नवीन कराव असे गावाच्या लोकाना वाटतच नाही. मी बहुतेकाना कुकुटपालनासाठी कर्ज उपलब्ध करून दिलच आहे. आता आमच्या गावातून अंडी नेण्यासाठी खास गाडी येईल. तशीच आपल्या सरकारने ग्रामपंचायतीमार्फत ही दूसरी योजना राबविण्याची ठरविली आहे, जास्त दूध देणाऱ्या गायी, म्हशी पाळणे, गायी दोन प्कारच्या असतात. जर्सी, हेस्टींग धकल्या तुका ह्या समजात ! तुम्ही तुमच्या गोठ्यात गायी, म्हशी राखता तशा प्रकारे यांची जोपासना करायची नाही. माणसा पेक्षाही जास्त जोपासना यांची करायची ! या गायी म्हशींना बंद गोठे असले पाहिजेत! ही योजना गावागावातून पोचली पाहिजे.

थोरल्या : ( प्रवेशून ) इलय पोचवून इलय !

धकल्या : काय ?

थोरल्या : दिललांस तां !

सोमा : बरा केलस ! लय बस ये ! धकल्या तू शिकलली पोरगो हस तेवा तू माझ्या सोबतीक येवक होया ! तुझा कॉलेज सकाळचा आसता ना ! मगे संध्याकाळचो तू रिकामोच आसतलं ! बरा, माका आता काम आसा ! बाळाजवळ जावचा हां ! तेना मातं मी सांगलय ता पटवून घितल्यान हां ! मगे येतय मी ( जातो. )

थोरल्या : असो काय रे तो, मदीच उठान चलत न्हवता?

धकल्या : अरे मुंबयची डिस्को फॅशन हाती !

रामराव : पन काय रे ? ह्यो सोमा गावात सबंध दिवस फिरत आमता ! तेका काय फायदो रे?

थोरल्या : काय तरी आसात त ! उगीच फिरता काय तो दिवसभर ?

धकल्या : तुका मेल्या फायद्याशिवाय काय दिसता हां ? नायतर आमचो गणोबा बघ ! मेलो एकदा ग्रामपंचायतीचा मतदान झाला तेवा दिसललो! तेका निवडून दिलास काय उपयोग हा काय तेवी ? त्या वासून सात-बाराचो उतारो मागल्यान तं तलाठ्याच्या आदी हयेका १० रुपये देवचे लागले !

थोरल्या : ह्या मातं खरा ही !

रामराव : पन सोमा इतक्या गावासाठी करता हा की नाय तेका निवडून देवक हरकत नाय ! तो उभो न्हवलो तर पडाचो मातं नाय हां !

धकल्या : पन तो उभो न्हवलो तर माका इचारा ?

थोरल्या : तो आपलो उभो न्हवांदे नुको ? पन गावात दारु खावन होनाऱ्यो मारामाऱ्यो नी झेंगटा थांबलो कि नाय ?

रामराव : किण्णान हाली पाडूची बंद केल्यानं काय रे थोरल्या !

थोरल्या : मी हाली गलहय खयं ?

धकल्या : तुमीच पाटी न्हवलास ! तेनी पानाची गादी टाकल्यान झाले आठ दिवस ! पन खटपट मातं सोमानं केल्यान ? तेका बँकेतनां पैसे घेवन दिल्यान.

थोरल्या : अरे काय म्हनतस काय ?

धकल्या : तं ! उगीच नाय सोमा गावासाठी इतक्या करता हां ! ह्या गण्यानं आपल्या आयुष्यात

केल्यान नसात ! आनी त्या साधून माशांचो धंदो सुरु केल्यान ! बंदरासून माशे हानता नी हय इकता ! अरे पाचसा रुपयान बास्कीट हानतां नी वीस पंचवीस रुपये करता तेचे ! आता कोनच प्वार तेच्या पाठी लगात इतके दिवस तेचा लगीन नाय होयत व्हता ना मगे आता बघा ! पाठी लागतील, काय समजलास काय सोमा म्हंजे ? तो जर हय आसतो तं सगळा गाव सुधरल्यान असतां !

रामराव : होवंदे ! होवंदे ! कोनतरी असो होवकच होयो !

थोरल्या : बरां ! ता जावंदे ! आदी जवनाचा कायता बघा दोंपार झाली.

रामराव : जेवान झाला हां ?

थोरल्या : तं ! केवाच झाला हां जेवान !

धकल्या : मगे चला तं ! आज कुळदाची पीठी हां ! तोंडाक चव येतली !

रामराव : पन माझा राधे जवान करी नां तसला माले तुमका जमाचा नाय !

धकल्या : अहो ! शेवट बायकांचीच जात ती जेवान चांगला करनारच ! खानाऱ्यांच्या तोंडाक निसता पानी सुटाक व्हया !

थोरल्या : धकल्या वाढ जा तू ! (धकल्या जातो) हे वनयेस कधी संपणार आमचे ! तरी ते दिवस तुमका मी सांगत हुतय थोडीच घेवा म्हनून ! पन आमचा कोन आयक्ता ? नाय वत आनखी वत आनखी ! करून खालास आणि घराकडे येवन आयेक मारलास ! कारण नसतांना ! आनी दागीने काढून घीतलस !

रामराव : पण तू माका आडवायचा नाय !

थोरल्या : मी कसो आडवनार ? ते येळेक मी पन फुल हुतय ! माझी पन टाकी टायर !

धकल्या (आतून) चला ! जेवान वाढून झाला हां !

रामराव : चल बाबा !

थोरल्या : चला ! ( जातात )

॥ अंधार ॥

**प्रवेश ३ रा**

(स्टेजवर हळुहळू प्रकाश, सकाळची वेळ, धकल्या स्टेजवर दात घासत आहे, स्टेजवर धकल्या एकटाच आहे. मधून मधून बाहेरून थुंकून येतो.)

रामराव : (संडासचे टंब्रेल घेऊन बाहेरून प्रवेशतात) टंब्रेल खय भूतूर हानतय ! असा इसराक होता ! ( बाहेर जावून) धकल्या तांबयोभर पानी हान पाय धुवाक......मेल्यानु करतास वाय भूतूर ? काय लकनी येता हा डोळ्यार ? मेल्याच्या डोळ्यावरची नीज जायतरं नां ? (धकल्या आत जावून तांब्या रामरावाला देतो, टेबलावर बसतो.)

थोरल्या : (आतून) धकल्याऽऽ! परत जावन निजलस की काय ? कालजात नाय जावंचा हां ? न्हावन घी चल (धकल्या आत जातो.)

रामराव : (बाहेरून रिकामा तांब्या घेऊन प्रवेशतो.) ओम नमो शिवाय ऽऽ ! (फोटोस नमस्कार करतो.) अरे धकलो न्हालो किनाय ? लेका पानी तापवून दिलं ?

धकल्या : (आतून) न्हातहय !

रामराव : न्हातहय......! मेल्याच्या डोळ्यावरची नीज जायतरनां ! कुंभकर्णी सारखी एकेकाची झोप असता ! काय झोपतात नी कशे झोपतात ते तेंचा तेंकाच म्हायत ! (धकल्या आतून कपडे करून यतो. नमस्कार करतो.)

धकल्या । (कोटातले पैसे काढीत) आज उशीरच झालो उटाक ! बाबानु जातय ओ, (जातो.)

रामराव : जा ! सोयन अभ्यास काय तो कर ! ह्या तुझ्यासाठी चलल्ल ! हा सगळचा ! त्या यशवंताचो तुझ्याबरोबरचो झील कामाक पन लागलो. तरी पन आमचो बाबू आजून शिकतां हां !

थोरल्या : (दारातून) अहो ह्या सांगताहास कोनाक ? तो गेलो जावक !

रामराव : तो गेलो ना तो जावंदे ! थोरल्या तू न्हालं?

थोरल्या : व्हंय !

रामराव : मग हकडे ये ! हय बस ! गावात दवंडी इली ! तुका म्हायती.

थोरल्या : कसली ?

रामराव : सोमान घोटाळो केल्यान !

थोरल्या : काय झाला काय ?

रामराव : गण्याचा चेडू शेवता ! त्येच्याबरोबर तैचा काय तरी हा म्हनतंत !

थोरल्या : ता माका म्हायती हां ! तेचा काय झाला !

रामराव : ता गण्याक कळला ! तो नीसतो आग नी पानी एकठच करता हा सारखो !

थोरल्या : ओ मी धकल्याक सांगललय ! पन धकलोच म्हनाक लागलो. सबंद जगातच चलला हां ह्यां !

रामराव : अरे जयात चलां दे पन ह्या गावाक ता मंजूर नाय ! गण्याक ह्या कळला ! तेच्यात गण्याचा नी सोमाचा वाकडा ! आता गनो काय करीत ता सांगता येवचा नाय ! अरे किती लोकांका तेनी आपल्या पायार लोळवल्यान हत ! म्हनून मी हयैका पयल्यापासून सांगत हूतय तेच्या भानगडीत पडा नूको ! पन आमचा कोन आयकता ? (ढोलाचा आवाज) आयक ! आयक ! थोरल्या......!

थोरल्या : होय ओ होय !

(दवंडी— आयका ओ आयका ! उद्या सकाळी शामराव सोनावडे हयैच्या घरात गावाची सभा होनार आसा, ती सभा सोमा सोनवडे ह्येच्याबाबत होनार आसा ! तरी गावातल्या सगळ्या लोकांनी ह्या सभेक हजर न्हवाचा आसा हो ऽऽऽ ... ... )

रामराव : आयकल थोरल्या ? ह्या असा हां ! कोन चांगला करूक पुढे गोलो की तेचे पाय धरून पाटी ओढनारी मानसां हत ही !

थोरल्या : जगाची नियमच झालो हा तो !

रामराव : पन ही सभा सोमाबावत घेतत ना मगे आमच्या घरात कित्याक ?

थोरल्या : अहो बरोबर ! आमचो धकलो आसता ना तेच्याबरोबर तरी सोमा इललो तेवा लेका सांगललय ! अरे गटारान गटार सुधारात मुंबयचा ! पन ह्या गाव सुधराचा नाय ! ह्या गावात मानसा न्हवतत पन मानुसकी नसलेली रानटी मानसा हत ही भूतां तरी बरी मेल्यांका किमत हां ! माय झये आमका शिकवतंत !

रामराव : पन मी म्हनतय ! सोमान तरी शेवत्याच्या भानगडीत कित्याक पडाक होया व्होता ? तेचो बापूस आपल्याबरोबर चांगलो नसतां ह्या ह्येका समजत नाय ?

थोरल्या : तो नाय तेच्या भानगडीत पडलो ! ताच पडला तेच्या भानगडीत तो पांदीतसून चललो कीं हयेनी घागरी उचलल्यान ! गो दुपारीच सां नाय येतय चटकन ! मगे बापयोच तो. तो काय गप बसात ! नाय म्हंजे तसा काय तेनी केल्यान नाय पन तेनी विचारल्यान आसात—

मुंबैला मुंबैला मुंबैला ।।धृ।।
पाटलांच्या तू शेवत्या गो ।
तुझ्यावर माझा प्रेम गो ।
आवशी बापाशीक घाबरा नुको ।
घेवन जायन तुका मी मुंबैला ।।धृ।
ठुमकत जाशील गो कालेजात ।
नाचत येशील गो बंगल्यात ।।
बापाशीकडना काय सुधा नुको ।
तूच चल माझ्या मुंबैला ।।
मुंबैला मुंबैला मुंबैला ।।धृ।।

नाय म्हंजे बाकी काय केल्यान नाय तेनी ! पन एकदा बावडेर बोलताना त्या मायझया रामग्याच्या बापसान बघल्यान ! तो नी गणो म्हंजे काय मीठ नी पानी तेच्या शिवाय ह्येका हगाक पन होयत नाय ! तेकाव एकदम जातेत. आनी मगे ह्या गण्याक कळला ! तो तं

लिसतो कारनच शोधीत हुतो ! तेका ह्या बराच गावलां ! सोमा सोमा चांगलोच कचाटयात गावलो (ताल धरतो) सोमा कचाटयात गाव ऽ ऽ ऽ

रामराव : गप, मेल्या परसंग काय नी तुका गाणी सुचतत मेल्या गनो सरपंच आसा ! आता तो काय करीत ता सांगता येवचा नाय ! खयच्या त्या संतान म्हतल्यान हा ना काय ? जेचो पैसो तेचो तमासो ! खयच्यान म्हतल्यान रे ता थोरल्या ?

थोरल्या : माका नक्की म्हायत नाय पन तुकारामान नायतर गोऱ्या कुंभारान आसतलां ! कारण तेंचो पैशाशी जास्ती सबंद हुतो !

रामराव : बरोबर ! कोणीतरी म्हतल्यान हा खरा ! पन ह्यो सरपंच काय करीत रे !

थोरल्या : काय करतलो करुन करुन !

रामराव : तू कायब म्हन थोरल्या पन ह्या काय खरा दिसत नाय ! तरी मी सांगतलय काय करशाल ता सोयन करा !

थोरल्या : पन आज जगात काय चलल्ला ? नी ह्या गावात काय चलल्ला ?

परबो : (प्रवेशून) गावात काय चलल्ला ? लाज नाय वाटत म्हनांक ! आज गावचो हिसगड तुमी घातलास ! धकलो खंय गेलो मायजयो पुढारी होता ना ?

थोरल्या : परब्या, त्वांड सांभाळून काय तां बोल !

परबो : आता सांभाळून बोलाचा काय न्हवला न.यहो! पन तुका मी सांगान ठेवतय, धकल्याक तू आवर तेका सोमाबरोबर पाठवू नको नायतं हेचे परिणाम बरे होवचे नाय !

थोरल्या : मग काय करतल काय ?

परबो : काय करनार ता बघशील मगे !

थोरल्या : आमी पन काय मेलेल्या आवशीचा दूध नाय खाला हां !

परबो : म्हनूनच मायेराक गेली हा ती !

रामराव : परब्या काय चालवलस ह्या काय ? कोनाक काय बोलतस तेचो इचार कर ! तू लोळत होतस तेवा चार दिवस बसान हुती ती तुझ्याजवळ! खाल्लल्या अन्नाची आठवण हा तुका ?

परबो : माका आठवनी सगळयो हत, पन गायींच्यो म्हशी झाल्यो की मग तेंच्या पाया पडत नाय कोन, समाजला !

थोरल्या : तुका काय म्हनाचा आसा काय ?

परबो : आज गावचो हिसगड तुमच्यामुळे झालो हां ?

थोरल्या : बरा ! आमच्यामुळे हिसगड झालो, बास्स ?

परबो : तुका वाटता तितक्या सोप्या नाय हां ह्या थोरल्या ! अरे मी मी म्हननाऱ्यांका गन्यान पायार लोळावल्यान हत, ह्या तुका म्हायती हां ? म्हनून तुका मी सोयन सांगाक इलय ! पन तु काय इचारतस ?

थोरल्या : पन तु सोयन सांगायचा नाय ?

परबो : आता तुझ्या लक्षात इला आसात, माका काय म्हनाचा हा ता ! अरे आपून सोयन वागाक व्हया ! बाकीचे मरनत तकडे.

थोरल्या : अरे पन सोमा इलो नी गाव किती सुधारल्यान ?

परबो , तां बरोबर रे ! पन मी म्हनतय आपून पोरींच्या भानगडीत कित्याक पडॉक होया ?

थोरल्या : तो नाय तेच्या भानगडीत पडलो. ताच पडला हयेच्या भानगडीत भुललो बिचारो !

परबो : पन ह्या गन्याक पटॉक नुको ? तो म्हनता माझा प्वार तसा नायलां ! हेनीच तेका भूलवल्यान !

थोरल्या : मग शेवट्याक नाय कित्या आदी इचारल्यान ह्येनी तेका भूलवल्यान की तेनी ह्येका भुलवल्यान तां !

परबो : होय रे होय ! तेकाच आदी इचारुक व्हया होता.

रामराव : हां ! मग तेनी बरोबर काय ता सांगल्यान आसता की नाय !

थोरल्या : पन मी म्हनतय तुझा नी गन्याचा इतक्या चांगला होता त तू नाय जावन तेका सोयन सांगायचा ?

परबो : मी कसो सांगा ? माझा नि तेचा दिनसला ते दिवस ! तुका म्हांयतं नाय !

बामराव : अरे झाला काय ?

परबो : तेचा म्हनना कि मी सोमाक तार करून बोलावलय ! तेच्या वरसून तेचा नि माझा भांडान झाला. मी नाय म्हनून सांगतय तरी आपलो ह्यो होयच म्हनतां ! माका मारूक सुधा इलो ना ! ह्यो सोमा इलो नी सगळ्या गावाचो हिसगड घातल्यान म्हनून मी सांगतय तो ह्यासाठी तुमी धकल्याक तेच्या बरोबर पाठवू नुको. मी आपलो तुमच्या जवळचो म्हनून मी तुमका सांगाक इलय ! सोमाच काय झाला ता म्हायती हां ना तुमका ! टकलेर वार बघलास किती झालल ते ! आपलो तसलोच म्हनून वाचलो !

रामराव : म्हनजे ते वार गन्यान केल्यान की काय ?

परबो : गन्यान म्हंजे तेच्या साथीदारानी ! मारुचो बेत हुतो तेंचो !

थोरल्या : पन ह्या तु आज आमका सांगतल्स ? तेवा पोलीस इचारीत सारखे कोनी मारल्यान ? कोनी मारल्यान ? पन तेवा नाय कोनाचा त्वांड उघडला ?

परबो : अरे पन कोन कसो सागात ? तो जितो न्हवलो आसतो मगे ?

थोरल्या : जर त्या टायमाक माका ह्या म्हायती आसता तर मी सगळा सांगलं आसतय तेंका !

रामराव : अरे पन हाली रामा आसता खंय ?

परबो : आसता आपलो खुळ्यासारखो फिरत ! कोनचा तरी काम गावला तर करता नी इडचो फुकत आसता !

रामराम : काय बिचाऱ्याची अवस्था केल्यानी, तेका मानसातना उठवल्यानी तेका उठवलास पन देव तुमका मानसातना उठवल्याशिवाय न्हवाची नाय ?

थोरल्या : काय होवचा नाय तेंचा ! अशो चांगल्याच्याच पाठी देव हात धूवान लागणार !

रामराव : कायव म्हन थोरल्या पन जगांत देव आसा हो ! केवातरी तो आपला करतुत दाखवल्याशिवाय न्हवाचो नाय ! ह्या साल्याका लोळवून लोळवून मारीत ना तेवाच ह्येंचे डोळे उघडतले.

थोरल्या : म्हंजे मेल्यावर पुन्ना डोळे उघाडतले कि काय?

परबो : काकानू तुमी काय जरी म्हतलास तरी हयेंचा काय होवचा नाय. हे अशेच व्हनार !

थोरल्या : व्हयता सांगलास ना ता माका पटला ! अरे देवाक जर डोळे आसते तर इतक्या करून गनी निवडान इलो आसतो !

दरबो : निवडून काय देव देयत नाय ! तुमीच दिलास ना?

थोरल्या : कोनी ? आमी ? तु दिलं आसशी!

परबो : हां ! बरां मी दिलय ! तेवा मी तेच्या पार्टीत हुतय ना ! आतामातं तुमच्या पार्टीत हय ही !

रामराव : अरे पार्टीत कोनाच्याव असा पन मानूस बघुक नुको, तेची लायकी काय ती बघुक नुको ? आता ह्या बघीनास, सोमासारखो गावात एक चांगलो मानूस इलो, तेची काय लायकी केल्यान तेनी ? आता आनी सभेत खेचनार हा ना तो ?

परबो : तेका खेचीत ती खेचीत पन तुमच्या धकल्याक आदी जपा ! कारण रजा संपली की सोमा जायत मुंबयक ! पन धाकल्याक हय न्हवाचा आसा हयाच तुमका मी सांगाक

इललय ! कसांव करा पन धाकल्याक तेच्याबरोबर पाठवू नुको ! एक हक्काचो मानुस म्हनून मी सांगतय !

थोरल्या : अरे पन ता आता कसा शक्य हां ?

परबो : आतापर्यंत मी इतक्या सांगलय पन तुझ्या काय ता मडक्यात शिरत नाय ! काय सांगनार, मी आपलो जातयत (जातो.)

रामराव : बघलस बाबा, मी सांगतय हेचे परिणाम लय मोठे व्हतले !

थोरल्या : आता करायचा काय ?

रामराव : तू असा कर, भायर जा नी सोमाक साद घाल (बाहेर जातो व हाक मारतो)

रामराव : भगवंता ! तूच निस्तार रे बाबा सगळा पोरानी मोठोच पेच करून ठेवल्यानी आसा तशात माझा राधे हय नाय ! काय करनार ? कर्माची फजेती होयत इली आसा ! दोन सोन्यासारखे पोर हत नेंका सांभाळ ! आयुष्यभर कष्ट करून खातो व ! कोनचो एक पैसो घितलो नाय !

सोमा : (प्रश्नार्थी निश्चयी चेहरा) काय पैशाचे कसले हिशोब घालताहांस ?

रामराव : नाय माझा नि देवाचा आपला चलला हां बोलना !

सोमा : देवाचा नी तुमचा ? अरे मग आमी उगीच इलव मदी !

रामराव : नाय नाय ! चुकलाच ता माझा एकटयाचा चलला हां !

सोमा : काय म्हनास, हाक मारलासशी ?

रामराव : गावात दवंडी इली !

सोमा : आयकलय मी, पुढे ?

रामराव : तुकां काय नाय वाटत तेच्याबद्दल ?

सोमा : गुन्हो माझो असतो तर माका भिती वाटली आसती कर नाय तेका डर किल्याक ?

रामराव : पन माझ्या कानार एक गोष्ट इली हां, खरी ती ?

सोमा : शेवत्याची ? होय होय खरी हां ती ! पन तुमका कळली तशी नाय हां ती ! खरी गोष्ट अशी झाली. शेवत्याक शिवणकामाची आवड आसा, तेची म्हायती तां माका इच्यारीत होता तेची मावशी न्हवता जोगेश्वरीक. पन तो कोर्स आसा दादरला ता बावडेकर माका भेटलला ! मगे हळुहळू आमची ओळख झाली !

रामराव : म्हंजे, शिवाच्या कोर्सांची म्हायती घेता घेत ह्या पन शिवलास सा वाटतां ! नाय म्हंजे तुमचा प्रेम बिम कायतां !

सोमा : आमका बावडेर बोलताना रामग्याच्या बापसान बघल्यान आनी तेका वाटला हयोंचा कायतरी हां ! तेनी शेवत्याच्या बापसाक ह्या सगळा सांगल्यान, आनी शेवत्यान माका हया सगळा सांगल्यान !

रामराव : पन आता ह्या निस्तारायचा कसा ?

सोमा : तेची व्यवस्था मी केलेली हय. एक पोलीस माझ्याबरोबर कायम न्हवणार हां !

थोरल्या : होयना ! मगे !

रामराव : हयेका म्हनतेत मानूस ! शाब्बास सोमा आपून मानला बुवा तुका ! तु चाय घितलं?

सोमा : हां ! घेवनच इलय !

रामराव : हां मगे मी आता न्हावन घेतय ! तुका एवढयाचसाठी बोलावलय ! थोरल्या चल पानी ओत ! (जातात.)

### प्रवेश चौथा

(स्टेजवर प्रकाश होतो त्यावेळी सर्व लोक जमलेले आहेत खुर्चीवर गणोबा बसला आहे, पानाचे ताट, विड्यामाचीस इ. मधूनमधून एखाद्या विडीचा झुरका मारतो)

परबो : अरे बसला हास किल्याक ? सुरू करा कायता लवकर !

धकल्या : होय येळार कायता होवंदे !

थोरल्या : सोमा तरी येवेदे !

धकल्या : तो येयल तुमी करा सुरू आमका जावन निजाचा हां !

गणोबा : जेच्याबाबत सभा हां. तो हजर नाय म्हंजे आमी काय समजायचां ? धकल्या ह्येचो अर्थ काय समजायचो आमी ?

थोरल्या : कायतरी समजा ! तसां न्हय. तेची तब्बेत बरी नसोत ! किंवा तेची ......

धकल्या : थोरल्या तू गप बस थंय ! तुका काय समजाचा नाय

थोरल्या : (सोमा प्रवेशतो) ह्यो काय इलोच सोमा ! इलस बाबा बस !

गणोबा : उभो न्हव ! बसलं रव्यांका ? टायम कितीचा हुतो !

थोरल्या : आताचीच हुतो !

गणोबा : थोरल्या मदी लय बोला नुको ! तुका काय चांभार चेष्टा वाटतत ह्यो ? धकल्या तेका सोयन कायला सांग !

धकल्या : थोरल्या तुका कितींदा सांगा (ह्या गडबडीत सोमा खाली बसतो)

थोरल्या : बरा, बाबा मी गप बसलय !

गणोबा : (दोन माणसाना डोळयाने खुणावतो. ते माणूस सोमाच्या दोन्ही बाजूस जावून बसतात.) सोमा ! आज गावान तुका सभेत बोलावलेलो हां ! तो किल्याक बोलावल्यान हयेची कल्पना आसाल तुका ?

रावश्या : काय म्हनलंत सायब ? तेचा उत्तर ?

सोमा : त्याचे सर्व बोलून होवू दे ना !

गणोबा : आज ह्या गावात तू सगळे मारे गोंधळ माजवलस हया कबूल हा नुका ?

सोमा : होय

थोरल्या-धकल्या : काय ( सोमा त्याना हाताने गप्प रहाण्यास सांगतो )

गणोबा : तु किष्णाचो धंदो बंद केलस ! कबूल ?

सोमा : कबूल !

किष्णा : नाय नाय ! माझो धंदो अडला नाय ! सोमान माका वायट मार्गापासून चांगलो मार्ग दाखवल्यान ! माउन् व्हयता बोललास तां चूकीचा हां !

गणोबा : पन तुझो एक धंदो बंद झालेना ! दूसरे जर तेच्या जोडीक काढतस तं टिक होता,

किष्णा : हां ! ह्या मातं बरोबर सांगलास !

गणोबा : साधुन चोरसेचो धंदो सोडल्यान ह्या याक बरा केल्यान पन गावात मांशाची धान तो घेवन येता हया सोमाचाच डोक्या आमच्या शामभटासारख्या मानसांची अशानी कुंचबना होता.

शामभट : छे, छे ! अहो आमच काय आहे ? तो सन्मार्गाला लागला गावातल्या चोऱ्या बंद झाल्या. अहो कोणीही कोठलाही व्यवसाय करावा आमची त्याला ना नाही !

गणोबा : अहो तुमची ना किल्याक असात? हाली सगळे भटसुद्धा माशे खावक लागले, निदान वासान तरी तुमचा प्वाट भरत आसात ! वांयच बरा वाटत आसा नाय !

रावश्या : हां व्हयता बरोबर ! व्हयता बरोबर !

गणोबा : आतापर्यंत तीन गुन्हे पुरे झाले, तेछी कबुली झाली आसा मगे आता शेवटचो नी महत्त्वाचो मुद्दो न्हवलो तो म्हंजे आमच्या शेवत्याचो ! तेच्यार तू देवस्की केलस नी आपलासा करून घीतलस ! यशवंता हया खरा किनाय ?

यशवंता : होय ! माझ्याकडना देवस्की केल्यान !

गणोबा : हया कबूल हा तुका ?

सोमा : (चिडून) अरे लाज वाटॉक होई होती तुका !

रावश्या : त्वांड सांभाळून बोल !

सोमा : अरे कुत्र्यासारखी चपला ल्येकाचारतेह ! अरे देवाक स्मरान सांग केवा देवस्की केलस ती ! आनी सरपंचानु मी तुमका आदी इचारतय यशवंतो आपुनच तुमच्याकडे इलो ह्या सांगाक !

गणोबा : व्हय !

सोमा : मगे माझ्यासारख्यान ह्येच्या पेकटान लाथ घातल्यान आसतलि आदी !

गणोबा : तु माझ्या मुद्याबद्दल बोल ! तुका ह्यो गुन्हो मान्य हां !

सोमा : शेवत्याक प्रत्यक्षविचारून घेवा ना !

गणोबा : (खवळून) काय शेवत्याक सभेत हानु (लाईट जातो) अरे मर्दानु बघतास काय ! टायम झालो ! (मधले दोघेजण उठतात सोमाच्या तोंडात बोळे कोंबतात, अर्धवट गोणीत भरतात. सोमा केवीलवाणा ओरडतो.) इन्स्पेक्टर...

रावश्या : आता इन्स्पेक्टर काय ? मायझया खां ! भरऱे गोन्यात ! नि घेवन वाटेक लाग !

इन्स्पेक्टर : (प्रवेशतात) सोडा त्याला (पिस्तूल उगारलेले, सर्वजण बाजूला होतात.)

थोरल्या : अवो कंदील तरी लावा ! अरे कंदीलाक वात नाय कशी ? आता ठेवताना हुती ! धकल्या भुतूरना डबो तरी पेटवून हान !

धकल्या : ह्यो काय हानलय ! (दिवा मोठा असावा)

इन्स्पेक्टर : गणोबारावांच्या मुसक्या बांधा ! हा एक सुरा ठेवा ! याचा पुढे उपयोग होणार आहे आणि ह्या दोघानाही बरोबर घ्या ! चला आमचं काम झालं सोनावडे येतो आम्ही ;

थोरल्या : ह्यो यशवंता न्हवलो एक !

यशवंता : पाया पडतय मी ! माका ह्येनीच सांगलल्यानी तसा सांगाक ! वीस रुपये देतय म्हनाक लागले, घरात अन्नाचा नाव नाय धा बारा पोरा खानारी

थोरल्या : म्हनून सोमा सांगत हुतो ना, कुटुंबनियोजन करून घेवक आनी दोन म्हयन्यानी तेराव्या होयल ! आता मेलो रडताह्या कित्याक ?

यशवंत : माझ्यावर दया करा ओ ! मी पुन्हा असला करुचय नाय !

इन्स्पेक्टर : तूला तशी साक्ष द्यावी लागेल !

यशवंत : हा देयन मी !

इन्स्पेक्टर : येतो आम्ही—

रामराव : इनीसपेक्टरानु वांयच थांबा ! आमच्यावर तुमचे लय उपकार झाले, आता याक केलास की झाला !

इन्स्पेक्टर : काय ? बोला ?

रामराव : देवा व्हयत्याका सोडून ! ओ आमच्यातलेच हत ते !

सर्वजण : ( आश्चर्यचकीत उद्‌गार काढतात )

इन्स्पेक्टर : तुमचेच तसे म्हणणे असेल तर आम्ही काय बोलणार ! द्या त्याना सोडून !

रामराव : आपनाक दिलल्या तसदीबद्दल क्षमा करा हो

इन्स्पेक्टर : अहो आमचे कामच ते ! बरे मंडळी येतो आम्ही.

गणोबा : रामरावा खरो मानुस तुच हस रे ; ( रामरावाचे पाय धरतो ) सोमा माका क्षमा कर ! माझ्या शेवत्याक पदरात धी !

थोरल्या : ह्येच्याकडे पदर हा खय ! शेवत्याकच सांगा ह्येका पदरात घेवक

सोमा : धकल्या ह्या आनंदाच्या क्षणात चाय कलहस ती सगळ्यांका दि बघू ! (धकल्या आत जातो) चायवरसून आठवन झाली ! शामभटानु तुमका राग येवंदे नुको पन तुमच्याच सारखो एक कोकणी भट मुंबयत आमच्या बाजूक न्हवता ! गावाच्या भावान भेट दिलल्यान ती देवसाठी मी तेच्या खोलयेर गेललय ! म्हातारो एकटीच घरात हुतो ! बायकी खय भूतूर

हुती काय बघलय नाय पन मी आपलो मनातल्यामनात चायची वाट बघलय ! बरोच येळ झालो म्हतला आता काय चाय येत नाय म्हणून मी येतो म्हटलय ! तितक्यात तो इलो मायर नी म्हनता कसो ? तुम्ही आलात चहा करायला झाला असता हो ! पण पावडर जर असती तर साखर कुठेतरी शोधता आली असती पण दुधाचे इकडे काय साधन नाही हो ! मी नुको म्हटलय आनी सुटलय ! अशातली गत !

थोरल्या : बाकी भट सालो हुशार हां !

सोमा : बरा ता जावंदे, उद्या मी मुंबयला जाण्याचा विचार करतो आहे, गणुभाऊ तुम्ही आजपासून गाववाल्यांची खात्री पटवा, की तुम्ही आदर्श समाजसेवक आहात ! सगळ्यानी एकोप्यान वागा !

रामराव : सोमा, अरे तुका याक सांगाचा इसारलय ! अरे उद्या माझा राघे येताहा आज पत्र इला!

थोरल्या : गाववाल्यापुढे तुझा याक भाषान दी. म्हंजे आमी कसा वागायचा.

सोमा : भाषन कशाक रे ?

सर्वजण : होवंदे ! होवंदे, आमका कायतो मार्ग सांगा

सोमा : बरं बुवा ! तर गाववाल्यानु आजपर्यंत मी तुमका अनेक गोष्टींचा मार्गदर्शन केलेला आसय. त्याचप्रमाणे आमच्या गावाचो विकास होवसाठी कितीतरी योजना राबवून दिलेल्यो आसत ! आता इतक्याच करा की, आपला कुटुंब लहानात लहान राखा, दारुक पुन्हा स्पर्श करू नुको. आणि जुन्या मानसांका तुम्ही तरुणांनी पटवून देवा की ह्यो जो सगळयो देवदेवस्क्यो चसल्ल्यो हत तेच्यान काय अर्थ नाय हां ! अधिकाधिक सुख मिळवूचा असात तं जो शिकलेलो सवरलेली हां ! तेची कास तुम्ही धरा ! तर प्रौढ शिक्षणाचे वर्ग तुमका काढतां येतील मग आता सगळयानी बोला !
........ दारुबदी.........झालीच पाहिजे.
कुटुंब लहान सुख महान ! ...शिक्षणाशिवाय
.........पर्याय नाही.

(याचवेळी धकल्या चहाची किटली व कप घेवून प्रवेशतो त्यावर प्रकाशझोत, धुंद संगीताचे स्वर)

॥ पडदा ॥


॥ श्री ॥


**लक्ष्मी कोल्ड्रिंक्स**

**आमचे येथे लग्न, मुंजी इत्यादी समारंभासाठी**
**आइस बॉलच्या ऑर्डर्स स्विकारल्या जातील**

**प्रोप्रा : बाळ ओंबळकर**


## वर्ग प्रतिनिधी — विद्यार्थी महामंडळ

सदानंद देसाई | प्रदीप साळसकर | नूतन पाटील | अविनाश खडपकर | अजित सावंत | मिलींद देशपांडे | जयानंद फाटक | सीताराम सरवणकर | विनायक ठाकूर | माणिक मुणगेकर



तृतीय वर्ष कला | तृतीय वर्ष वाणिज्य | तृतीय वर्ष वाणिज्य | द्वितीय वर्ष कला | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रथम वर्ष कला | प्रथम वर्ष वाणिज्य | बारावी वाणिज्य | अकरावी वाणिज्य | अकरावी कला


## राष्ट्रीय सेवा योजना — विद्यार्थी समिती



गणपत कोयंडे | शेखर गोळवणकर | सूर्यकांत पाळेकर | विलास केळूसकर | अंजली नलावडे | शुभांगी सप्रे



भांगडा नृत्य...
एक झलक...



गोवा सहल
प्रारंभ...



गोवा दर्शन...

ध्ये प्रथम क्रमांक मिळवि
ले यश संपादन केल्यानंत
रा येथे झालेल्या
. तेथेही संजय प्रभाकर वांदेक
ईल आणि १०० मी. बेस्ट स्ट
क्रमांक पटकावला. तसेच
याने २०० मी. फ्रीस्टाईल
प्रदीप हिरोजी खबळे यां
तीय क्रमांक मिळविला. य
र प्रा. एस. एस. बोराटे
काम पाहिले.

संपादन केल्यानंतर नोव्हें
ट्र शासनाच्यावतीने घेण्य
ग्य हिवाळी मैदानी क्रीडा
ालयातील विद्यार्थ्यांचे
पाठविण्यात आले. या स
वळे हा भालाफेक मध्ये
व थाळी फेक आणि गोळ
क्रमांक आला. याशिवाय
ो ८०० मी. धावण्याच्या
दीप खवळे, प्रभाकर गु
किशोर भाग्रल या चार
ले धावणे या स्पर्धेमध्ये
त्याचप्रमाणे याच स्पर्धेम
ाटम, सुनिता महाडिक
विद्यार्थिनींनी तृतीय क्रमां

वळे याला भालाफेक या
भागीय पातळीवर पाठ
ने तृतीय क्रमांक मिळविल
न प्रा. बी. एम्. माळी हो

आंतरमहाविद्यालयीन स्पर्ध
दानंद देसाई, मिलिंद देश
उपाध्ये यांच्या व्यवस्थेखा
आला. या विद्यार्थ्यांनी ते
. मुंबई येथे झालेल्या आंत
पोहण्याच्या स्पर्धेमध्येही
वाडकर हे सहभागी झाले

-८५

# वाटचाल....

आमच्या महाविद्यालयाचं शैक्षणिक वर्ष २० जून १९८४ रोजी सुरु झालं. महाविद्यालयाचा अकरावा वर्धापनदिन श्री. सदानंद पारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. ज. य. मराठे वकील उपस्थित होते. मागील शैक्षणिक वर्षात प्रकाशित केलेल्या रसराज देवगड दर्शन विशेषांकास, उत्तमकथा मासिकातर्फे घेण्यात आलेल्या महाविद्यालय वार्षिकांक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मान मिळाला. श्री. सदानंद पाटकर यांच्या हस्ते या वार्षिकांकाचे औपचारीक प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. अंकाच्या छपाईचे काम स्विकारलेल्या श्री हडकर व श्री. जाचक यांचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला. आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थीनी कल्पना तावडे हिने सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातून बारावी कलाशाखेत सर्वप्रथम येऊन महाविद्यालयाच्या उत्कृष्ट यशाची परंपरा कायम राखली याबद्दल श्री. मराठे वकीलांच्या हस्ते, महाविद्यालयाने तिचा जाहीर सत्कार केला. प्रथमवर्गात उत्तीर्ण झालेल्या व आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना याप्रसंगी पुस्तक संच प्रदान करण्यात आले. या समारंभप्रसंगी श्री. सदानंद पारकर यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी रु. १००० ची देणगी दिली.

महाविद्यालयासाठी आणखीही काही भरीव देणग्या दिल्या गेल्या. एस्. एच्. केळकर या सुप्रसिद्ध कंपनीचे चालक श्री. भाऊसाहेब केळकर यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी रु. १०,००० ची पुस्तके देणगीदाखल दिली. संस्थेचे अध्यक्ष श्री. वालावलकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशाबद्दल कायम स्वरुपात शिष्यवृत्ती देण्यासाठी रु. ११,००० ची देणगी दिली. तसेच दहावीच्या परीक्षेत ६० टक्के गुण मिळवून आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या गुणानुक्रमे पहिल्या १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी रु. १००० ची देणगी पंतवालावलकर कापड दुकान ट्रस्टकडून देण्यात आली. तारामुंबरीचे रहिवासी श्री. के. डी. उपरकर यानी महाविद्यालयाला सायकल स्टँड देणगी दाखल दिले.

१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. ए. कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहणाने संपन्न झाला

३१ ऑगस्ट रोजी श्री. शां. कृ. पंतवालावर अध्यापक महाविद्यालयाच्या त्यावेळच्या प्राचार्या सौ. राजेशिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या 'रसराज' भित्तीपत्रकाचे प्रकाशन आले.

२० सप्टेंबर रोजी महाविद्यालयामध्यें नव्यानेच स्थापन झालेल्या 'व्यासपीठ आस्वाद' चा शुभारंभ करण्यात आला.

२१ सप्टेंबर रोजी महाविद्यालयामध्ये स्टाफ ॲकॅडमीची स्थापना प्रा. गोठोस्करांच्या 'विवेकानंद चरित्र-विचार व कार्य' या विषयावरील व्याख्यानाने झाली.

महाविद्यालयाचे दुसरे सत्र १४ नोव्हेंबर रोजी सुरू झाले. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा श्रद्धांजली वाहून महाविद्यालयात दुखवट्याचा ठराव संमत केला.

विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना
ज्ञानसमृद्ध करणाऱ्या ' विविधा ' या नव्या उप
शुभारंभ महाविद्यालयात, प्रा. म. अ. कुलकर्णी
' प्रेमाचे शाहीर—गडकरी ' या विषयावरील व्या
करण्यात आला.

२७ नोव्हेंबर रोजी भारताचे माजी उपपंतप्रधा
श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल
महाविद्यालयाने शोकसभा घेऊन दुखवटयाचा
संमत केला.

५ डिसें. रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक म
उद्‌घाटन डॉ. भा. वा. आठवले यांच्या हस्ते झ

शिक्षण विकास मंडळ, देवगड या संस्थेतर्फे चाल
जाणाऱ्या दोन महाविद्यालयांच्या विद्यार्थीनींच्या
वसतीगृहासाठी १ लाखाचे अनुदान मंजूर करण
आले. या वसतीगृहाचा भूमिपूजन समारंभ सिं
जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री
सुधाकरराव कुलकर्णी यांच्या हस्ते १२ डिसेंबर
करण्यात आला.

श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महावि
प्राचार्य श्री. अ.ना. जोशी यांना पुणे विद्यापीठ
'रविंद्रनाथ टागोर यांचे प्राथमिक शिक्षणाचे त
या विषयावरील संशोधनाबद्दल पीएच्. डी. प
प्रदान केल्याबद्दल महाविद्यालयाने १९ डिसेंबर
समाजकार्यकर्ते श्री. बंडोपंत पाटणकर यांच्या ह
समारंभाद्वारे जाहीर सत्कार केला.

विद्यार्थ्यांचे नोकरीविषयक प्रश्न सोडविण्यासाठ
आमच्या महाविद्यालयात ' व्होकेशनल गायडन्स
विभाग नव्याने सुरु करण्यात आला.
२६ जानेवारी हा भारतीय प्रजासत्ताक दिन प्रा
डॉ. अ. ना. जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहणका
संपन्न झाला.

आमच्या महाविद्यालयातील हुषार व मनमिळाव
हेमंत हिरनाईक याचे या शैक्षणिक वर्षात दुःख
झाले. त्याच्या निधनाबद्दल महाविद्यालयाने दुख
ठराव संमत केला.



## राष्ट्रीय सेवा योजना :

या शैक्षणिक वर्षात सदर विभागात १०६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या योजनेमार्फत वर्षभरात एकाने एकाला साक्षर करा, पोस्टातील बचत योजना, गोवा कॅन्सर सोसायटीचा आर्थिक निधी गोळा करणे, प्रथमोपचारवर्ग, सानेगुरुजी कथामाला, रक्तदान शिबीर, वैद्यकीय पहाणी इ. प्रकल्प राबवले गेले.

दि. ९ डिसेंबर रोजी महिलांसाठी ' कुटुंब कल्याण प्रेरणा शिबीर ' महात्मा गांधी विद्यालय, तळेबाजार येथे आयोजित करण्यात आले होते. आरोग्याची प्राथमिक काळजी, बाल व माता संगोपन, हुंडा पद्धत एक सामाजिक अन्याय, समाज प्रबोधन, ग्रामीण महिलांचे प्रश्न अशा विविध विषयावर विविध वक्त्यांची भाषणे या शिबीरात झाली.

दि. २३ डिसेंबर ते १ मार्च या कालावधीत ग्रामीण पुनर्रचना शिबीर मु. कट्टा, (देवगड) येथे आयोजित केले. शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अ. ना. जोशींच्या शिक्षणातील समस्या आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकाचे स्थान ' या व्याख्यानाने शिबीराला प्रारंभ झाला. ग्रामीण पुनर्रचनेच्या संदर्भातील अनेक विषयावर शिबीराच्या कालावधीत व्याख्याने आयोजित केली होती. विद्यार्थ्यांनी ६६० फूट लांबीची व १५ फूट रुंदीची सडक तयार केली. या कामाला सरपंच व ग्रामस्थांची खूप मदत झाली. विहीरीतील पाण्याचे शुद्धीकरण, प्राथमिक शाळेत अध्यापन हे उपक्रमही हाती घेतले गेले. करमणुकीच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःच एकांकिका बसवून सादर केली. करमणुकीसाठी कीर्तनही ठेवले होते. आश्रमशाळा, कुवे—लांजा येथील राष्ट्रीय सेवा योजनेतील बारा स्वयंसेवकानी भेट दिली. संस्थेचे अध्यक्ष श्री. वसंत गंगावणे यानी ताडपत्र्या तयार करणे, सूर्य प्रकाशावर चालणारी शेगडी, कागदी बशा बनवण्याचे यंत्र, माफक किमतीत घरबांधण्याची योजना वगैरे उपक्रमाची माहिती दिली. प्रा. सुरेश सोनटक्के यांनी राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक म्हणून काम पाहिले.

**प्रा. श रा. धुमाळ**
प्रमुख.



## ग्रंथालय :

ग्रंथालय म्हणजे ज्ञानभांडार ! या ज्ञा
सर्वतऱ्हेच्या ज्ञानाची भर पडावी म्हणू
सुरवातीलाच स्वतः प्राचार्य, ग्रंथपाल,
धुमाळ, प्रा. पी. एम्. उपाध्ये, प्रा. बी
एक ' ग्रंथालय समिती ' नियुक्त केली

महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात ग्रंथा
अनन्यसाधारण महत्त्व असते. शास्त्र
विद्यार्थ्यांना जसे प्रयोगशाळेवर अवलं
तसे कला व वाणिज्य शाखेतील विद्या
ग्रंथालयावर अवलंबून रहावे लागते.
विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्यासा
प्रतीच्या आणि विविध भाषेतील ग्रंथ
विषयावरील नियतकालिकांनी समृद्ध
ग्रंथालय आहे. खालील आकडेवारीवरु
ग्रंथालयप्रगतीची कल्पना येऊ शकेल.

ग्रंथालय उघडण्याच्या वेळा— सकाळी
दुपारी ३ ते ६; ग्रंथ— ८४००; निय
वर्तमानपत्रे— १४; कपाटे— ४६; वा
देवघेव सरासरी— १००; नियतकालि
३००; ग्रंथालयाचे क्षेत्रफळ— १५०
ग्रंथांची किमत— रु. १,४५,०००; नि
किमत— रु. ३०,०००; फर्निचरची

यावर्षी श्री. भाऊसाहेब केळकर, मुंब
ट्रस्टमार्फत रु. १०,००० किमतीची पु
देणगीदाखल मिळाली. पुस्तकपेढीतर्फे
विद्यार्थ्यांना नाममात्र रक्कम भरुन व
पुस्तके दिली जातात. चालूवर्षी सुमा
किमतीची १००० पुस्तके २५० विद्य
याशिवाय गृहवाचनासाठी सर्व विद्या
एकावेळी ८ दिवसाच्या मुदतीने २
जातात. ग्रंथालयासाठी स्वतंत्र, सर्वसं
अत्याधुनिक अशी स्वतंत्र इमारत बां
महाविद्यालयाची योजना आहे.

देवगड एज्युकेशन बोर्डाच्या श्री. शेठ
देवगड या हायस्कूलने त्यांच्याकडील

## वाटचाल....

आमच्या महाविद्यालयाचं शैक्षणिक वर्ष २० जून १९८४ रोजी सुरु झालं. महाविद्यालयाचा अकरावा वर्धापनदिन श्री. सदानंद पारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. ज. य. मराठे वकील उपस्थित होते. मागील शैक्षणिक वर्षात प्रकाशित केलेल्या रसराज देवगड दर्शन विशेषांकास, उत्तमकथा मासिकातर्फे घेण्यात आलेल्या महाविद्यालय वार्षिकांक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मान मिळाला. श्री. सदानंद पाटकर यांच्या हस्ते या वार्षिकांकाचे औपचारीक प्रकाशन याप्रसंगी करण्यात आले. अंकाच्या छपाईचे काम स्विकारलेल्या श्री हडकर व श्री. जाचक यांचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला. आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थीनी कल्पना तावडे हिने सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातून बारावी कलाशाखेत सर्वप्रथम येऊन महाविद्यालयाच्या उत्कृष्ट यशाची परंपरा कायम राखली याबद्दल श्री. मराठे वकीलांच्या हस्ते, महाविद्यालयाने तिचा जाहीर सत्कार केला. प्रथमवर्गात उत्तीर्ण झालेल्या व आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना याप्रसंगी पुस्तक संच प्रदान करण्यात आले. या समारंभप्रसंगी श्री. सदानंद पारकर यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी रु. १००० ची देणगी दिली.

महाविद्यालयासाठी आणखीही काही भरीव देणग्या दिल्या गेल्या. एस्. एच्. केळकर या सुप्रसिद्ध कंपनीचे चालक श्री. भाऊसाहेब केळकर यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी रु. १०,००० ची पुस्तके देणगीदाखल दिली. संस्थेचे अध्यक्ष श्री. वालावलकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशाबद्दल कायम स्वरुपात शिष्यवृत्ती देण्यासाठी रु. ११,००० ची देणगी दिली. तसेच दहावीच्या परीक्षेत ६० टक्के गुण मिळवून आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या गुणानुक्रमे पहिल्या १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी रु. १००० ची देणगी पंतवालावलकर कापड दुकान ट्रस्टकडून देण्यात आली. तारामुंबरीचे रहिवासी श्री. के. डी. उपरकर यांनी महाविद्यालयाला सायकल स्टँड देणगी दाखल दिले.

१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. ए. कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहणाने संपन्न झाला.

३१ ऑगस्ट रोजी श्री. शां. कृ. पंतवालावर अध्यापक महाविद्यालयाच्या त्यावेळच्या प्राचार्या सौ. राजेशिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या 'रसराज' भित्तीपत्रकाचे प्रकाशन आले.

२० सप्टेंबर रोजी महाविद्यालयामध्ये नव्यानेच स्थापन झालेल्या 'व्यासपीठ आस्वाद' चा शुभारंभ करण्यात आला.

२१ सप्टेंबर रोजी महाविद्यालयामध्ये स्टाफ ॲकॅडमीची स्थापना प्रा. गोळेस्करांच्या 'विवेकानंद चरित्र-विचार व कार्य' या विषयावरील व्याख्यानाने झाली.

महाविद्यालयाचे दुसरे सत्र १४ नोव्हेंबर रोजी सुरू झाले. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा श्रद्धांजली वाहून महाविद्यालयात दुखवट्याचा ठराव संमत केला.

विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानसमृद्ध करणाऱ्या 'विविधा' या नव्या उपक्रमाचा शुभारंभ महाविद्यालयात, प्रा. म. अ. कुलकर्णी यांच्या 'प्रेमाचे शाहीर–गडकरी' या विषयावरील व्याख्यानाने करण्यात आला.

२७ नोव्हेंबर रोजी भारताचे माजी उपपंतप्रधान श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल महाविद्यालयाने शोकसभा घेऊन दुखवटयाचा ठराव संमत केला.

५ डिसें. रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन डॉ. भा. वा. आठवले यांच्या हस्ते झाले.

शिक्षण विकास मंडळ, देवगड या संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या दोन महाविद्यालयांच्या विद्यार्थीनींच्या वसतीगृहासाठी १ लाखाचे अनुदान मंजूर करण्यात आले. या वसतीगृहाचा भूमिपूजन समारंभ सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. सुधाकरराव कुलकर्णी यांच्या हस्ते १२ डिसेंबर रोजी करण्यात आला.

श्री. शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. अ.ना. जोशी यांना पुणे विद्यापीठाने, 'रविंद्रनाथ टागोर यांचे प्राथमिक शिक्षणाचे तत्त्वज्ञान' या विषयावरील संशोधनाबद्द ल पीएच्. डी. पदवी प्रदान केल्याबद्दल महाविद्यालयाने १९ डिसेंबर रोजी समाजकार्यकर्ते श्री. बंडोपंत पाटणकर यांच्या हस्ते समारंभाद्वारे जाहीर सत्कार केला.

विद्यार्थ्यांचे नोकरीविषयक प्रश्न सोडविण्यासाठी आमच्या महाविद्यालयात 'व्होकेशनल गायडन्स' हा विभाग नव्याने सुरु करण्यात आला.
२६ जानेवारी हा भारतीय प्रजासत्ताक दिन प्राचार्य डॉ. अ. ना. जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहणकरून संपन्न झाला.

आमच्या महाविद्यालयातील हुषार व मनमिळावू विद्यार्थी हेमंत हिरनाईक याचे या शैक्षणिक वर्षात दुःखद निधन झाले. त्याच्या निधनाबद्दल महाविद्यालयाने दुखवटयाचा ठराव संमत केला.

या शैक्षणिक वर्षामध्ये अनेक मान्यवर व्यक्तींनी महाविद्यालयाला भेट दिली. कोल्हापूर के. एम. सी. कॉलेजचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. व्ही. व्ही. द्रवीड, स्टेट बँक ऑफ इंडियाचे रिजनल ऑफिसर श्री. रबडे, कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सीलचे डायरेक्टर डॉ. आर. ए. कुलकर्णी, मुंबई विद्यापीठाच्या आर्टस् फॅकल्टीचे डीन प्रा. हेमंत वाघ, मुंबई विद्यापीठ शिक्षण विभाग प्रमुख डॉ. बेंगॉली, देवगड एज्युकेशन बोर्ड, मुंबई या संस्थेचे अध्यक्ष डॉ. म. वि. रेगे आणि मुंबई विद्यापीठाचे असिस्टंट रजिस्टार श्री. वाय्. जी. कुलकर्णी अशा अनेक नामवंतांनी महाविद्यालयाला विविध निमित्ताने भेट दिली.

महाविद्यालयात वेगवेगळ्या विभागांच्याद्वारे वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात. त्या विभागांचे अहवाल पुढीलप्रमाणे होत.

## क्रीडा विभाग :

महाविद्यालयामध्ये देशी व विदेशी खेळांची सोय आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळानाही अतिशय महत्वाचे स्थान आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी यावर्षी खेळात विशेष कौशल्य मिळविले.

ऑगस्ट महिन्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्यावतीने जिल्हा पातळीवरील आंतरशालेय पावसाळी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये ज्युनिअर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे कबड्डी, खो-खो या खेळांचे संघ पाठविले होते. त्याचप्रमाणे वैयक्तिक स्पर्धांमध्येही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. काही विद्यार्थ्यांनी चांगले यशही संपादन केले. संजय प्रभाकर बांदेकर या विद्यार्थ्याने १०० मी. फ्रिस्टाईल आणि १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक या पोहण्याच्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. याशिवाय १०० मी बॅक स्ट्रोकमध्ये त्याने द्वितीय क्रमांक पटकावला. मंगेश राजाराम कोयंडे याने २०० मी. फ्रीस्टाईल या पोहण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. तसेच प्रदीप हिरोजी खवळे याने ४०० मी. फ्रीस्टाईल आणि १०० मी. बॅक स्ट्रोक व ब्रेस्ट स्ट्रोक

या तीनही स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

वरीलप्रमाणे चांगले यश संपादन केल्यानंतर वरील विद्यार्थ्यांना सातारा येथे झालेल्या विभागीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आले. तेथेही संजय प्रभाकर बांदेकर याने १०० मी. फ्रीस्टाईल आणि १०० मी. बॅस्ट स्ट्रोक या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. तसेच मंगेश राजाराम कोयंडे याने २०० मी. फ्रीस्टाईलमध्ये तृतीय क्रमांक व प्रदीप हिरोजी खवळे याने ४०० मी. फ्रीस्टाईलमध्ये तृतीय क्रमांक मिळविला. या सर्व संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रा. एस. एस. बोराटे व प्रा. बी. एम्. माळी यांनी काम पाहिले.

अशा प्रकारे यश संपादन केल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्र शासनाच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हा आंतरशालेय हिवाळी मैदानी क्रीडा स्पर्धामध्ये आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे व विद्यार्थीनींचे संघ पाठविण्यात आले. या स्पर्धेमध्ये प्रदीप हिरोजी खवळे हा भालाफेक मध्ये प्रथम क्रमांकाने आला, व थाळी फेक आणि गोळाफेक यामध्ये तिसरा क्रमांक आला. याशिवाय सुनिता वसंत महाडिक ही ८०० मी. धावण्याच्या स्पर्धेत तिसरी आली. प्रदीप खवळे, प्रभाकर गुरव, श्रीकांत बिडये आणि नंदकिशोर भावल या चार विद्यार्थ्यांनी ४×१०० मी. रीले धावणे या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे याच स्पर्धेमध्ये सुरेखा लांबोरे, सरीता साटम, सुनिता महाडिक आणि सुजाता राणे या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक मिळवला

यानतर प्रदीप खवळे याला भालाफेक या स्पर्धेसाठी रत्नागिरी येथे विभागीय पातळीवर पाठविण्यात आले. तेथेही त्याने तृतीय क्रमांक मिळविला. व्यवस्थापक म्हणून प्रा. बी. एम्. माळी होते.

टेबल टेनिसच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेसाठी अजित सावंत, सदानंद देसाई, मिलिंद देशपांडे यांचा संघ प्रा. प्रकाश उपाध्ये यांच्या व्यवस्थेखाली मुंबई येथे पाठविण्यात आला. या विद्यार्थ्यांनी तेथे चांगले कौशल्य दाखविले. मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन पोहण्याच्या स्पर्धेमध्येही सतीश धुरत आणि नरेंद्र शिरवाडकर हे सहभागी झाले होते.

प्रा. बी. एम्. भोसले यांच्या व्यवस्थेखाली महाविद्यालयाचा क्रिकेटचा संघ रत्नागिरी येथे गेला होता. या संघाला अपयश आले असले तरी महाविद्यालयाच्या क्रिकेटचा दर्जा उंचावला आहे. एवढे मात्र निश्चित !

या व्यतिरिक्त रोटरी क्लब, देवगड, हनुमान क्रीडा मंडळ देवगड आणि स्वरगंध, देवगड या स्थानिक संस्थांच्या आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्येही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले.

महाविद्यालयाचा अकरावा वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन ग्रामीण शासकीय रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अवाड यांनी केले. या स्पर्धेत मुलामुलींसाठी कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, टेबल-टेनिस, रिंग-टेनिस, कॅरम या सांघिक स्पर्धांचा समावेश होता. तसेच सुमारे तीस स्पर्धांचा समावेश ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये होता.

महाविद्यालयीन विद्यार्थी सर्वसाधारण विजेतेपद श्री. संजय बांदेकर, श्री. जयंत भगवंतराव साटम तर विद्यार्थिनी सर्वसाधारण विजेतेपद कु. पद्मजा पारकर हिने पटकाविले. कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी सर्वसाधारण विजेतेपद श्री. प्रदीप हिरोजी खवळे याने व विद्यार्थिनी सर्वसाधारण विजेतेपद कु. सरीता भगवंतराव नाईक साटम हिने पटकाविले. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वच प्राध्यापकांनी सहकार्य केले. महोत्सवाचे संचलन, प्रा. एम. एम. गावडे व प्रा. बी. एम. माळी यांनी केले, श्री. अजित सावंत, माणिक मुणगेकर यांनी क्रीडा विभाग विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून काम केले.

प्रा. एम. एम. गावडे — क्रीडा अध्यक्ष

प्रा. बी. एम. माळी — क्रीडा शिक्षक

अजित सावंत, माणिक मुणगेकर — विद्यार्थी प्रतिनिधी

## राष्ट्रीय सेवा योजना :

या शैक्षणिक वर्षात सदर विभागात १०६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. या योजनेमार्फत वर्षभरात एकाने एकाला साक्षर करा, पोस्टातील बचत योजना, गोवा कॅन्सर सोसायटीचा आर्थिक निधी गोळा करणे, प्रथमोपचारवर्ग, सानेगुरुजी कथामाला, रक्तदान शिबीर, वैद्यकीय पहाणी इ. प्रकल्प राबवले गेले.

दि. ९ डिसेंबर रोजी महिलांसाठी 'कुटुंब कल्याण प्रेरणा शिबीर' महात्मा गांधी विद्यालय, तळेबाजार येथे आयोजित करण्यात आले होते. आरोग्याची प्राथमिक काळजी, बाल व माता संगोपन, हुंडा पद्धत एक सामाजिक अन्याय, समाज प्रबोधन, ग्रामीण महिलांचे प्रश्न अशा विविध विषयावर विविध वक्त्यांची भाषणे या शिबीरात झाली.

दि. २३ डिसेंबर ते १ मार्च या कालावधीत ग्रामीण पुनर्रचना शिबीर मु. कट्टा, (देवगड) येथे आयोजित केले. शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अ. ना. जोशींच्या शिक्षणातील समस्या आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वमंसेवकाचे स्थान' या व्याख्यानाने शिबीराला प्रारंभ झाला. ग्रामीण पुनर्रचनेच्या संदर्भातील अनेक विषयावर शिबीराच्या कालावधीत व्याख्याने आयोजित केली होती. विद्यार्थ्यांनी ६६० फूट लांबीची व १५ फूट रुंदीची सडक तयार केली. या कामाला सरपंच व ग्रामस्थांची खूप मदत झाली. विहीरीतील पाण्याचे शुद्धीकरण, प्राथमिक शाळेत अध्यापन हे उपक्रमही हाती घेतले गेले. करमणुकीच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःच एकांकिका बसवून सादर केली. करमणुकीसाठी कीर्तनही ठेवले होते. आश्रमशाळा, कुवे–लांजा येथील राष्ट्रीय सेवा योजनेतील बारा स्वयंसेवकानी भेट दिली. संस्थेचे अध्यक्ष श्री. वसंत गंगावणे यानी ताडपत्र्या तयार करणे, सूर्य प्रकाशावर चालणारी शेगडी, कागदी बशा बनवण्याचे यंत्र, माफक किंमतीत घरबांधण्याची योजना वगैरे उपक्रमाची माहिती दिली. प्रा. सुरेश सोनटक्के यांनी राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक म्हणून काम पाहिले.

**प्रा. श रा. धुमाळ**
**प्रमुख.**

## ग्रंथालय :

